The majority of respondents (72.67%) identify as Hindu, followed by Muslim respondents comprising 23.33% of the total. A smaller proportion (4.00%) falls into the "Other" category (included in Christen, Buddhist and Jain). Understanding the religious demographics of the respondents is important for addressing cultural and social factors that may impact their socio-economic conditions.

Table 3.4 Economic status of Respondent:

| Age | Frequency | Percentage |
|---|---|---|
| APL | 38 | 25.33 |
| BPL | 102 | 68.00 |
| AAY | 10 | 6.67 |
| Total | 150 | 100 |

Source: primary data collection through questionnaire.

These results illustrate the economic conditions of the respondents, with the majority (68.00%) falling below the poverty line (BPL). A smaller proportion (25.33%) are above the poverty line (APL), and a few (6.67%) are beneficiaries of the Antyodaya Anna Yojana (AAY). Addressing the economic challenges faced by BPL individuals is crucial for improving their livelihoods and overall well-being.

Table 3.5 Category wise distribution of Respondent:

| Category | Frequency | Percentage |
|---|---|---|
| SC | 72 | 48.00 |
| ST | 33 | 22.00 |
| OBC | 32 | 21.33 |
| NT | 7 | 4.67 |
| DTNT | 6 | 4.00 |
| Total | 150 | 100 |

Source: primary data collection through questionnaire.

This distribution highlights the representation of different caste categories among the respondents. Scheduled Castes (SC) comprise the largest proportion, followed by Scheduled Tribes (ST), Other Backward Classes (OBC), and Nomadic Tribes (NT). Denotified Tribes Nomadic Tribes (DTNT) have the smallest representation. Understanding the caste dynamics is essential for addressing social inequalities and promoting inclusive development among agricultural laborers.

Table 3.6 Wages difference between of Respondent:

| Wages difference | Frequency | Percentage |
|---|---|---|
| Yes | 132 | 88.00 |
| No | 18 | 12.00 |
| Total | 150 | 100 |

Source: primary data collection through questionnaire.

These findings indicate that a significant majority (88.00%) of respondents report experiencing a wage difference, suggesting disparities between the wages of male and female agricultural laborers. Addressing this wage gap is crucial for achieving gender equality and improving the socio-economic status of women in agriculture.

Table 3.7 Problem faced by them while doing farm activities:

| Problem faced | Frequency | Percentage |
|---|---|---|
| Yes | 139 | 92.67 |
| No | 11 | 3.33 |
| Total | 150 | 100 |

Source: primary data collection through questionnaire.

These results indicate that the majority of agricultural laborers face challenges while performing farm activities, with 92.67% of respondents reporting encountering problems. Identifying and addressing these issues is essential for enhancing the working conditions and well-being of agricultural laborers.

Table 3.8 Type of problem faced by agricultural activities:

| Problem | Frequency | Percentage |
|---|---|---|
| Over time | 23 | 15.33% |
| Bad attitude of landlord | 54 | 36.00 |
| Caste discrimination | 69 | 46.00 |
| Other | 04 | 2.67 |
| Total | 150 | 100 |

Source: primary data collection through questionnaire.

These findings indicate that caste discrimination is the most prevalent issue faced by agricultural laborers, followed by the bad attitude of landlords. Over time work is also a concern, albeit to a lesser extent, while other problems contribute minimally to the challenges encountered during agricultural activities. Addressing these issues is crucial for improving the working conditions and livelihoods of agricultural laborers.

**Conclusion:**

The research underscores the precarious socio-economic conditions of women agricultural laborers in Bhadgaon Taluka. Despite their indispensable contribution to agriculture, women laborers encounter numerous challenges, including low wages and discriminatory practices. Policy interventions are imperative to address these issues and improve the economic and social well-being of women agricultural laborers. The analysis of demographic data among agricultural laborers underscores the need for tailored interventions to address their specific needs. Key insights include understanding diverse age groups, prioritizing literacy and educational opportunities, considering religious and social factors for holistic development, addressing poverty prevalence, tackling social inequalities, gender disparities, and challenges such as caste discrimination and landlord attitudes. Comprehensive efforts are essential to improve working conditions and livelihoods, ultimately fostering sustainable development in the agricultural sector.

**References:**

1. Datta and Sundaram. Indian Economy (hindi edition) S. Chand Publication New Delhi, 2018.
2. S. S. M. Desai and Dr Nirmala Bhalerao, Indian Economy (Marathi) Nirali Prakashan Pune, 2011.
3. Dr. K.G.Desle, Spardha Pariksha Arthshastra-1 (Marathi), Dip stambha Publication Jalgaon, 2018.
4. Prof. N.L.Chavan, Indian Economy (Marathi Edition) Prashant Publication,2020.
5. Registrar General And Census Commissioner, India, 2011.
6. Https://Jalgaon.gov.in

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# महिला सक्षमीकरण : संधी आणि आव्हाने

## डॉ. सीमा भास्कर सैंदाणे

उपशिक्षिका, लाडकुबाई विद्या मंदिर, भडगाव. जि. जळगाव. ,मोबा. : 9405672028
Email: seema1983s@gmail.com

**सारांश :**

भारतीय संस्कृती ही पुरुषसत्ताक आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीत कायमच स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान देण्यात आल्याने भारतात महिलांना अनेक अन्याय व अत्याचारांचा सामना करावा लागला आहे. पिढ्यांपिढ्यांपासून 'चूल आणि मूल' याच कक्षेत स्त्रीचे कर्तृत्व बंदिस्त करण्यात आले. पण शेवटी प्रत्येक गोष्टीला मर्यादा असतात व ती मर्यादा ओलांडली गेली की सुरू होतो संघर्षाचा प्रवास. अगदी याचप्रमाणे स्त्रियांनीसुद्धा आपल्यावरील अन्याय अत्याचारांविरुद्ध संघर्ष करायला सुरुवात केली. त्याचाच परिणाम म्हणून भारतात 1990 च्या दशकाच्या सुरुवातीपासूनच स्त्री-पुरुष समानता या तत्त्वावर अधिक भर देण्यात आला आणि त्यातूनच 'महिला सक्षमीकरण' ही संकल्पना उदयास आली. महिलांना सशक्त व सक्षम बनविणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय, एवढाच मर्यादित अर्थ या संकल्पनेचा नव्हे. या पुरुषसत्ताक संस्कृतीच्या समाजाचा महिलांना जोपर्यंत पाठिंबा मिळणार नाही, तोपर्यंत महिला सक्षमीकरण ही संकल्पना मूर्त स्वरूपात आणणे शक्य होणार नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) महिला सक्षमीकरण या संकल्पनेचे मूर्त रूप समाजासमोर मांडणे.
2) महिलांमधील आत्मविश्वास जागा करून त्यांच्यात त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची क्षमता निर्माण करणे.
3) महिलांना शिक्षणाचे व रोजगाराच्या दृष्टीने स्वयंसहाय्यता गटांचे महत्त्व स्पष्ट करणे.
4) महिलांच्या माध्यमातून समाजाचा शाश्वत व कायमस्वरूपी विकास घडवून आणणे.

**प्रस्तावना**

स्त्री-पुरुष असमानता हे मानव इतिहासात अन्यायाचे एक निरंतर आणि व्यापक रूप आहे. इतिहासाचा आढावा घेतल्यास वैदिक काळात काही अपवाद वगळता सर्वच काळात स्त्रियांची मानहानी व स्त्रियांवर अत्याचार झाल्याचे दिसून येते. त्यामुळे पूर्वीच्या काळात स्त्रीला 'अबला' म्हटले जात होते. तिच्यावर अनंत रूढी, परंपरा लादून तिला अन्याय सहन करण्यास भाग पाडले जात होते. नंतर मध्यंतरीच्या काळात महिला सबलीकरणाचे वारे वाहू लागल्याने स्त्री ही अबला नसून सबला आहे असा नवीन प्रवाह समाजात रूढ झाला; पण आजच्या एकविसाव्या शतकातील स्त्री ही खऱ्या अर्थाने कितीही सक्षम झाली असली तरी ती पूर्णपणे सुरक्षित आहे, अशी आपण खात्रीने ग्वाही देऊ शकत नाही.

आजच्या आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळातही स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार कमी झालेले दिसून येत नाहीत. महिला म्हणजे केवळ एक भोग वस्तू किंवा समाजातील स्त्रीला असलेले दुय्यम स्थान या दोन्ही दृष्टिकोनांचे समाजातून जोपर्यंत निर्मूलन होणार नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने 'महिला सक्षमीकरण' ही संकल्पना समाजात प्रभावीपणे रुळणार नाही.

**महिला सक्षमीकरण : अर्थ व स्वरूप**

महिला सक्षमीकरण म्हणजे कायद्याच्या पातळीवर महिलांना पुरुषांसारखे समान अधिकार असणे होय. महिलांमधील सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी पोषक वातावरण पुरविणे, महिलांमधील कार्यक्षमतेला वाव देणे, महिलांमधील आत्मविश्वास वाढवून विविध रोजगारांच्या संधीच्या उपलब्धतेतून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी

बनविणे, त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विकास करून प्रत्येक क्षेत्रात त्यांना आत्मनिर्भर बनविणे म्हणजे खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण होय. एकूणच महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांची स्थिती सुधारण्यासाठी महिलांना आर्थिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक दृष्टीने सुदृढ करणे होय.

**महिला सक्षमीकरणासाठीचे कायदे**

स्वातंत्र्यानंतर भारतात महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी योजना व विकासात्मक कार्यक्रम राबविण्यात आले. त्याचबरोबर महिलांना आपल्या अधिकारांची जाणीव होऊन त्या आत्मनिर्भर बनाव्यात व त्यांनी आपल्यावरील अन्याय, अत्याचारांचा विरोध करावा यासाठी अनेक कायदेही बनविले गेले. ते खालील प्रमाणे :

- 1961: प्रसूती सुविधा कायदा
- 1976: बालविवाह निषेध कायदा
- 1976: समान वेतन कायदा
- 1986: स्त्री अनिष्ट निरूपण निषेध कायदा
- 1986: वेश्यावृत्ती निवारण कायदा
- 1986: हुंडा निषेध कायदा
- 1987: सती निषेध कायदा
- 2005: घरगुती हिंसेपासून महिला संरक्षण कायदा
- 2005: हिंदू वारसा कायदा
- 2006: विवाह नोंदणी कायदा
- 2008: घरेलू कामगार विधेयक
- 2023: महिला आरक्षण विधेयक

अशा रीतीने अनेक कायद्यांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर भारतीय संविधानाने आपला प्रभाव पडला आहे.

**महिला सक्षमीकरण काळाची गरज :**

भारताच्या एकूण लोकसंख्येत 50 टक्के वाटा हा महिलांचा आहे; म्हणजे भारत देशाचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असेल तर या 50 टक्के वाटा असणाऱ्या महिलांचा विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या काळात महिला सक्षमीकरण ही अत्यंत गुंतागुंतीची बहुआयामी संकल्पना ही विस्तृत चर्चेचा विषय आहे. आज भारत देश एकविसाव्या शतकात प्रगतीच्या शिखरावर पोहोचलेला असला तरी स्त्री-पुरुष असमानतेचा प्रश्न अद्यापही पाहिजे त्या प्रमाणात सोडवता आलेला नाही, हीच मोठी खंत आहे.

कितीही पुरोगामी देश असला तरी त्या देशाला स्त्रियांशी गैरवर्तन करण्याचा इतिहास आहे. अगदी अमेरिकेसारख्या देशातही महिलांना मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी 1920 हे साल उजाळावे लागले. भारतातील अनेक स्त्रिया आजही घरगुती हिंसाचाराला बळी पडतात आणि सामाजिक दबावापोटी तो हिंसाचार नाईलाजाने सहन करतात. कधी कधी सहनशक्तीची मर्यादा ओलांडली गेली तर प्रतिकार न करता आत्महत्या करतात किंवा त्यांचा घातपात तरी होतो. हे सर्व थांबवायचे असेल तर केवळ कायदाव्यवस्थेत बदल करून चालणार नाही, तर समाजाच्या मानसिकतेत बदल करावा लागेल.

सहाव्या पंचवार्षिक योजनेत शासकीय स्तरावरून महिलाप्रणित ध्येयधोरणे, कार्यक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी खऱ्या अर्थाने सुरू झाली. या कार्यक्रमाला प्रेरणा म्हणून 2001 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' व 8 मार्च हा 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून भारतासह संपूर्ण जगभरात साजरा करण्यास सुरुवात झाली. जागतिक

बँकेच्या अहवालानुसार, महिलांना नोकऱ्यांमध्ये समान वाटा दिल्यास भारताचा GDP हा 9% च्या वर जाऊ शकतो. आणि यामुळेच आज महिला सक्षमीकरणाचे महत्त्व संपूर्ण समाजाने एक प्रकारे मान्यच केले आहे.

सक्षम महिला नेहमी कोणतीही गोष्ट प्रभावीपणे पूर्ण करण्याचा मार्ग शोधतात. त्या अपयशाला घाबरत नाहीत आणि स्वतःचे आर्थिक, भावनिक, मानसिक आणि शारीरिक आरोग्य हाताळण्यासाठी स्वतःवर विश्वास ठेवतात. म्हणून समाजाच्या भल्यासाठी महिलांचे सक्षमीकरण होणे अत्यावश्यक आहे. महिला सबलीकरणाच्या दिशेने सध्या प्रक्रिया सुरू झाली असली तरी खरी प्रगती साधण्यासाठी अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे; त्यामुळे मानव म्हणून आपण सर्वांनी एकमेकांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यातून सर्वांत सकारात्मकता आणण्यासाठी संपूर्ण समाजाने एकत्र येणे नितांत गरजेचे आहे.

**भारतातील महिला सक्षमीकरण :**

भारतीय संविधानाने सुरवातीपासूनच स्त्री-पुरुष समानता हे तत्व स्वीकारले आहे. तसेच 73 व 74 व्या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिलेले 33% आरक्षण हे महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होय. याद्वारा सामाजिक क्षेत्रासोबत राजकीय क्षेत्रातही महिलांचे सक्षमीकरण होण्यास मदत झाली आहे. त्यामुळेच महिला स्वयंस्फूर्तीने व मुक्तपणे निवडणूक प्रचारांमध्ये सहभागी होत आहेत; तसेच स्वतः नेतृत्व करून गावाची, राज्याची व देशाची धोरणे सांभाळत आहेत. याचाच परिणाम म्हणून 11 एप्रिल 2011 रोजी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50% आरक्षण बहाल करण्यात आले आहे. याशिवाय सप्टेंबर 2023 मध्ये 128 व्या घटनादुरुस्तीनुसार नुकतेच 'महिला आरक्षण विधेयक' पारित करण्यात आले आहे. या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतर लोकसभा व राज्यविधानसभा यांमध्येही महिलांना 33% आरक्षण मिळणार आहे.

महिलांचा राजकीय क्षेत्रातील हा सहभाग म्हणजे राजकारणाचे आधुनिकीकरण व महिलांचे सक्षमीकरण होय. याशिवाय विविध कायद्यांद्वाराही महिलांना सुरक्षिततेची हमी देण्यात आली आहे. त्यामुळे आता महिला आपल्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचारांना विरोध करून त्या विरोधात न्यायालयाचे दरवाजे ठोठावू लागल्या आहेत. त्या स्वतःला अबला न समजता बचत गटांच्या माध्यमातून वा विविध नोकरी व उद्योगधंदातून स्वतःला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवीत आहेत. एकंदरीत काही अंशी भारतात महिलांचे सक्षमीकरण साध्य झाले असले; तरी आजची भारतीय स्त्री ही पूर्णपणे सक्षम व सुरक्षित आहे, याची मात्र आपण ग्वाही देऊ शकत नाही.

**महिला सक्षमीकरण : एक संधी**

प्राचीन काळापासून चालत आलेला पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचा वारसा आजही समाजात अस्तित्वात असलेला आपणास दिसून येतो. भारतीय समाजात पूर्वीपासूनच स्त्री ही सुरक्षित नव्हतीच. राष्ट्र विकासात स्त्रियांचे स्थान महत्त्वपूर्ण असूनही स्त्रियांना कायमच दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते. कायद्याने कितीही संरक्षण वा आरक्षण दिले तरीही आजची स्त्री ही काही अंशी घरातील पुरुषांवरच अवलंबून असलेली दिसून येते. अशा या कायमच उपेक्षित जीवन अनुभवलेल्या स्त्रियांसाठी महिला सक्षमीकरण ही एक संधी आहे. या संधीद्वारा ती तिच्या प्रगतीच्या मार्गातील सर्व अडचणींवर मात करून प्रगतीची नवी शिखरे पादाक्रांत करू शकणार आहे; फक्त गरज आहे या संधीकडे सर्वच महिलांनी सकारात्मक दृष्टीने पाहून स्वतःला सिद्ध करण्याची व खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण या संकल्पनेला मूर्त रूप देण्याची.

**महिला सक्षमीकरणासमोरील आव्हाने :**

महिला सक्षमीकरण ही काळाची गरज असली तरी तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही अतिशय आव्हानात्मक आहे. महिला सक्षमीकरणातील काही आव्हाने पुढीलप्रमाणे: **1) स्त्रीशिक्षण :** आजही ग्रामीण भागात मुली म्हणजे 'परक्याचे धन' ही मानसिकता समाजाची असल्याने मुलींच्या शिक्षणाबाबत बऱ्याच वेळा पालक उदासीन असतात.

मुलींचा शैक्षणिक विकासाच खुंटल्याने त्यांचे एक प्रकारे प्रगतीचे पंखच छाटले जाऊन त्या कायमस्वरूपी परावलंबी होतात. शिक्षणाअभावी त्यांच्यातील आत्मविश्वासही कमी झाल्याने त्या सक्षम बनूच शकत नाही.

**2) समाजाची मानसिकता :** आजही पितृसत्ताक भारतीय समाजात स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते. त्यामुळे स्त्री कितीही शिकली किंवा तिने तिचे कर्तृत्व सिद्ध केले तरी तिला घरातील पुरुषवर्गाच्या मर्यादांचे बंधन पाळावेच लागते व तिने ही बंधने झुगारली तर समाज तिला स्वैराचारी संबोधून तिची बदनामी करतो. त्यामुळे जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही व समाज स्त्री-पुरुष समानतेचे तत्व अंगीकारत नाही, तोपर्यंत महिला सक्षमीकरण साधणे शक्य होणार नाही.

**3) आर्थिक परावलंबित्व :** आजही आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असणाऱ्या महिलांचे प्रमाण भारतात अगदी नगण्य आहे. बऱ्याचशा स्त्रिया आजही स्वतःच्या आर्थिक गरजांसाठी घरातील पुरुषांवर अवलंबून असतात. याशिवाय नोकरी करणारी महिला असली तरी तिला मिळणाऱ्या पगाराचा विनियोग करण्याचा अधिकार तिच्या वडिलांना वा पतीलाच असल्याचे बऱ्याच वेळा दिसून येते. तसेच बऱ्याच क्षेत्रांमध्ये समान काम करूनही महिलांना दिला जाणारा मोबदला पुरुषांपेक्षा कमी असतो. त्यामुळे भाग शहरी असो वा ग्रामीण तेथील महिला आजही आर्थिकदृष्ट्या परावलंबी असल्याने त्यांचे सक्षमीकरण साधणे कठीण जाते.

**4) कामाच्या ठिकाणी होणारे शोषण :** आजच्या एकविसाव्या शतकात स्त्री कितीही शिकली व सर्वच क्षेत्रात ती कर्तृत्व गाजवू लागली तरी आजही ती भयमुक्त वातावरणात घराबाहेर पडून सुखरूप घरी परत येईल याची शाश्वती नाही. 'निर्भया प्रकरण', 'Me Too' प्रकरण यांतून आजही महिलांचे कशा पद्धतीने समाजाकडून व कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांकडून शोषण केले जाते हे लक्षात येते. घर सांभाळून आपल्या कामाचे उत्तम व्यवस्थापन करणारी स्त्री ही व्यवस्थापनाचे एक चालते बोलते विद्यापीठच म्हणावे लागेल. पण याच स्त्रीचे जेव्हा शारीरिक, मानसिक शोषण केले जाते तेव्हा मात्र ती कोसळते, स्वतःला हतबल समजते आणि यातूनच तिच्या कर्तुत्वाचा आलेख पुरता मंदावतो. म्हणून जोपर्यंत महिला स्वतःला सुरक्षित समजू शकतील असे वातावरण त्यांना लाभणार नाही तोपर्यंत महिला सक्षमीकरण पूर्णत्वास जाणार नाही.

**5) अंगभूत कौशल्यांचा विकास :** उद्योग, नोकरी, शासकीय, सामाजिक, आरोग्य, संरक्षण अशा सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे योगदान अनन्यसाधारण राहिले आहे. आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून महिला तिच्या आवडीच्या क्षेत्रात कर्तुत्व गाजवत आहेत; पण अशा महिलांची संख्या बोटावर मोजण्याइतकीच आहे. आजही केवळ मुलगी वा महिला आहे, म्हणून तिच्यात गुण असूनही त्या गुणांच्या जोरावर तिला तिचे भवितव्य साकारण्यासाठी कौटुंबिक पाठबळ मिळत नाही. त्यामुळे तिच्या गुणांचा विकास न झाल्याने ती स्वतःची प्रगती साधू शकत नाही आणि यामुळेच ती सक्षम होऊ शकत नाही.

**महिला सक्षमीकरणासाठीचे उपाय:**

भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि अधिकार हा महिलांच्या विकासाचा पाया आहे; तथापि महिलांकडे बघण्याचा समाजाचा आणि शासनाचा दृष्टिकोन प्रामुख्याने कल्याणकारी उपक्रमांच्या लाभार्थी असाच राहिला आहे. महिला या विकास प्रक्रियेचा अविभाज्य घटक आहेत, या तत्त्वाकडेच मुळात दुर्लक्ष झाले आहे. आणि त्यामुळेच महिला सक्षमीकरण ही संकल्पना आजही 100% यशस्वीरित्या अंमलात आणणे शक्य होत नाही. तेव्हा खऱ्या अर्थाने 'महिला सक्षमीकरण' ही संकल्पना प्रत्यक्षात आणावयाची असेल तर खालील उपाययोजना करणे गरजेचे आहे:

- मुलींना शिक्षण देण्यासाठी त्यांच्या पालकांना प्रवृत्त केले पाहिजे.
- पुरुषसत्ताक समाजाची मानसिकता बदलण्यासाठी व स्त्री-पुरुष समानता हे तत्त्व रुजविण्यासाठी केवळ कायद्याच्या धाकाऐवजी समाज स्वतःहून या गोष्टी स्वीकारेल यासाठी प्रभावी समाज प्रबोधन केले पाहिजे.

• महिलांना स्वतःच्या हक्काची जाणीव करून दिली पाहिजे.

• महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे.

• महिलांवरील होणाऱ्या अन्याय व अत्याचारांना कारणीभूत असणाऱ्या दोषींना लवकरात लवकर व कठोर शिक्षा कशी देता येईल यासाठी न्यायव्यवस्थेत अनुरूप बदल केले पाहिजेत.

• घराबाहेर महिलांना सुरक्षित वातावरण पुरविण्यासाठी समाजाची महिलांविषयीची मानसिकता व कायद्याचा धाक यांचा संमिश्र वापर केला पाहिजे.

• महिलांमधील आत्मविश्वास वाढवून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी महिलांचे खासकरून ग्रामीण भागातील महिलांचे नियमित प्रबोधन होण्यासाठी विविध उपक्रम राबविले पाहिजेत.

**निष्कर्ष**

भारत देशाची वाटचाली विकसनशीलतेकडून महासत्ताक होण्याकडे सुरू आहे. जर भारताचे महासत्ताक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारायचे असेल तर भारतातील महिलांचे सक्षमीकरण होणे क्रमप्राप्तच आहे; कारण जोपर्यंत 50 टक्के वाटा असणाऱ्या महिलांची प्रगती होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास साधणे अशक्यप्राय आहे. कुटुंबातील सक्षम महिला कुटुंबाचा विकास साधतील आणि सक्षम कुटुंब देशाला विकासाच्या प्रगतीपथावर नेतील हेच शाश्वत सत्य आहे आणि त्यासाठीच महिला सक्षमीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भ

"Women's Empowerment." Wikipedia. <https://en.wikipedia.org>.

कढव, प्रा.डॉ. गजेंद्र."भारतातील महिला सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची सद्यस्थिती." JETIR 7.2 (2020): 105-108.

कोरडे, डॉ. अशोक. "महिला सबलीकरण एक सामाजिक आणि आर्थिक क्रांती." JETIR 7.2 (2020): 91-95.

गायकवाड, प्रविण भास्कर. "महिलांचे आरोग्य व शिक्षण: समस्या व उपाय" : International Journal of Creative Research Thoughts 9.7 ( 2021): 177-185.

तितरे,प्रा.डॉ. प्रकाश बाबुराव. "शाश्वत मानवी विकासाकरिता लैंगिक समानता." Our Heritage 68.5 : 999-1003.

देवळेकर, रुपाली सुरेश. "जागतिकीकरणाच्या काळात महिला सक्षमीकरणातील आव्हाने सहाय्यता बचत गट एक उपाय." Challenges before Indian Economy in Global Era. Dombivli, 2016. 239-244.

देशमुख, प्रा. नीलिमा. "महिला सबलीकरण मानके आणि आव्हाने" : दिव्य मराठी एप्रिल 2023.

नंदनवार, डॉ. मधुकर वि. "आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण." International Journal of Advance and Applied Research 2.11 (2002): 9-11.

पवार, डॉ. दयाराम "शैक्षणिक दृष्टीकोनातून पंचायतराज आणि महिला सक्षमीकरण." B. Aadhar 276-B (March, 2021): 60-63.

पानगव्हाणे, राजाराम. "महिला सक्षमीकरणातील अडथळे" सकाळ 22 ऑक्टोंबर 2023.

"महिला : शिक्षण रोजगार, सक्षमीकरण." 21 ऑगस्ट 2023. ORF. <https://www.orfonline.org>.

महिला धोरण, 2014. मुंबई: महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, 2014.

रहाटकर, विजया. साद. मुंबई: महाराष्ट्र राज्य महिला आयोग 2018.

लाखे, प्रा. डॉ. पी.एस. "आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण एक काळाची गरज." Journal of Research & Development 14.8 (July, 2022): 11-16.

संपादकीय. "भारतातील महिला सक्षमीकरण : प्रगती आणि आव्हाने".19 डिसेंबर 2023. वेब मराठी. <https://www.webmarathi.com>.

सिंगल, जयसिंग पी. "महिला सशक्तीकरण." Ed. Mr. Sainath Radhesham Bansode. Auragabad: New Voices Publication, 2016. 110-116.

"स्त्री सक्षमीकरण." विकिपीडिया. <https://mr.wikipedia.org>.

- K., "ISC Economics," Kalyani Publishers, New Delhi, Noida, Vol. II, pp.643-4.
- Sethi, Priya (2009), "Women entrepreneurship in small scale industries", UPUEA Economic Journal, Vol-5, Conference No-5, pp-351
- The Indian Economic Association, Part II, 91st Annual Conference Volume.
- The Journal of Entrepreneurship, January-June (2002), Vol. II, No.1 and 2.
- UPUEA Economic Journal, VOL-3, Conference No.-3

ISSN : 2278-9308
February 2024

# महिला सक्षमीकरणात शिक्षणाचे महत्व (जळगाव जिल्हा विशेष संदर्भ)

**प्रा. सुनीता अरविंद जगताप**
मानसशास्त्र विभाग प्रमुख, बी. पी. कला, एस. एम. ए. विज्ञान, के. के. सी. वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र),मो. ९४२३७७००१०

**प्रस्तावना**

स्त्री ही भिजविलेल्या कणकेसारखी असते, बाहेर ठेवल्यास कावळे चोची मारतात व घरात ठेवल्यास उंदीर कुरतडतात. स्त्री जीवनाची कथा मांडणारे हे उद्गार आहेत जेष्ठ पंजाबी साहित्यीक अमृता प्रीतम यांचे. आजच्या समाज जीवनात स्त्री संबधी भारत देशात अनेक प्रश्न चर्चीले जातात. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्योत्तर काळातही भारतासारख्या फार मोठ्या संस्कृतीचा वारसा असणाऱ्या देशात अगदी वेद संस्कृतीपासुन स्त्रियांचा आदर केला जातो. भारतीय स्त्रियांच्या गौरवशाली आणि वैभवशाली परंपरेतुन वीरमाता जिजाऊ, महाराणी ताराबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, मदर टेरेसा, स्व. इंदिरा गांधी, किरण बेदी, पी. टी. उषा, विजयालक्ष्मी पंडीत, लता मंगेशकर, मीर साहेब फातीमा बीबी, सरोजिनी नायडू, उषा मेहता, मेधा पाटकर, कल्पना चावला, शबाना आझमी, हेमा मालिनी, जया प्रदा, सुस्मिता सेन, ऐश्वर्या रॉय या स्त्रियांचे नाव शैक्षणिक, राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक, प्रशासकीय, दुरदर्शन, इ. क्षेत्रात जागतिक पटलावर जाऊन पोहोचली आहेत. सध्याच्या भारतीय राजकारणात मायावती, ममता बॅनर्जी, प्रतिभा पाटील, जयललिता, निर्मला सितारमन यांची नावे चर्चिली जातात. सध्याच आपण देशाचा सुवर्ण महोत्सव साजरा केलेला आहे. जवळ जवळ पुरुष संख्यात्मक आणि गुणात्मक असलेला महिला वर्ग अजुनही खऱ्या अर्थात सीमा आणि राजकिय प्रवाहात येऊ शकला नाही व स्त्रियांना फक्त चुल आणि मुल सांभाळणे ही संकल्पना वाढीस लागली.

महात्मा गांधीजींचे स्वप्न होते की, या देशाची प्रगती करायची असेल तर खेड्यापासून सुरुवात करायला हवी कारण भारत हा 70% खेडी असलेला देश आहे. महिला नेतृत्वाचा पाठपुरावा आणि समानाधिकार देण्याबाबतचा आग्रह हीच गांधीजींची स्त्रियांना देणगी होती. 1925 साली त्यांनी मत व्यक्त केले होते की, जोपर्यंत या देशातील स्त्रिया सामाजिक जीवनात सहभाग घेत नाही तोपर्यंत या देशाला मुक्ती नाही आणि ज्या स्वराज्यात स्त्रियांना पूर्ण सहभाग नाही ते स्वराज्य काहीच कामाचे नाही.

**संशोधनाची उदिष्टये :**

1. महिला सक्षमीकरणाचे जिल्ह्याच्या विकासातील माध्यम स्पष्ट करणे.
2. जळगाव जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणाच्या वर्तमान स्थितीचे अध्ययन करणे.
3. जळगाव जिल्हयातील नोकरी करणाऱ्या महिला कर्मचारी वर्गाचे अध्ययन करणे.

**गृहितके:-**

1. जळगाव जिल्ह्याच्या आर्थिक विकासात महिलांच्या सहभागात वाढ होत आहे.
2. जळगाव जिल्ह्याच्या सरकारी व खाजगी नोकरी करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढ होत आहे.
3. जळगाव जिल्ह्याच्या सर्वांगीण व इतर क्षेत्रात महिलांचे योगदान पुरुषांच्या बरोबरीचे दिसून येते.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व व्दितीय साधन सामुग्रीचा वापर केला असून प्राथमिक साधनात जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, सर्वेक्षण

पध्दतींचा अवलंब करून तथ्य संकलन केलेले आहे. व्दितीय साधन सामुग्रीत विविध ग्रंथ, अहवाल, मासिके, वर्तमान पत्रे, वेबसाईट यांचा आधार घेण्यात आला आहे

जगात वर्षानुवर्षे चालत आलेल्या पुरुष प्रधान संस्कृतीमुळे एकुण साक्षरतेमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण नेहमी कमी दिसुन येते. याला अपवाद भारत देश सुध्दा नाही. भारतात केरळ राज्य वगळता इतर सर्व राज्यांमध्ये स्त्री साक्षरता पुरुषांपेक्षा कमी दिसुन येते. भारतात 1951 मध्ये एकुण साक्षरता 18.15% होती. यात देखील पुरुषांची साक्षरता 29.16% तर स्त्री साक्षरता केवळ 8.96% एवढी होती. हेच प्रमाण 2011 मध्ये एकुण साक्षरता 76.4% यात पुरुष साक्षरता 85.24% तर स्त्री साक्षरता 69.46% एवढी होती. अशाच प्रकारची परीस्थीती महाराष्ट्र राज्यातील जळगाव जिल्ह्यात देखील दिसुन येते. असे असले तरी देखील जळगाव जिल्ह्यात महिला सक्षमीकरणाला काही प्रमाणात गती प्राप्त झाल्यामुळे त्यांचा अनुभव जळगाव जिल्ह्यातील वेगवेगळया क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या संख्येमध्ये वाढ होत असल्याचे दिसुन येते. एका सर्वेक्षणाच्या आधारे जळगाव जिल्ह्या माध्यमिक शाळांमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे अध्ययन संशोधन करण्यात आले त्यातील प्राप्त माहीती पुढील प्रमाणे -

**सारणी क्र. 1**

**निवेदकांच्या मुलींची शिक्षणाबद्दल मत दर्शविणारी सारणी**

संशोधन करीत प्रत्येक निवेदकाला संशोधिकेने मुलींच्या शिक्षणाबद्दल मत विचारले असता त्यांनी पुढीलप्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे. ते खालील प्रमाणे –

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 36 | 100 % |
| 2 | नाही | 00 | 0 % |
| | एकूण | 36 | 100 % |

**स्रोत** - प्राथमिक तथ्य संकलन

प्रस्तुत सारणी वरून असे दिसुन येते की, अध्ययनासाठी घेतलेल्या एकुण 36 निवेदकांपैकी मुलींनी शिक्षण घ्यावे. असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या 36 असून त्यांचे शेकडा प्रमाण 100% आहे, तर मुलींनी शिक्षण घेऊ नये असे कोणत्याही निवेदकाने सांगितले नाही.

**सारणी क्र. 2**

**निवेदकांच्या मुलींनी कोणत्याही कारणासाठी शिक्षण घ्यावे हे मत दर्शविणारी सारणी**

संशोधन करीत असतांना प्रत्येक निवेदकाला संशोधिकेने शिक्षण घेण्याविषयीचे मत विचारले असता पुढील प्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे –

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | चांगली नोकरी मिळेल | 2 | 6% |
| 2 | शिक्षणाने प्रगती होईल | 6 | 17% |
| 3 | आर्थिक स्तर उंचावण्यासाठी | 22 | 63% |
| 4 | शिकुन चांगले लग्नाचे स्थळ मिळण्यासाठी | 6 | 14% |
| | एकूण | 36 | 100% |

**स्रोत** - प्राथमिक तथ्य संकलन

प्रस्तुत सारणीवरुन असे दिसुन येते की, अध्ययनासाठी घेतलेल्या एकुण 36 निवेदकांपैकी 2 निवेदकांना असे वाटते की मुलींनी शिक्षण चांगली नोकरी मिळवण्यासाठी करावे. त्याचे शेकडा प्रमाण 6% आहे, तर 6 निवेदकांचे मत

आहे की, मुलींनी शिक्षण घेतल्यामुळे त्यांची प्रगती होईल त्यांचे शेकडा प्रमाण 17% आहे. तर 22 निवेदकांचे मत आहे की मुलींनी शिक्षण घेतल्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदत होईल त्याचे शेकडा प्रमाण 63% आहे. तर 5 निवेदकांचे मत आहे की मुलींनी शिक्षण घेतल्यामुळे चांगले लग्नाचे स्थळ मिळवण्यासाठी त्यांचे शेकड़ा प्रमाण 14% आहे.

**सारणी क्र. 3**

**निवेदकांची शैक्षणिक प्रगती दर्शविणारी सारणी**

सदर संशोधन करीत असतांना प्रत्येक निवेदकाला संशोधिकेने शैक्षणिक प्रगती संदर्भात तिचे मत विचारले असता पुढील प्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे –

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | शैक्षणिक प्रगती होत आहे | 24 | 69% |
| 2 | प्रगतीच्या मार्गावर आहे | 11 | 30% |
| 3 | प्रगती नाही | 0 | 0% |
| 4 | तटस्थ | 1 | 1% |
| | एकूण | 36 | 100% |

**स्रोत** - प्राथमिक तथ्य संकलन

प्रस्तुत सारणीवरुन असे दिसुन येते की, अध्ययनासाठी घेतलेल्या एकुण 36 निवेदकांपैकी काही निवेदकांना असे वाटते की मुलींची शैक्षणिक प्रगती होत आहे असे मत सांगणाऱ्या निवेदकांची संख्या 24 त्यांचे शेकडा प्रमाण 69% आहे. तर काही निवेदकांच्या मते मुलींनी शैक्षणिक प्रगतीच्या मार्गावर आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या 11 त्यांचे शेकडा प्रमाण 30% आहे तर मुलीची प्रगती होत नाही असे सांगणारे एक ही निवेदक नाही व प्रगती तटस्थ आहे असे सांगणाऱ्या निवेदकाची संख्या 1 असून त्यांचे शेकडा प्रमाण 1% आहे.

**सारणी क्र.4**

**निवेदकांच्या कुटूंबातील स्त्रियांची स्थिती दर्शविणारी सारणी**

सदर संशोधन करीत असतांना प्रत्येक निवेदकाला संशोधिकेने तिचे मत विचारले असता पुढीलप्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे ते खालील प्रमाणे –

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | उच्च | 7 | 22% |
| 2 | मध्यम | 28 | 77% |
| 3 | कनिष्ठ | 01 | 1% |
| | एकूण | 36 | 100% |

**स्रोत** – प्राथमिक तथ्य संकलन

प्रस्तुत सारणीवरुन असे दिसुन येते की, अध्ययनासाठी घेतलेल्या एकुण 36 निवेदकांपैकी कुटुंबामध्ये उच्च स्थान असणाऱ्या निवेदकांची संख्या 7 असुन त्यांचे शेकडा प्रमाण 22% आहे तर काही निवेदकांची कुटुंबामध्ये मध्यस्थान असणाऱ्या निवेदकांची संख्या 28 असुन त्यांचे शेकडा प्रमाण 77% आहे तर काही निवेदकांचे कुटुंबातील कनिष्ठ स्थान असणाऱ्या निवेदकांची संख्या 1 असुन त्यांचे शेकडा प्रमाण 1% आहे.

**सारणी क्र. 5**

**शिक्षणामुळे महिला सक्षमीकरण होते हे दर्शविणारे सारणी**

सदर संशोधन करीत असतांना प्रत्येक निवेदकाला संशोधिकेने महिला सक्षमीकरण बद्दल विचारले असता त्यांनी पुढीलप्रमाणे आपले मत व्यक्त केले –

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | अनेक क्षेत्रात संधी | 9 | 25% |
| 2 | राहणीमानात बदल | 10 | 28% |
| 3 | सर्वांगीण विकासाला चालना | 9 | 25% |
| 4 | समानता प्रस्थापित होते | 8 | 24% |
| | एकूण | 36 | 100% |

**स्रोत** : प्राथमिक तथ्य संकलन

प्रस्तुत सारणी वरून असे दिसुन येते की, अध्ययनासाठी घेतलेल्या एकूण 36 निवेदकांपैकी काही निवेदकांचे मत असे आहे की शिक्षणामुळे स्त्रियांना अनेक क्षेत्रात संधी मिळते. असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या 9 असुन त्यांचे शेकडा प्रमाण 25% आहे. तर शिक्षणामुळे समानता प्रस्थापित होत असे सांगणाऱ्यांची संख्या 8 असुन शेकडा प्रमाण 24% आहे. तर शिक्षणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारतो असे मत असणाऱ्या निवेदकाची संख्या 10 असुन त्यांचे शेकडा प्रमाण 28% आहे तर शिक्षणामुळे महिलांचा सर्वांगीण विकास होतो असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या 9 असुन त्यांचे शेकडा प्रमाण 25% आहे.

**निष्कर्ष :-**

जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमध्ये कार्य करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या मते महिलांचा आर्थिक स्वालंबन होण्यासाठी तसेच स्वत: निर्णय क्षमता वाढविण्यासाठी शिक्षण हे माध्यम महत्वाचे आहे. म्हणून महिलांची साक्षरता वाढविणे गरजेचे आहे. मुलींनी शिक्षण घ्यावे, असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या 100% दिसुन आली तसेच मुलींनी जास्तीत जास्त उच्च शिक्षण घ्यावे. उच्च शिक्षण घेऊन नोकरीच्या संधी प्राप्त कराव्यात. नोकरीच्या संधी प्राप्त करुन आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करुन राहणीमानाचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करावा, असे मत व्यक्त करण्यात आले. महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा प्रसार होऊन आर्थिक गरजा पूर्ण कराव्यात असे मत व्यक्त करण्यात आले. महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षणामुळे आर्थिक स्वावलंबन निर्माण व्हावे असे जास्तीत जास्त निवेदकांना वाटल्याचा निष्कर्ष समोर आला.

**संदर्भ सूची :-**

1. गाडगीळ - सहकारी अर्थव्यवस्था सुलभ ब्रम्हे, संपादित लेखसंग्रह, खंड-2, गोखले इस्टिट्युट, पुणे मराठी प्रकाशन-1974
2. सहकार आयुक्त व निबंधन, सहकारी संख्या महाराष्ट्र राज्य पुणे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ -एक दृष्टीक्षेपात, 2011, 48 व लेख
3. मॅक्लेगन - सहकार समिती अहवाल 1915, प्रा. क्षिरसागर हवलदार
4. जळगाव जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2021-22
5. गायकवाड इ. डी. - सिंहावलोकन सहकार चळवळीचे लेख दै. लोकमत दि. 25 मार्च 2020

# महिला सक्षमीकरण व नवआधुनिक काळातील महिलांच्या सामाजिक समस्या

**डॉ. दिपक प्रकाश महाजन**
सहा. प्राध्यापक, धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव. ,ई-मेल-dmahajan10@gmail.com ,भ्रमणध्वनी क्र.9923079079,9766880166

**गोषवारा-(Abstract)-**

महिला या देशाच्या लोकसंख्येचा अर्धा हिस्सा आहे. आज औद्योगीकरण व आधुनिकीकरणाच्या युगात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर होताना दिसत आहेत. कारण परंपरागत भारतीय समाजामध्ये स्त्रियांच्या संदर्भात विविध अनिष्ट प्रथा अस्तित्वात होत्या जसे सती प्रथा, स्त्रियांना कुठले अधिकार नव्हते, स्त्री शिक्षण,विधवा विवाहाला मान्यता नव्हती,बालविवाह प्रचलित होता,बाल जरठ विवाह, बहुपत्नीत्व पद्धत अस्तित्वात होती, स्त्रियांना वारसा हक्क नव्हता, शिक्षणाचा हक्क नव्हता, देवदासी प्रथा, विधवा पुनर्विवाह बंदी, पडदा प्रथा अस्तित्वात होती, हुंडा पद्धत होती इत्यादी विविध अनिष्ट प्रथा परंपरा भारतीय समाजात होत्या रूढीवाद परंपरावाद यानुसार जीवन होते परंतु हजारो वर्षाच्या या पुरुष प्रधान परंपरेनुसार आजही महिलांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले दिसते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय स्त्रियांना सामाजिक आर्थिक राजकीय रूपात विकासाच्या समान संधी देण्यासाठी राज्यघटनेत अधिकार व हक्क देऊन काही खास व्यवस्था केल्या आहेत. या दृष्टीने जगभरातील महिला संघटनांनी महिलांचे हक्क आणि त्यांच्या न्यायासाठी विचार मांडले.महिलांना देशाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करून त्यांचे सहकार्य घेण्यासाठी शासनाने महिलां विषयक विविध कायदे व कल्याणकारी योजना निर्माण केल्या. वेगवेगळे संकल्प तसेच धोरणे आखली गेली.आजच्या आधुनिक स्त्रीयांना देखिल विविध नवआधुनिक सामाजिक समस्याना सामोरे जावे लागत असल्यामुळे त्यांच्या सबलीकरणात अडथळे निर्माण होत आहे.

**मुख्यशब्द-(Key Words)-** महिला सक्षमीकरण, नव आधुनिक काळ ,सामाजिक कायदे,सामाजिक समस्या.

**संशोधनाचे उद्देश-(Objectives of the Study)-**

1)महिला सक्षमीकरण संकल्पना अभ्यासणे.

2) नवआधुनिक काळातील महिलांविषयक विविध सामाजिक समस्यांची माहिती घेणे.

3)नवआधुनिक काळातील सामाजिक समस्या व महिला सक्षमीकरणाच्या संबधाचे विश्लेषण करणे.

**गृहीतकृत्य-(Hypothesis)-**

1) समाजातील महिलांविषयक परंपरागत दुय्यम व हिनवागणुकीतून निर्माण झालेल्या अनिष्ट प्रथा परंपरांप्रमाणेच नव आधुनिक काळातसुद्धा स्त्रीयांना विविध सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

2) महिलांसाठी अनेक संविधानिक तरतुदी , कायदे , कल्याणकारी धोरणं व कार्यक्रम असून देखील नवा आधुनिक सामाजिक समस्यांमुळे महिला सक्षमीकरणास अडथळे निर्माण होत आहेत.

**संशोधन पद्धती-(Research Methodology)-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी संशोधकाने महिला सक्षमीकरण व नवआधुनिक काळातील महिलांच्या सामाजिक समस्यां ही मुख्य संकल्पना विचारात घेऊन परंपरागत अनिष्ट प्रथा परंपरांमधून निर्माण महिलांविषयक सामाजिक मनोभूमिका, संविधानिक व कायदेशीर तरतुदी, नवआधुनिक काळातील स्त्रीयांच्या सामाजिक समस्या, महिलांना दिली जाणारी दुय्यम व हिन वागणूक.सामाजिक समस्यांमुळे महिला सक्षमीकरणास अडथळे इत्यादी बाबींवर आधारित दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

विषय विवेचन-(Subject Discussion)-

आज आपल्या स्वातंत्र्याच्या 76 व्या वर्षानंतरही स्त्रीयांचे सबलीकरण झालेले दिसून येत नाही. आजही महिलाचे सबलीकरण होऊन विकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढेल या हेतूने सर्व समावेशक विकास करून त्यांना विकासाच्या प्रमुख विकासधारेत आणण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत. महिला सक्षमीकरण म्हणजे 'महिलांना ज्ञान, कौशल्ये, संसाधने आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात सहभागी होण्यासाठी आणि लैंगिक असमानतेला आव्हान देण्यासाठी सुसज्ज करण्याची प्रक्रिया' परंतु अजूनही लांबचा पल्ला गाठायचा आहे. काळानुसार समाजात मोठे बदल होत आहेत जीवन आणि विचारशैली,औद्योगिक व तंत्रज्ञान विकास संगणक क्रांती यासारख्या अनेक अमुलाग्र बदल भारतीय परंपरागत समाजास प्रभावित करत आहेत एका दृष्टीने ते प्रगतीचे प्रतीक असून राष्ट्राच्या प्रभावशाली अस्तित्वाचा ठसा उमटत असले तरी त्याचे जसे फायदे आहेत तसे तोटेसुद्धा आहेत.

भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्री व पुरुषांना सामाजिक, आर्थिक, तसेच राजकीय न्याय देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. या दृष्टीने स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना सामाजिक आर्थिक राजकीय रूपात विकासाच्या समान संधीसाठी काही खास व्यवस्था केले आहेत. शासनाद्वारे स्त्रियांची आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक आणि राजकीय स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना व विकासात्मक कार्यक्रम राबवले गेले स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध केल्या गेल्या त्यातून त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देत त्यांच्यात सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून आत्मनिर्भरता व स्वावलंबी जीवन जगण्याची प्रेरणा निर्माण केल्या आहेत त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. महिलांच्या रक्षणासाठी विविध कायदे केलेले आहेत उदाहरणार्थ विवाह संबंधित कायदे, फौजदारी कायदे, दलित आणि मागासवर्गीय स्त्रियांसाठीचे कायदे अपंग व्यक्तींसाठी चे कायदे, व काही इतर कायद्यांचा समावेश महिलांच्या रक्षणासाठी करण्यात आला आहे.जागतिक पातळीवरील परिषदांमधून समता विकास आणि शांततेवर भर देत संपूर्ण जगाचे लक्ष महिलांच्या प्रश्नांकडे केंद्रित केले गेले. जागतिक पातळीवर परिषदांमध्ये विविध चर्चासत्रे आयोजित करण्यात आली या चर्चासत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध देशातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होऊन मंथन होऊन स्त्री समानतेसाठी जागतिक पातळीवर आघाड्या निर्माण करण्यात आल्या. यासंदर्भात प्रत्यक्ष कृतीमंच स्थापन करण्याची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांनी घेतली स्त्रीयांबाबतच्या सर्व प्रकारच्या भेदभावाचे उच्चाटन करण्यासाठी सीडॉ(कन्वेंशन ऑन द इलिमीनेशन ऑफ ऑल फॉर्मस ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स वुमन(CEADAW) हा दस्तऐवज आंतरराष्ट्रीय संघटनेने स्वीकारला. स्त्रियांचे हक्क निश्चित करण्याबाबत संयुक्त राष्ट्रांनी महिला आयोग या संस्थेची निर्मिती केली भारताने 9 जुलै 1993 मध्ये या दस्तऐवजावर स्वाक्षरी केली.आयोग स्त्रियांच्या प्रश्नांवर कार्यरत आहे. या आधारे जागतिक पातळीवर स्त्रीयांविषयक परिषदांमधून समता,विकास आणि शांततेवर भर देऊन सर्व जगाचे लक्ष महिलांच्या प्रश्नांकडे केंद्रित केले गेले.1990 मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना तसेच दुर्बल घटकांच्या विशेष गरजांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी महिला व बालविकास हे स्वतंत्र मंत्रालय, राष्ट्रीय समिती, महिला आर्थिक विकास महामंडळ, आर्थिक बचत गट, राष्ट्रीय महिला कोश, शासनाचे वेगळे कायदे, धोरणे, आयोग, समित्या प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये तरतूद करून आयआरडीपी व्दाक्रा, इजीएस, जेआरवाय, याबरोबरच अलीकडच्या काळात अद्याप पर्यंत महिलांविषयी 22 कायदे आणि स्त्रियांना संरक्षण देणारे भारतीय दंड विधानातील 25 विशेष कायदे आणले गेले आहेत. महिलांबाबत केलेले कायदे व न्यायालयीन शिफारशींसोबत विकसनशील दृष्टिकोनावर आधारित महिला धोरणाची निर्माण करण्यात आली आहे. बेटी बचाव बेटी पढाव, सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, जननी सुरक्षा योजना, सर्व शिक्षा अभियान,महिला ई-हॉट,राष्ट्रीय महिला कोष, विद्यांजली योजना, उडान योजना, प्रधानमंत्री विद्यालक्ष्मी कार्यक्रम,

ISSN : 2278-9308
February 2024

मनरेगा इत्यादी कायदे व योजना यामागचा हेतू महिलांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत सुधारणा होऊन महिला सबलीकरण घडून येईल,मात्र प्रत्यक्षात आजच्या नवआधुनिक काळात महिलाना अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. उदा. हुंडा पद्धत, कन्या भ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसाचार, अनैतिक देह व्यापार, लिंग स्थापत्नभाव, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, स्त्री अत्याचार, कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) एआय अंतर्गत डीप फेकचा धोका इत्यादी नवआधुनिक सामाजिक समस्यांमुळे स्त्रियांच्या सबलीकरणास अडथळा निर्माण होत आहे.

**निष्कर्ष**-(Conclusion)-

स्त्री केवळ उपभोग्य वस्तू आहे असे मानणारा समाज प्राचीन काळापासून अस्तित्वात असून आधुनिक काळातही ही वृत्ती पूर्णपणे संपुष्टात आलेली नाही. आधुनिक काळात जगण्यातील नीती मूल्यांच्या घसरणीमुळे आणि वाढत्या औद्योगिक विकासामुळे स्त्रीयांच्या अवहेलनेत व सामाजिक समस्यांमध्ये काळानुसार वाढ होत असून विविध कल्याणकारी योजना व कायदे जरी करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात मात्र महिलां विषयक गुन्हे रोखण्यास असमर्थता निर्माण होत आहे. या सर्व नवसामाजिक समस्यांमुळेच स्त्रीयांच्या सबलीकरणात अडथळा निर्माण होत आहेत. स्त्रियांच्या परिपूर्ण सबलीकरणासाठी फक्त कल्याणकारी योजना व कायदे करून त्यांची सक्तीने अंमलबजावणी करून चालणार नाही तर भावी पिढ्यांच्या विचारसरणी व मानसिकतेत बदल घडवून आणून नवीन धोरण आखण्याची गरजेचं आहे. तेव्हाच देशातील स्त्रीयांचे परिपूर्ण सबलीकरण खऱ्या अर्थाने होऊ शकेल.

**संदर्भ ग्रंथ**-(References)-

**पुस्तकं-**

•आगलावे प्रदीप, आगलावे सरोज, (जुलै 2018) प्रथम आवृत्ती,"भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या"नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन.

•कर्वे स्वाती, (ऑगस्ट 2003)प्रथम आवृत्ती,"स्त्री विकासाच्या पाऊलखुणा"पुणे : प्रतिमा प्रकाशन.

• कोतापल्ले लक्ष्मण, (जुलै 2000) प्रथम आवृत्ती,"सामाजिक प्रशासन"नांदेड: कल्पना प्रकाशन.

•टाकसाळे प्राजक्ता, (2007) प्रथम आवृत्ती,"व्यवसायिक समाजकार्य विचारधारा व इतिहास"नागपूर : श्री मंगेश प्रकाशन

• साळीवकर संजय,(2016) प्रथम आवृत्ती,"सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळ"नागपूर: श्री मंगेश प्रकाशन.

महिला व बाल विकास आयुक्तालय, माहिती पुस्तिका पृष्ठ क्र. 4,ते 14, 15 ते 20

**मासिक –**

• योजना 'वर्तमान काळात महिला अधिकारांच्या संरक्षणाचे स्वरूप' मांजरे आर. एम. एप्रिल 2007 पृष्ठ क्र. 47 .

लोकराज्य (तिला वाचवा भविष्य घडवा) 'महिलांसाठीचे कायदे' तुरकर चंद्रसेन सप्टेंबर 2011 पृष्ठ क्र. 16

**वृत्तपत्रे-**

दै दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव घोडेस्वार प्रवीण दि. 10 डिसेंबर 2015 पृ. क्र.6

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव गोरे अशा दि. 27 डिसेंबर 2022. पृ. क्र.4

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव गीताली वि.म. दि. 28 मार्च 2023. पृ. क्र.4

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव देशमुख नीलिमा दि. 20 जून 2023. पृ. क्र.3

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव पंडित प्रज्ञा दि. 11 जुलै 2023. पृ. क्र.2

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव देशमुख नीलिमा दि. 21 नोव्हेंबर 2023. पृ. क्र.3

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव वायकर यशवंत दि. 23 मे 2023. पृ. क्र.1

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव देशमुख नीलिमा दि. 23 मे 2023. पृ. क्र.3

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव देशमुख नीलिमा दि. 5 डिसेंबर 2023. पृ. क्र.3

दै. दिव्य मराठी, (मधुरिमा) जळगाव देशमुख नीलिमा दि. 19 डिसेंबर 2023. पृ. क्र.3

# ' महानुभाव संप्रदाय आणि स्त्री स्वातंत्र्य '

**डॉ. वासुदेव एस. वले**
मार्गदर्शक
एस.एस.एम.एम.महाविद्यालय
पाचोरा,ता.पाचोरा जि.जळगाव

**श्री. अधिकराव महारु पाटील**
संशोधक विद्यार्थी
मु.पो.कनाशी ता.भडगाव
जि.जळगाव मो.९०९६६८०५५४

---

**प्रास्ताविक :-**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. अनेक संत, समाज सुधारक या देशाला, जगाला या भूमीने दिले अशी ही पावनभूमी, या भूमीत राहणारी जनताही साधी भोळी आणि यांच्या भोळेपणाचा फायदा घेणारेही अनेक म्हणूनच या भूमीत साधुसंतांनी जन्म घेतला आणि परमेश्वराने अवतार, सहाजिकच या भूमीत अनेक धर्म संप्रदाय उदयास आले हे धर्म संप्रदाय उदयास येण्याचा खरा केंद्रित कालखंड आपणास दिसून येतो तो म्हणजे अकराव्या ते बाराव्या शतकातील कालखंड या कालखंडात यादव राजाची सत्ता महाराष्ट्रात होती. कर्मकांडाचे आणि विधी विधानांचे स्तोम माजलेले होते. यादव राजा हे स्वतःच वैदिक कर्मकांडाचे पुरस्कारकर्ते होते. त्यामुळे अगोदर ज्या रुढीपरंपरा जीर्ण झाल्या होत्या त्या पुन्हा पुनर्जीवित होऊ लागल्या याची सर्वात जास्त झळ बसली असेल तर ती स्त्रियांना जास्त बसली कारण सगळी बंधने सगळ्या परंपरा व्रतादिकार्य स्त्रियांनाच करावी लागायची. बहुपत्नीत्व, सतीची चाल या व अशा अनेक चालीरीती त्यांनाच पाळाव्या लागत त्या काळातील समाजमनावर पुरुष हा स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ असे बिंबवल्यामुळे पुरुष स्त्रियांना आपली मालमत्ता समजत पुरुषांकडून स्त्रियांना हीन वागणूक मिळत होती. त्यामुळे समाजात स्त्री-पुरुष असमानता वाढू लागली.

**संशोधनाचा हेतू / उद्देश :-**

१) महानुभाव पंथ आणि स्त्री स्वातंत्र्य यांचा संबंध शोधणे
२) महानुभाव पंथाच्या आचरणात असलेली स्त्रियांची भूमिका समजून घेणे
३) महानुभाव पंथात स्त्रियांना दिला जाणारा पुरुषांबरोबरचा हक्क शोधणे

**संशोधन पद्धती:-**

' महानुभाव संप्रदाय आणि स्त्री स्वातंत्र्य ' या विषयावरील शोधनिबंध तयार करताना विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरली जाणार आहे. त्याचबरोबर विविध प्रकारचे संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके,पाक्षिके, विविध स्मरणिका,विशेषांक, लेख संकेतस्थळावरील माहितीचा आधार घेतला जाणार आहे.

**विषय विवेचन:-**

**1. महानुभाव पंथ स्थापनेपूर्वी स्त्रियांबद्दलची सामाजिक स्थिती :-**

महानुभाव संप्रदायाचा आणि स्त्री स्वातंत्र्याचा घनिष्ठ संबंध येतो महानुभाव म्हणजे, महान अनुभव: तेज: बलं वा यस्य स: महानुभाव:"१ असा हा पंथ महाराष्ट्रात १२ व्या शतकात उदयास आला. आणि समानतेची नांदी करून या पंथाने खळबळ उडून दिली. सामान्य , तळागळातल्या स्त्रियांबद्दल तर उदारतेचा दृष्टिकोन अगोदर कोणी स्वीकारला असेल तर तो महानुभाव संप्रदायाने, तद्नंतर वारकरी संप्रदाय आणि त्यानंतर नाथ संप्रदाय यांनी हा वसा घेतलेले दिसून येतो. यादव काळाच्या मागे जरा वैदिक काळाकडे बघितले तर तेथेही स्त्रीला समाजात आणि धर्म साधनेत फारसे महत्त्व दिसून येत नाहीत गार्गी मैत्री सारख्या काही आदरणीय अनुकरणीय ब्रह्मवादिनी प्राचीन भारतात होऊन गेल्या असल्या

तरी सर्वसामान्य स्त्री दुर्लक्षित राहिली परंतु स्त्री स्वातंत्र्याला जरी कोणी प्रथम वाचा फोडली असेल तर ती महानुभाव संप्रदायाने फोडली असे दिसून येते.

ज्या यादव काळात हा पंथ उदयास आला त्या काळात स्त्रीची अवस्था केविलवाणी होती. तिचे समाजातील धर्म साधनेतील स्थान दुर्लक्षित केले गेले होते. स्त्रीला भक्तीचाही अधिकार नाही हाही विचार रुढ झाला होता आणि त्याच काळात माहानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामींनी स्त्रीला भक्तीचा, ज्ञानाचा आणि मोक्षाचा अधिकार बहाल केला, नुसता अधिकारच दिला नाही तशी कृतीही केली. यादव काळातील कर्मकांडात जंखडून पडलेला धर्म, रूढी, परंपरा आणि कर्तव्य कोंदणात जंखडून पडलेली स्त्री या दोघांनाही स्वामींनी मुक्त केले. त्याची उदाहरणे आपणास पंथीय साहित्यात जागोजागी दिसतात आणि तोच वारसा पंथाने आज तागायत ८00 वर्षानंतरही जपलेला आहे.

12 व्या शतकाच्या स्त्रियांच्या समस्येवर बोट ठेवताना डॉक्टर वंदना जोशी म्हणतात, " समाज मनात घट्ट असलेल्या परंपरांना दूर करणारे तत्त्वज्ञान आजही समाजाच्या गळी उतरवणे कठीण जाते. त्या काळात ८०० वर्षांपूर्वी कर्मकांडात बुडालेल्या समाजाला नवी तत्वे नवी जीवनशैली स्वीकारणे तसे अवघड होते अशावेळी जातीभेद मानू नका माणसे इथून तिथे सारखीच आहेत स्पृश्य अस्पृश्यता सोहळे ओवळे उच्च नीचता मानू नका, वाणीने व मनाने कुणालाही दुखावू नका, सर्वांशी प्रेमाने वागा असा संदेश स्वामींनी दिला ही क्रांती नव्हे काय? "[२]

इतर संप्रदायाच्या मानाने महानुभाव संप्रदायाने अगोदर स्त्रियांसाठी सर्वसामान्य स्त्रियांसाठीही संपूर्ण स्वातंत्र्याची कवाडे खुली केलेली दिसून येतात कारण इतर संप्रदायाच्या उदयकाळानुसार आपणास असे निदर्शनास येते की," वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक संत ज्ञानेश्वरांचा जन्म इसवी सन १२७५ ला झाला असे मानले तर महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामी यांचा प्रयाण काळ इसवी सन १२७४ आहे. म्हणजे ज्ञानदेवाचा उदय होण्यापूर्वीच माहनुभाव संप्रदाय महाराष्ट्रात बद्धमूल झाला होता असे म्हणावे लागते. "[३] यावरून महाराष्ट्रात जे संप्रदाय उदयास आले त्या सर्वात स्त्रियांच्या भावनिकतेचा मानव म्हणून जगण्याच्या अधिकाराकडे महानुभाव संप्रदायाइतके लक्ष इतर संप्रदायाने दिलेले अभावानेच जाणवते.

स्त्रियांना महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांनी अनेक पातळयांवर स्वातंत्र्य बहाल केले आहे त्यांचे स्वातंत्र्य मान्य केले आहे. ते त्यांच्या बोलण्यातून कृतीतून दिसून येते महानुभाव पंथात फक्त विशिष्ट स्त्रियांनाच स्वातंत्र्य व धर्माचा वा मोक्षाचा अधिकार दिला असे नाही तर सर्वच स्त्रियांना तो अधिकार दिला. साधवा स्त्रियांबरोबर ज्या परित्यक्त्या स्त्रिया आहेत, ज्या विधवा स्त्रिया आहेत त्यांना देखील आपल्या संप्रदायात घेऊन कोणतेही कर्मकांड न मानता त्यांना परमेश्वर भक्ती करण्याचे शिकविले कारण त्यांच्या दृष्टीने स्त्री पुरुष समान आहेत. ते म्हणायचे " पुरुषांचा तो जीव आन स्त्रियांचा जेवलिया काय? "[४]

मध्ययुगीन कालखंडात तर स्त्रियांना दुय्यम स्थानाची वागणूक दिली जाईल त्यांना सामाजिक राजकीय स्वातंत्र्य तर नव्हेच परंतु त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनही दुय्यम होता. स्त्री म्हणजे फक्त उपभोगाची वस्तू परमार्गाच्या वाटेतील धोंडा असेच त्यांच्याकडे बघितले जाई. त्या काळात विधवा, टाकून दिलेल्या, कुमारी माता, वेश्या इत्यादी स्त्रियांची अवस्था तर अतिशय वेदनादायी होती गवळणी, तेलीणी, माळीनी, महारीन, मातंगी इत्यादी स्त्रियांनाही समाजात विशेष स्थान नव्हते. मध्य काळात स्त्री जीवन ' न स्वातंत्र्य स्त्री अर्हति ' अशाच स्वरूपाचे होते चुल आणि मूल, रांधा वाढा आणि उष्टे काढा एवढ्याच कामापुरता स्त्री मर्यादित होती. तिला आत्मभान, स्वातंत्र्य, बंधुता, व न्याय देण्याचे कार्य श्री चक्रधर स्वामींनी केले.

**2. विटाळाच्या नियमातून स्त्रियांना स्वातंत्र्य:-**

आजही आपल्या देशातील हिंदू धर्मात जेवढे संस्कृतीचे नियम आहेत त्यातील जास्तीत जास्त नियम स्त्रियांनाच पाळावे लागतात असाच एक नियम समाजाने स्त्रियांच्या बाबतीत लावून दिलेला आहे. हा नियम आजच निर्माण झाला

असं नाही अकराव्या शतकातही हे नियम अस्तित्वात होते तेव्हा असं म्हणावं लागेल समाज सुशिक्षित झाला तरी मासिक ऋतु पर्व काळात महिला अपवित्र होतात आणि त्यांनी त्या काळात परमेश्वराची पूजाअर्चा करू नये असं अलिखित नियम पूर्वीपासून चालत आलेला आहे. या नियमाला श्रीचक्रधर स्वामींनी म्हणजेच महानुभाव पंथाने बगल देऊन स्त्रियांना या बंधनातून मुक्त केलेले दिसते तो प्रसंग पुढील प्रमाणे सांगता येईल, एकदा श्री चक्रधर स्वामी आपल्या भक्तांना निरूपण करीत असताना सगळे भक्त जवळ बसले होते त्यात महदंबा ही स्त्री त्यांपासून लांब बसली होती त्यामुळे तिला स्वामींचे निरूपण ऐकू जात नव्हते. जेव्हा स्वामींनी त्यांना विचारले तेव्हा त्या उत्तरल्या जी जी स्वामी मी मासिक पाळीचा धर्म पाळत आहे. तेव्हा स्वामी तिला म्हटले की बाई हे शरीराचे गुणधर्म आहेत हे तर चालूच राहणार हे तत्व स्वामी निरूपण करतात आणि अवघ्या स्त्री जातीला या बंधनातून मुक्त करतात. तेव्हा स्वामी म्हणतात " बाई जैसा नाका शेंबूड ये, तोंडा थुंका,ये काना मळे ये, डोळीया चिपाडिया येती, गुहय द्वारा मळू ये, तैसा हा एकी धातू स्त्रवे याचा विटाळ धरू नये"५ म्हणून स्वामींनी फक्त देहाचाच विचार न करता मनातील भावनांचा विचारही केलेला दिसतो तेव्हापासून महानुभाव संप्रदायातील स्त्रिया ऋतु पर्वातही देवधर्म, दानधर्म करताना दिसतात. हे स्त्री स्वातंत्र्याचे पहिले पाऊल आपणास दिसतं, परंतु महानुभाव संप्रदायाच्या ऱ्हासाच्या कारणांपैकी हेही एक कारण आपणास दिसून येते याबद्दल डॉक्टर बी. एन. पाटील आपल्या प्राचीन महाराष्ट्र वांग्मयीन वैभव पुस्तकात म्हणतात की, " विटाळाच्या कल्पनांना आचार धर्मात मज्जाव होता. स्त्रियांनी मासिक धर्मात विटाळ मानण्याची आवश्यकता नसल्याचा उपदेश केला "६ असो असे असले तरी महानुभाव संप्रदायाचे कार्य आजही नाकारता येत नाही त्यांनी स्त्रियांना दिलेले स्वातंत्र्य हे आज घटनेने स्त्रियांना बहाल केलेले आहे हे मान्य केले तर महानुभाव पंथांनी स्त्री स्वातंत्र्याची नांदी झाली हेच म्हणावे लागेल.

**3) स्त्री जीवनाविषयी स्वातंत्र्य :-**

लीळाचरित्रातील उत्तरार्धात एक प्रसंग आहे स्वामी आपल्या भक्त जणांना ज्ञानाचे निरूपण करत असताना महिला भक्त तिथे निरूपण ऐकत होत्या त्या सर्व स्त्रियांना स्वमींजवळ बसलेल्या बघून सारंग पंडित नावाचा शिष्य त्या महिला भक्तांना बघून मनात उद्गारले की, महिला असून कशा स्वामिंजवळ एकदम जवळ जाऊन बसल्यात. यांना काहीच कसं वाटत नाही, यांना तेलंगणात नेऊन सोडावे असे ते म्हणतात तेव्हा स्वामी त्यांचा मनोधर्म ओळखतात आणि सारंग पंडितांना शिक्षापण करतात आणि म्हणतात की तुमचा तो जीव आणि यांचा काही जीवलिया? तुमचे आन देव राखीता आणि याते आन देव राखीता'? असे बोलून स्वामी सारंग पंडितांची कान उघाडणी करतात आणि पुरुषा इतकाच स्त्रियांचाही जीव महत्वाचा आहे. पुरुषांना राखणारा परमेश्वर आणि स्त्रियांना राखणारा परमेश्वर एकच आहे अशी स्त्री जीवनाबद्दल समतेची महत्त्वाची भावना स्वामीच्या मनात होती.असे दिसते. आणि स्वामींनी सारंग पंडितांना विचारलेला हा प्रश्न म्हणजे स्त्री पुरुष समानतेची बीजे आहेत. त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न अत्यंत कठीण होता.' न स्त्री स्वातंत्र्य मर्हती:' ही मनूची कठोर आज्ञा खुद्द ब्राह्मण विद्वानांना जन्म देणाऱ्या मातांनाही ज्ञान अधिकार आणि मोक्ष अधिकार नाकारणारी क्रूर चेष्टा होती. ब्राह्मण स्त्रियांची ही अवस्था होती तर शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्रियांची किती कठीण अवस्था असेल? अनेक ब्राम्हण बाल विधवा केसवपन करून घराच्या आत माझ घराच्या अंधारात राहून पशुहून निपत्तर जीवन जगत असत. असे दुर्दैवी जीवन जगण्याची धार्मिक सक्ती त्यांचे नशिबी या स्मृतीकारांनी लिहिली होती. ही धर्माची विकृती आणि सामाजिक कृती स्वामींच्या हृदयाला दुखावणारी होती म्हणून त्यांनी याही विकृती विरुद्ध बंड पुकारून पुरुष जातीला प्रश्न विचारला होता पुरुषांचे जीव आणि स्त्रियांच्या काही जीवलिया?

स्त्रियांच्या शिक्षणाचा आणि ज्ञानार्जनाचा अधिकार हा त्यांचा जन्मसिद्ध अधिकारच आहे असे सांगणारा थोरात्मा हिंदुस्थानात हा पहिलाच होता त्यांनी स्त्री-पुरुषांची समानता दाखवून देऊन त्यांच्या ज्ञानाधिकाराची अवरुद्ध

केलेली वाट मोकळी करून दिली. स्त्रियांना मोक्षाचा अधिकार सांगणारा धर्मक्षेत्रातला हा पहिला धर्मज्ञ होता. ही स्वामीची महानता आजच्या जगाला पटते, परंतु स्वामींच्या समकालीन धर्म मार्तंडांना ती पटणे आणि पचविणे शक्य नव्हते. त्यांनी स्वामींच्या या स्त्री उद्धाराला बदनाम करण्यासाठी त्यांच्यावर अनेक लांच्छन लावून आपला विरोध नोंदविला आहे 'हे आमचा मार्ग उच्छदेती' ही त्यांची ओरड सारखी चालू होती.

**समारोप :-**

स्त्री ही कोणत्याही काळातील असो तिला मानव म्हणून जगण्याचा अधिकार आहे हे जरी आज संविधानाने बहाल केलेले स्वातंत्र्य असले तरी त्याची अंमलबजावणी यादव काळातही महानुभाव संप्रदायात दिसून येते ती संस्थापक श्री चक्रधर स्वामींमुळे. या स्वातंत्र्यबद्दल डॉक्टर दीपा देशपांडे म्हणतात, " आज व्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या युगातही जे स्थान स्त्रीला सुशिक्षित असूनही मिळू शकत नाही किंवा तिला महत प्रयासाने मिळवावे लागते या संदर्भात तेराव्या शतकात मात्र श्री चक्रधर स्वामींनी स्त्रीची अचूक योग्यता हेरली होती, तिची मनोभूमिका समजून घेतली होती, तिच्या सामर्थ्याची जाणीव त्यांना झालेली होती एका आत्मसन्मानाने आत्मविश्वासाच्या बळावर स्त्री जगू शकते ती तर्क वाद, धर्मचर्चेत कमी पडत नाही हे ओळखणे स्पृणीह म्हणावे लागेल वर्णाच्या चौकटीत बंदिस्त असणाऱ्या धर्म बंधनांनी बांधलेल्या अशा वातावरणात तिला धर्माचर्चा, ज्ञानचर्चा तत्त्वचर्चा करण्यास संधी दिली हीच गोष्ट अतिशय नवी होती त्या काळाच्या पुढे जाणारी होती असा हा श्री चक्रधर स्वामींचा स्त्रियांविषयीचा दृष्टिकोन अतिशय पुरोगामी होता. "७

**निष्कर्ष:-**

१) महानुभाव पंथात स्त्री शूद्रादिकांना धर्म मंदिरात इतरांच्या बरोबरीने प्रवेश मिळाला त्याचप्रमाणे स्त्रियांनी मासिक धर्म काळात विटाळ पाण्याची आवश्यकता नाही असे मानवजातीला सांगून एक आदर्श विचार मानवजातीपुढे ठेवला.

२) महानुभाव पंथांने निर्माण केलेली चळवळ महाराष्ट्रीयन घराघरात पोहोचलेली नसली तरी हा पंथ आतापर्यंत जिवंत आहे यातच या पंथाचे खरं सामर्थ्य दडलेलं दिसतं.

३) श्री चक्रपाणि प्रभू, श्री गोविंद प्रभू आणि श्री चक्रधर स्वामी या अवतारत्रयिंनी स्त्री स्वातंत्र्य व स्त्री सन्मानाला महत्त्व दिलेले दिसते.

४) महानुभाव संप्रदायाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याला वाव दिला म्हणून धवळयाची रचना पूर्ण करणारी महदंबा आद्य कवयित्री उदयास आली.

५) महानुभाव संप्रदायात स्त्रियांची भूमिकाही महत्त्वाची दिसून येते.

६) स्त्री पुरुष समानता पुरुषसत्ताक पद्धतीला फाटा ही मूल्य पंथाने जोपासलेली दिसतात.

७) स्त्रियांविषयी पंथाचा दृष्टिकोन आजही सकारात्मक दिसून येतो.

**संदर्भ :-**

१) महानुभाव पंथ, महाराष्ट्रातील पाच संप्रदाय; लेखक, पं. रा.मोकाशी, प्रसाद प्रकाशन,पुणे १९७५ द्वितीय आवृत्ती,पृष्ठ क्रमांक ३८

२) श्री चक्रधरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण : डॉक्टर वंदना जोशी, पोथी स्मरणिका,लासलगाव

३) श्री चक्रधर:- लेखक बापूजी संकपाळ, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, तिसरी आवृत्ती २००२ पृष्ठ क्रमांक ८६

४) महानुभाव पंथात स्त्रियांचे स्थान:- लेख डॉक्टर प्रीती किशोर उमाठे - knowledge Resonance, ISSN २२३१ - १०२९, पृष्ठ क्रमांक, १२ - १४

५) महानुभाव संप्रदाय: स्वरूप आणि विशेष:- संपादक: डॉक्टर नर्सिंग कदम,सह संपादक प्राध्यापक अजित जाधव, प्रभाकर पब्लिकेशन लातूर, प्रथम आवृत्ती ऑक्टोबर २०२३ पृष्ठ क्रमांक १८७

६) प्राचीन महाराष्ट्र वांग्मय वैभव:- लेखक, प्राचार्य डॉक्टर भास्करराव नारायण पाटील, प्रशांत पब्लिकेशन प्रथम आवृत्ती १७ ऑक्टोबर २००९ पृष्ठ क्रमांक,२००

# महिला सबलीकरण आणि बचत गट (संदर्भ :जळगाव शहर)

**डॉ. विनोद आत्माराम नन्नवरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

**डॉ. सचिन भास्कर कुंभार**
अर्थशास्त्र विभाग

डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा तेव्हाच झपाट्याने होतो जेव्हा त्या देशातील सर्वच व्यक्ती देशाच्या आर्थिक विकासात सहभागी होतात. आर्थिक विकास हा साध्य करण्यासाठी महिला आणि पुरुष असा भेद ज्याठिकाणी केला गेला नाही असे देश खऱ्या अर्थाने आर्थिक प्रगतीत साधत विकसित झालेले आहेत. जगात आज जितके देश विकसित आहेत त्या देशातील सर्वच महिला आणि पुरुष हे आपापल्या परीने उत्कृष्ट असे कार्य करताना दिसतात. त्यामुळे प्रत्येक देशाच्या नागरिकाने आर्थिक विकास साधण्यासाठी पुरुषांबरोबरच महिलांना देखील रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून विविध धोरणे आखत आहे. त्याच प्रकारची ध्येयधोरणे भारताने देखील असलेली आहेत. आणि ते म्हणजे महिला बचत गट होय. भारतात महिला बचत गटामुळे महिलांच्या कार्यपद्धतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत. महिला आपल्यातील कौशल्य महिला बचत गटांमार्फत दाखवण्यास सक्षम झालेल्या आहेत. त्यातूनच कौटुंबिक विकास तसेच आर्थिक स्वावलंबी होताना दिसत आहेत. त्यामुळेच महिला बचत गट हे आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री च्या असण्याची नितांत गरज असते असे म्हटले जाते. असे असले तरी समाजपरत्वे, देशपरत्वे, स्त्रियांचे स्थान आणि भूमिका बदललेल्या दिसून येतात. याला त्या-त्या समाज व देशांच्या रूढी, परंपरा, मूल्ये, मानदंड जबाबदार असतात. कारण आपली संस्कृती आपल्या आचार विचारांवर प्रभुत्व गाजवत असते. म्हणजेच आपले वागणे, बोलणे, राहणीमान यावर संस्कृतीचा अंमल दिसतो. त्याचाच परिपाक म्हणून संपूर्ण जगाचा विचार करता स्त्री-पुरुषांच्या स्थान व दर्जामध्ये विविधता आढळून येते. स्त्रियांच्या इतिहासात डोकावून पाहिल्यास आपल्याला लक्षात येते की, स्त्रियांच्या बाबतीत नाण्याच्या दोन बाजू आढळून येतात. एक म्हणजे स्त्रियांविषयी असणारा समाजाचा सकारात्मक, उदारमतवादी दृष्टिकोन तर दुसऱ्या बाजूस स्त्रियांविषयी असणारा समाजाचा कमालीचा नकारात्मक आणि उदासीन दृष्टिकोन होय. मुळातच भारतीय महिला ही कधी सबला नव्हतीच. भारत हा नवदुर्गेची पूजा करणाऱ्या संस्कृतीतील स्त्रीशक्तीचा देश आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा सहभाग असतो असे म्हटले जाते. किंबहुना या समाजात घडलेले अनेक महापुरुष स्त्री मुळेच घडले, राजमाता जिजाऊ होत्या म्हणून संस्कारमूर्ती व किर्तीवंत छत्रपती शिवराय घडले. सावित्रीबाई फुले यांची साथ मिळाली म्हणून ज्योतिबा फुले महात्मा झाले. इतकेच नव्हे तर कौशल्यानंदन श्रीराम व अंजनीपुत्र हनुमान ही आपली देव प्रतीके स्त्रीच्या संस्काराचा आविष्कार आहेत. स्त्रियांमध्ये सहनशीलता, नावीन्यता, सौंदर्याची जाणीव, बचतवृत्ती, स्मरणशक्ती हे गुण निसर्गःच अधिक आहेत. स्त्री सृजनशील आहे. कारण निसर्गाने निर्मितीचा अधिकार स्त्रियांनाच दिला आहे. स्त्री मुळातच सबला . जरी संविधानाने स्त्री व पुरुष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. अगदी काम करणाऱ्या, व्यवसाय करणाऱ्या, नोकरी करणाऱ्या महिला देखील स्वतःला सक्षम मानत नाहीत. कारण त्यांच्या दृष्टीने महिला सबलीकरण म्हणजे फक्त कार्यक्रम,व्याख्यान आहे. पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे महत्त्वाचं आहे.

कारण महिला या देशाचे भविष्य ठरवणारी शक्ती आहे. आणि त्यामुळे ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. समाजरुपी रथ विकासाकडे दौडवायचा असेल तर पुरुषरुपी चाकाबरोबर स्त्रीरूपी चाकालाही विकासाची तेवढीच चालना मिळणे गरजेचे आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात 'आपण आपल्या स्त्रियांच्या स्थितीकडे पाहून आपण आपल्या राष्ट्राची स्थिती सांगू शकतो' यावरून महिला सबलीकरणाची आवश्यकता व गरज लक्षात येते. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये "महिला सबलीकरण" यासंदर्भात विचार मांडण्यात आलेले आहेत. आजच्या परिस्थितीत महिला सबलीकरण होणे काळाची गरज आहे. यांचा अभ्यास करण्यासाठी **'महिला सबलीकरण आणि बचत गट (संदर्भ :जळगाव शहर)'** हा विषय संशोधनासाठी घेतलेला आहे.

**उद्दिष्टे -**

१) जळगाव शहरातील महिला बचत गटाद्वारे रोजगार उपलब्धतेचे अध्ययन करणे

२) जळगाव शहरातील महिला बचत गटाद्वारे महिलांचे आर्थिक सबलीकरणाचा अभ्यास करणे.

**गृहितके -**

१) महिलांना बचत गटाद्वारे विविध व्यवसायात रोजगार मिळालेला दिसून येतो.

२) महिला बचत गटाद्वारे महिलांचे आर्थिक सबलीकरण झालेले दिसून येते.

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. प्राथमिक माहिती ही अनुसूची, प्रश्नावली, निरीक्षण यांचा वापर केला जाणार आहे. साधा यादृच्छिक नमूना निवड पध्दतीने जळगाव शहरातील एकूण ५० बचत गटांची निवड करून त्या बचत गटात सहभागी असलेल्या महिलांकडून माहिती संकलित केली आहे. दुय्यम माहिती विविध कार्यालये, प्रकाशित व अप्रकाशित प्रबंध, शासकीय अहवाल, पुस्तके, मासिके, इंटरनेट व वर्तमान पत्रातून माहिती घेतली आहे.

**आलेख क्र. १**




(स्त्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीत संशोधीकांनी जळगाव शहरातील महिला बचत गटात सहभागी होण्यापूर्वीचे उत्पन्नाचे साधने कोणती? असा प्रश्न विचारून निवेदकांचे मते जाणून घेतले. यात घरकाम करणारे ४६%,हातमजुरी करणारे २२%, स्वयंरोजगार करणारे ०४%,शेती ०८% आणि इतर २०% इ. महिला या बचत गटात सहभागी होण्यापूर्वी उत्पन्नाचे साधने होती. महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध नसल्याने किंवा स्वयंरोजगार सुरु करण्या इतपत भांडवल या महिला कडे नसल्याने त्या महिला घरकाम करून आपला उदरनिर्वाह करीत असल्याचे दिसून आले.

**सारणी क्र. १**

**बचत गटात सहभागी झाल्यानंतरचे उत्पन्नाचे साधने**

| क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | घरकाम | १० | २०% |
| २. | मजुरी | ०० | ०% |
| ३. | स्वयंरोजगार | २८ | ५६% |
| ४. | शेती | ०४ | ०८% |
| ५. | इतर | ०८ | १६% |
| एकुण | | ५० | १००% |

(स्त्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीत संशोधीकांनी जळगाव शहरातील महिला बचत गटात सहभागी झाल्यानंतरचे उत्पन्नाचे साधने कोणती? असा प्रश्न विचारून निवेदकांचे मते जाणून घेतले. यात स्वयंरोजगार करणारे ५६% महिला या बचत गटात सहभागी झाल्याने बँके कडून कर्ज स्वरुपात भांडवल उपलब्ध झाल्याने महिला विविध स्वयंव्यवसाय सुरु करून मोठ्या प्रमाणात रोजगार मिळवत आहे, आता या महिलांना घरकाम, हातमजुरी करताना दिसून येत नाही असे प्रमाण कमी झालेले दिसून येते याचा अर्थ या बचत गटांमुळे महिलांचे सबलीकरण झालेले आढळते.

**सारणी क्र. २**

**बचत गटात सहभागी होण्यापूर्वीचे बचतीचे प्रकार**

| क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | भीसी | १४ | २८% |
| २. | पोस्ट ऑफिस / बँक | ०९ | १८% |
| ३. | विमा | ०३ | ०६% |
| ४. | गल्ला | २४ | ४८% |
| **एकुण** | | ५० | १००% |

(स्त्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

भविष्यकालीन आर्थिक विचार करून आपण बचत ही करीत असतो आणि म्हणून शहरातील महिला बचत गटात सहभागी होण्यापूर्वीचे बचतीचे प्रकार कोणते? असा प्रश्न विचारले असता निवेदकांनी पैसा स्वत: जवळ ठेवणे म्हणजे गल्ला ४८% या स्वरुपात जवळ ठेवत. आणि पोस्ट ऑफिस किंवा बँकेत बचत स्वरुपात फार कमी म्हणजे १८% आणि विमा ०६% असे आढळले, कारण या महिलाना रोजगार नसल्याने उत्पन्न फार कमी असल्याने बचत ही होत नाही परिणामी एकूण उत्पन्नातील काही भाग हा स्वत:जवळ ठेवत असत.

**सारणी क्र. ३**

**बचत गटात सहभागी झाल्यानंतरचे बचतीचे प्रकार**

| क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | भीसी | ०९ | १८% |
| २. | पोस्ट ऑफिस / बँक | ३७ | ७४% |
| ३. | विमा | २४ | ४८% |
| ४. | गल्ला | ०२ | ०४ % |
| (बहुपर्याय निवडल्याने वारंवारिता व टक्केवारीचे प्रमाण जास्त आहे) | | | |

(स्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

शहरातील महिला बचत गटात सहभागी झाल्यानंतरचे महिला संघटीत होऊन बचत गटा अंतर्गत स्वयंव्यवसाय सुरु करून त्यातून महिलांचे उत्पन्नात वाढ होऊन ते स्वतःजवळ नठेवता ते पोस्ट ऑफिस किंवा बँक यात ७४% आणि काही महिलांनी भविष्यकाळाची अनिश्चिता म्हणून विमा काढून घेणारे ४८% आहेत. याचाच अर्थ महिलांचे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याने बचत गटात सहभागी होऊन उत्पन्न प्राप्त झाल्याने बचतीची सवय लागून महिला अधिक सक्षम होत असतात.

**सारणी क्र. ४**

**स्वयंसहाय्यता (बचत) गटातील शिक्षित सदस्य संख्या**

| क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | प्राथमिक (१ ली ते ०७ वी) | १९ | ३८% |
| २. | माध्यमिक व उच्च माध्यमिक (०८ वी ते १२ वी) | २१ | ४२% |
| ३. | महाविद्यालयीन (B.A/B.Com/B.Sc) / इतर | १० | २०% |
| **एकुण** | | **५०** | **१००%** |

(स्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीत बचत गटातील शिक्षित सदस्य किती? असा प्रश्न विचारला असता माध्यमिक व उच्च माध्यमिक घेतलेले ४२%, प्राथमिक शिक्षण ३८% आणि महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण २०% इतक आहे. याचाच अर्थ बचत गटात सहभागी शिक्षित महिलांचे प्रमाण वाढून आप-आपल्या व्यवसायात फायदा होईल, कारण मानवाच्या जीवनाश्यक गरजा म्हणजे अन्न,वस्त्र आणि निवारा असे असले तरी आताच्या आधुनिकतेच्या जगात मात्र या सोबतच शिक्षण ही काळाची गरज निर्माण झालेली आहे. कुटुंबातील एक महिला शिकली की संपूर्ण कुटुंब शिक्षित होते आणि त्या कुटुंबाचा सामाजिक व आर्थिक विकास होतो.

**सारणी क्र. ५**

**स्वयंसहाय्यता (बचत) गटामुळे तुमचा कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक गरजांची पूर्तता होते का ?**

| अ. क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ४१ | ८२% |
| २. | नाही | ०९ | १८% |
| एकुण | | ५० | १००% |

(स्त्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीत निवेदकांना स्वयंसहाय्यता (बचत) गटामुळे कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक गरजांची पूर्तता होते का? असा प्रश्न विचारला असता, ८२% निवेदक होय म्हणतात तर १८% निवेद्कानाचा आर्थिक व सामाजिक गरजांची पूर्तता पाहिजे त्या प्रमाणात होताना दिसून येत नाही असे वाटते. प्रत्येक व्यक्तीस आपला घरखर्च/उदरनिर्वाह, आरोग्य, मुलांचे शिक्षण, सण/समारंभ, प्रवास, वैयक्तीक व्यवसाय अशा आर्थिक व सामाजिक स्थिती, जीवनमान दर्जा सुधारावा समृध्द आणि संपन्नतेबरोबर स्वयंपूर्ण जीवनाची अभिलाषा प्रत्येक व्यक्तीच्या मनात असते, त्यासाठी व्यक्ती आतोनात कष्ट करण्याची तयारी करीत असतो परंतु आर्थिक बाजू कमकुवत असल्याने तो मागे पडतो, यावर उपाय म्हणून बचत गटा मार्फत महिलानी एकत्र येऊन स्वयंसहाय्यता (बचत) गट स्थापना करून स्वतःचा व्यवसाय सुरू करून आपला व कुटुंबाचा विकास करून आर्थिक व सामाजिक गरजांची पूर्तता होताना दिसते.

**सारणी क्र. ६**

**बचत गटातील कर्जाचा वापर**

| क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | स्वयंव्यवसाय | २५ | ५० % |
| २. | उदरनिर्वाह | १३ | २६ % |
| ३. | मुलांचे शिक्षण | ०३ | ०६% |
| ४. | आरोग्य | ०२ | ०४% |
| ५. | लग्न / सण | ०७ | १४% |
| एकुण | | ५० | १००% |

(स्त्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीत महिला बचत गटा अंतर्गत घेतलेल्या कर्जाचा वापर कोण-कोणत्या कामासाठी करतात? असा प्रश्न विचारले असता महिला स्वयंव्यवसाय साठी ५०% बँकेकडील कर्जाचा वापर करतात तर काही महिला या उदरनिर्वाह साठी २६%, मुलांचे शिक्षण, आरोग्य व सण/लग्न इ. गोष्टीसाठी महिला या कर्जाचा वापर करताना आढळून आले.

सारणी क्र.७

स्वयंरोजगार (बचत) गटामुळे रोजगार मिळातो का ?

| क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५० | १००% |
| २. | नाही | ०० | - |
| एकुण | | ५० | १००% |

(स्त्रोत :- जळगाव शहरातील ५० कुटुंबियांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीत निवेदकांना स्वयंरोजगार (बचत) गटामुळे रोजगार मिळातो का ? असा प्रश्न विचारले असता निवेदकांनी १००% बचत गटाद्वारे रोजगार मिळाला असे होय म्हटले आहे. बचत गटात महिला सहभागी झाल्यामुळे या महिलानी स्वयं छोटे-छोटे व्यवसाय सुरू करून एकप्रकारे या स्वयंव्यवसायातून महिलांसाठी रोजगार निर्माण केलेला आढळून आले.

**निष्कर्ष –**

१) महिला बचत गटात सहभागी होण्यापूर्वीचे उत्पन्नाचे साधन हे केवळ घरकाम असून ते प्रमाण ४६% आहे. स्वयंरोजगार मात्र ०४% इतकाच होता.

२) महिला बचत गटात सहभागी झाल्यानंतर उत्पन्नाचे साधन हे ५६% महिलांचे स्वयंरोजगार असून या महिला मजुरी किंवा घरकाम करण्याचे प्रमाण कमी झाले.

३) महिला बचत गटात सहभागी होण्यापूर्वी गल्लात पैसे ठेवणे ४८% महिला पसंत करीत परंतु बचत गटात सहभागी झाल्या नंतर मात्र ७४% बचत ही पोस्ट / बँकेत ठेवणे पसंत करीत आहे.

४) महिला भविष्याची काळजी पोटी स्वतःचा विमा ४८% महिलानी उतरवलेला दिसते.

५) स्वयंसहाय्यता (बचत) गटातील शिक्षित सदस्य संख्या ही ४२% माध्यमिक व उच्च माध्यमिक महिलांची असल्याचे आढळून आले.

६) स्वयंसहाय्यता (बचत) गटामुळे ८२% महिलांच्या कुटुंबाची आर्थिक व सामाजिक गरजांची पूर्तता होताना दिसते. याचाच अर्थ या महिलांचे आर्थिक सबलिकरण होत आहे.

७) ५४%महिला बचत गटा अंतर्गत महिला दरमहा बचत करण्याची सवय वाढत असल्याचे दिसते.

८) ५०% महिला बँकेच्या कर्जाचा वापर हा स्वयंव्यवसायासाठी करताना दिसतात. इतर महिला मात्र स्वतःचा उदरनिर्वाह,मुलांचे शिक्षण, आरोग्य व लग्न /सण यावर देखील खर्च करतात.

९) स्वयंरोजगार (बचत) गटामुळे १००% रोजगार महिलाना मिळतो असे सांगतात.

१०) बचत गटा मुळे जळगाव शहरातील महिलांचे सबलीकरण मोठ्या प्रमाणात झालेले दिसून आले.

**उपाय योजना –**

१) शासनाने महिला बचत गटाची प्रचार व प्रसार शहरी आणि ग्रामीण भागापर्यंत करावा.

२) महिलानी बचत गटाद्वारे मिळालेले कर्ज हे स्वयंरोजगारासाठी वापर करून महिलांसाठी रोजगार निर्माण होईल.

३) बँकेने महिलांची बचत गटाद्वारे होणारी प्रक्रिया सोपी करावी.

४) स्थानिक शासनाने बचत गटा अंतर्गत उत्पादित होणाऱ्या वस्तु, कच्चा माल विक्रीसाठी बाजार उपलब्ध करून द्यावी.

५) बचत गटात शासनाने विविध योजना सुरू करून महिलाणा त्याचा फायदा होईल आणि महिलाना रोजगार मिळून महिलांचे सबलिकरण मोठ्या प्रमाणात घडून येईल.

**संदर्भ –**

१) महिला बचत गट आर्थिक समृध्दीचा महामार्ग – उल्हास भाले

२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३,२०१५,२०२०,२०२१,२०२२

३) संदर्भ :- नियोजन मंडळ, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, योजना, ऑगस्ट २००० पृ.क्र.२५

४) Lazard Daniyel, 2009, "Micro Finance: performance Evaluation and Enterprise Development, Allied Publishers Pvt. Ltd, Puducherry, P.No. 04.

५) Indian Journal or Finance, SHG Bank Linkage Programme,by Panigrahi, 2010,Vol.IX,P.No. 130

६) Faculty Profile Dr. Dhansham Shivshankar yelne Chrome HTML Document.

७) गोडबोले गोविंद २००९ 'बचत गटांच्या माध्यमातून गरिबीमुक्त विश्वाची निर्मिती' साकेत प्रकाशन पुणे पृ.क्र.६८,६९.

८) अर्थशास्त्रासाठी संशोधन पद्धती- डॉ.के.बी.गिरासे. अथर्व पब्लिकेशन

९) https://livetrends.news/mahila-bachat-gat

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# स्वातंत्र्य पूर्व आणि स्वतंत्र स्त्री वादी साहित्य आढावा

**प्रो. वंदना विनायक बडगे**
प्राचार्य. राजे छत्रपती शिवाजी विद्यालय, कोरड गाव , अहमदनगर.

**प्रस्तावना** -- प्राचीन काळापासून भारतात स्त्रियांना कायमचं दुय्यम स्थान मिळत आलेले आहे. धर्म संस्कृती व परंपरा यांच्या नावाखाली पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचे हक्क डावल लेले आहेत . हजारो वर्षांपासून स्त्रियांचे शोषण चालू आहे . पण विसाव्या शतकात स्त्रियांना आपल्या हक्काची जाणीव झाली. आपल्यालाही पुरुषाप्रमाणे जीवन जगता यावे स्वातंत्र्य मिळावे यासाठी त्यांनी न्याय हक्कासाठी लढा सुरू केला. यातूनच स्त्री वादी साहित्याचा उदय झाला. स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी जागतिक पातळीवर संघटन सुरू झाले. सिमोन दि बोवा एलिझाबेथ ग स्किल एमील ब्रॉन्टी, शलन ब्रॉन्टी शालर्ट गिलमन व्हार्जिनिया वूल्फ या लेखिकांनी जागतिक पातळीवर स्त्रीवादी साहित्याची पायाभरणी केली. 1960 नंतर मात्र जागतिक स्त्री वादी साहित्याची प्रेरणा भारतीय स्त्रीवादी लेखकांनी घेतली आणि सण 1960 नंतर मराठी साहित्यामध्ये स्त्रीवादी साहित्य मोठ्या जोमाने येऊ लागले. यातूनच स्त्रीवादी साहित्य प्रवाहाला सुरुवात झाली. पूर्वीपासूनच भारतीय समाज व्यवस्थेतील कुटुंबामध्ये मुलगा मुलगी असा भेदभाव केला जातो. जन्माला येणाऱ्या आपत्यास मुलगा व मुलगी म्हणून वागणूक दिली जाते. येथेच स्त्री पुरुष भेदभावाला सुरुवात होते..

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या सत्वाची जाणीव होणे तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे. तिला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे, तिला तिच्या माणूसपणाबद्दल आत्मीयता वाटणे. तिला तिचे हक्क अधिकार कळणे. तिला तिच्या अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे. तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या सत्वासाठी संघर्ष पवन होणे म्हणजे स्त्री वाद होय. स्त्रीने आपल्या बाईपणाची कात टाकून माणूसपणाचे नवे रूप धारण करणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रियांचे स्वतः संबंधित साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. ज्यातून तिने स्व चा शोध घेतलेला असतो. स्त्री वाद ही एक समाज परिवर्तन घडवणारी राजकीय जाणीव आहे. त्रिकोणातून भिन्न भिन्न पातळयावरचा अविष्कार स्त्रीवादी साहित्यातून आढळून येतो. काळाच्या ओघात उदारमतवादी मार्क्सवादी समाजवादी उत्तराधुनिक अशा अनेक विचार प्रणाली मध्ये स्वतःची भर घालून स्त्रीवादी भान स्त्री पुरुष विषमतेच्या प्रश्नांची मिमांसा करते. म्हणूनच काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादी भिन्न रूपे दिसतात. पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्वाला परिपूर्णता येऊ शकते आणि प्रेमा इतकीच माणसासारखे जगण्याची भूक स्त्रीलाही असते. हे दर्शवणारे आणि स्त्रीम्हणून समाजात कुटुंबात आलेल्या अनुभवांना शब्दरूप देणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. भारतात स्त्रीवादी साहित्याची वाटचाल स्वातंत्र्यपूर्व काळापासून आधुनिक काळापर्यंत झालेली आहे. त्यात अनेक स्थित्यंतरे ही घडलेली आहेत. प्राचीन काळापासून जगभर पितृसत्ताक समाज व्यवस्था अस्तित्वात होती. यातूनच जैविक लिंगभेदाला सुरुवात झाली. समाज व्यवस्थेने आपले हितसंबंध जपण्यासाठी स्त्रीपुरुष यांच्यात एक विशिष्ट सत्ता संबंध रचला. या सत्ता संबंधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले. स्त्रीचा स्वभाव लक्षणे कार्यक्षेत्र कर्तव्य या सत्तेने निश्चित केली. या गोष्टीची जाणीव स्त्रीला हळूहळू होऊ लागली त्यातूनच स्त्रीवादी साहित्याचा जन्म झाला.

* स्वातंत्र्यपूर्व स्त्री जीवन व साहित्य - स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री जीवन अतिशय हलाखीचे होते. शिवाजी महाराजांच्या राजवटीच्या अगोदर मुस्लिम राजवट भारतात होती. सर्वत्र मुस्लिम राजवटीचा अंधकार भारतात पसरला होता. अनेक मुस्लिम राजे विलासी जीवन जगत होते. मुस्लिमांची पडदा पद्धती मराठी स्त्रीवर लादली गेली होती. चूल आणि मूल एवढेच कार्यक्षेत्र स्त्रीचे मानले जात. या काळात स्त्रीही बंदिस्त झालेली होती. तिला माझ घरातून

बैठकीच्या खोलीत यायला बंदी होती. मात्र पुढील काळात शिवाजी महाराजांचे राज्य भारतात प्रस्थापित झाले. त्यांनी मुस्लिमांच्या जुलमी राजवटीला उलथून टाकले. माता जिजाबाई यांचा आधार शिवराजवटीला स्त्रियांना मिळाला. स्वातंत्र्यपूर्व शिवराजवटीतील स्त्रीजीवन सांगताना डॉक्टर प्रतिभा इंगोले म्हणतात की, विदर्भातील लघुजी जाधवांच्या कन्येने सर्वच स्त्रीवर्गाला सत्व शोधण्याचे वाण दिले व आत्मभान मिळवण्याची ही प्रेरणा दिली. त्यातून त्या काळात रघुजी भोसले यांची पत्नी बाकाबाई व व्यंकोजी भोसले यांची पत्नी दीपा बाई यांनी विदर्भ कन्यांनी कर्तव्य गाजवण्याची प्रेरणा तर घेतलीच पण मराठा करण्यामध्ये महत्त्वाकांक्षी व लढाऊ स्त्रियांचे उदाहरणे दिसू लागली. त्यांनी नवऱ्यांच्या बकावर का होईना पण काही स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता दाखविली, मराठा शिवशाही घराण्यामध्ये महत्त्वाकांक्षी व लढाऊ स्त्रियांची परंपरा होती. यातून स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रियांना प्रेरणा मिळत केली. शिवशाही राजवटीत स्त्री ही घराबाहेर पडू लागली. तिला कुटुंबात मनाचे स्थान मिळू लागले. पुढील काळात म्हणजे पेशवाई काळात स्त्रीवरील बंधने अधिक केली गेली. माझे माता जिजाऊ मा साहेबांनी संपूर्ण भारतातील स्त्रीला आत्मसन्मान मिळवून दिले. पुढे मासाहेब जिजाऊ च्या प्रेरणेने झाशीच्या राणीच्या रूपात स्त्रीचे दर्शन झाले.

सन 1818 ला पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इंग्रजी सत्तेचा अंमल भारतात. अनेक सामाजिक राजकीय सांस्कृतिक घडामोडी घडल्या. इंग्रज भारतात येण्यापूर्वी अनेक सामाजिक प्रथा रूढी परंपरा भारतात होत्या. त्या सामाजिक प्रथांना इंग्रजी सत्तेने व भारतीय विचारवंतांनी विरोध केला. केशव पण आणि सतीबंदीचा कायदा करण्यात आला. पेशवे काळात स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन हा मदन पुतळी व विलास चंद्रिका याप्रमाणे होता. तो इंग्रज काळात बदलला गेला. स्त्री शिक्षणासारखे अनेक सामाजिक सुधारणा इंग्रजी राजवटीत करण्यात आल्या. याच काळात ताराबाई शिंदे यांचा स्त्रीपुरुष तुलना हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यांनी याच ग्रंथातून स्त्रीमुक्तीचा विचार मांडला. स्त्रीलाही मन असते भावना असतात. तिलाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार असतो. असा विचार स्त्री पुरुष तुलना या ग्रंथातून आला. स्त्रियांना आत्मशोधनाचा मार्ग दाखविण्यासाठी हा ग्रंथ अतिशय प्रेरणादायी ठरला. याच काळात सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या प्रयत्नाने स्त्रीशिक्षणाला सुरुवात झाली. परंपरागत बंद असणारा स्त्री शिक्षणाचा मार्ग व ज्ञानाचा मार्ग महात्मा फुले यांच्या प्रयत्नाने खुला झाला. स्त्रीशिकू लागली आणि तिला स्वतःवरील अन्यायाची जाणीव अधिक तीव्रतेने झाली. ती व्यक्तीचा विचार करू लागली. पुढील काळात स्त्रीवादी साहित्याचा उदय झाला.

प्राचीन काळातील स्त्री जीवन सांगताना डॉक्टर सदाशिव सरकटे म्हणतात की वैदिक काळात सुरू झालेली स्त्री शिक्षणाची उच्च परंपरा महाकाव्याच्या काळातही सुरू होती. परंतु पुढे स्मृतीकाळात स्त्रियांच्या स्वतंत्र्यावर मर्यादा घालण्यात आल्या. खरे पाहता प्राचीन भारतीय स्त्री ही सुशिक्षित व सक्षम होती. त्यामुळे या काळातील शिक्षित स्त्रियांना आजच्या प्रमाणे प्रत्येक क्षेत्रात स्वतःची क्षमता दाखविणे शक्य होत असे. समाजात त्यांना माणसं मत मिळत असे त्यांचा सामाजिक दर्जा समाधानकारक होता. समान दर्जा दिला जात असे. काही स्त्रियांची उच्च शिक्षणाची धडपड पाहण्याजोगी होती. तसे जनक राजाच्या दरबारातील सुलभा ही क्षत्रिय कन्या ब्रह्मद्रण्याच्या प्राप्तीसाठी अजन्म अविवाहित राहिली. त्या काळातील स्त्री जीवनाचे कर्तृत्व व आदर्श गांधारी,कुंती, दमयंती सावित्री यांच्या चरित्रावरून दिसून येते. पतिव्रता स्त्रियांचे उल्लेख येतात. त्यात प्रामुख्याने सती उमा सुनीती समीष्ठा भामिती यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येतो. आजच्यासारख्या स्त्री शिक्षणाची स्वतंत्र शाळेची व्यवस्था त्या काळात नव्हती. त्यांना घरीच शिक्षण दिले जाईल. ब्रह्मचर्य अवस्थेत च स्त्रियांना शिक्षण मिळत असे. डॉक्टर सरकटे यांच्या मतावरून असे लक्षात येते की प्राचीन काळात स्त्री जीवन आणि स्त्री शिक्षण समृद्ध होते मध्ययुगीन काळात मात्र स्त्री शिक्षणावर अनेक बंधने घातली गेली. प्राचीन भारतीय स्त्रियांचा आदर्श स्त्रीवादी भूमिकेला चालना आणि प्रेरणा देणारा आहे असेही येथे म्हणता येते.

* स्वातंत्र्योत्तर स्त्रीजीवन आणि स्त्री शिक्षण *. भारताला सण 1947 स्वातंत्र्य मिळाले. आणि भारतीय राज्यघटनेने नुसार राज्यकारभार सुरू झाला. तत्पूर्वी इंग्रज सरकारने अनेक सुधारणा घडवून आणल्या. स्त्रीशिक्षणामुळे स्त्री पुरुष समानता आली होती. शिक्षण मतदान मालमत्ता नोकरी अशा अनेक क्षेत्रात स्त्रीचा सहभाग घेतला जाऊ लागला होता. कायद्याने समानता मिळाली असली तरी अनेक सुविधा स्त्रीपर्यंत पोहोचत नव्हत्या. यासाठी ज्या स्त्रिया शिकल्या होत्या त्यांनी जनजागृती घडविण्याचे काम स्त्रीवादी साहित्यद्वारे सुरू केले होते. स्वातंत्र्य म्हणे पर्यंत स्त्रीवादी साहित्याने बरेच यश संपादन केले होते. समाजातील प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपला सहभाग नोंदविला होता. त्यामुळे स्त्रियांच्या न्याय हक्काविषयी वातावरण तयार झालेले होते. भारतीय राज्यघटनेमुळे न्याय स्वतंत्र समता बंधुता या मूल्यांचा स्वीकार करण्यात आलेला होता. स्त्रीविषयक अनेक कायदे केले गेले होते यामुळे दुसरी पुरुष समानता आली होती. ज्या ज्या क्षेत्रात संधी मिळेल तेथे क्षेत्र त्यांनी काबीज केले होते. साहित्य क्षेत्रातही त्यांनी मुलाची भर घालण्यास सुरुवात केली होती. विचारवंत लेखिका समीक्षक अशा क्षेत्रात ही स्वातंत्र्यानंतर भर घातली गेली.

सन 1950 नंतर स्त्री शिक्षणामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. भारतीय राज्यघटनेतून त्यांनी स्त्री शिक्षणाचे अनेक प्रश्न मार्गी लावले. त्यांनी स्त्री शिक्षण आरोग्य कुटुंब नियोजन असे अनेक प्रश्न सोडवून स्त्रीवादी साहित्य प्रेरणा दिली. पुढील काळात हिंदू कोड बिल पास झाले. पुरुषाच्या कमाईत स्त्रीहक्कादार झाली. मताचा वारसा ठरवण्याचा अधिकार तिला मिळाला. पोटगी विवाह घटस्फोट दत्तक विधान पालकत्व याविषयी अनेक निर्णय घेणे हिंदू कोडविल्यामुळे शक्य झाले, म्हणून हिंदू कोड बिल हे स्त्री जीवनास व वादी साहित्य अधिक चालना देणारे ठरले. भारतीय राज्यघटनेमुळे स्त्रीला स्व ची जाणीव झाले. यातूनच तिला शिक्षण मिळाले आणि ती लिहू लागली. आपले दुःख व्यथा वेदना साहित्यातून मांडू लागली.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी साहित्याबद्दल व स्त्रीजीवनाबद्दल डॉक्टर संगीता शेळके म्हणतात की अमेरिका आणि युरोपमधील अनेक देशांमध्ये 1965 नंतर आधुनिक काळात स्त्रीप्रश्नाविषयी चळवळ सुरू झाले. या चळवळीत मांडले गेलेल्या विचारांना स्त्रीवाद असे म्हणतात. कला कायदा रुढी संस्था आणि लोकमत या सर्व स्तरावर स्त्रियांना माणूसपणाचा मूल्य युक्त हक्क प्राप्त होण्यासाठी जाणीवपूर्वक दिली जाणारी राजकीय लढाई म्हणजे स्त्रीवाद होय. युरोप देशात स्त्रीवादा सुरुवात झाली. इंग्रजी लेखिका व्हार्जिनल वूल्फ आणि फ्रेंच लेखिका सिमॉन द बोव्हा या दोघींनी स्त्रीवादी विचारांचा पाया घातला. भारतामध्ये स्त्रीवादाने 1975 पासून चांगलाच जोर धरला. स्त्रीवादाचा या काळात सर्वत्र प्रसार होऊन सर्व स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी लढा दिला. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर घटनेद्वारे मतदानाचा शिक्षणाचा राजकारणात सहभाग हे प्राथमिक स्वरूपाचे हक्क मिळाले. स्वातंत्र्योत्तर स्त्रीवादी साहित्य पाश्चात्य लेखिका आणि विचारवंत यांचा मोठा प्रभाव आहे. त्यानंतर भारतीय राज्यघटनांमुळे स्त्रीशिक्षण सर्वत्र मिळू लागले असेही डॉक्टर संगीता शेळके यांच्या मतावरून स्पष्ट होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये स्त्रीवाती साहित्यास प्रेरणा म्हणून अनेक ग्रंथाचा उल्लेख करता येईल. ताराबाई शिंदे यांचा स्त्री पुरुष तुलना सिमोन दि बोव्हा यांचा द सेकंड सेक्स कमिटी फ्रेडन यांचा फेमिनाईन मिस्टेक हे ग्रंथ अधिक प्रेरणादायी ठरतात. छाया दातर यांचे स्त्री पुरुष गोदावरी परुडेकर यांचे जेव्हा माणूस जागा होतो, माधवी देसाई यांचे नाच ग घुमा, सुनिता देशपांडे यांचे आहे मनोहर तरी, मल्लिका अमर शेख यांचे मला उध्वस्त व्हायचं, कुमुद पावटे यांचे अंत स्फोट, बेबी कांबळे यांचे जीन आमचं, जनाबाई गिरे यांचे मरण कला, या साहित्य कृतीने स्त्रीवादी साहित्यामध्ये मोलाची भर घातलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीवादी साहित्याचा जसजसा प्रसार होत गेला तसतसे स्त्रीजीवनात प्रगती होत गेली. स्त्रीवादी साहित्य बद्दल मंगला वरखडे म्हणतात की, पुरुषाने लिहिलेल्या वाङ्मयातील स्त्रीदर्शनाचे या भूमिकेतून पुनर्विचन केले पाहिजे. स्त्रियांचे दुर्लक्षित राहिलेले वांग्मय या नव्या भूमिकेतून पुन्हा उजळत आणले पाहिजे. असा विचार अलीकडच्या काळात वेगाने रुजू लागला. या वैचारिक वाटचालींची अपरिहार्य फलश्रुती म्हणून स्त्रीवादी समीक्षेचा जन्म झाला. असे लक्षात

येते की स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीवादी साहित्य समीक्षेच्या ही महत्त्वाचा वाटा आहे. स्वातंत्र्यानंतर स्त्रीवादी साहित्यामध्ये मुलाची भर. कथा कादंबरी नाट्य काव्य या सर्व क्षेत्रात स्त्रीवादी साहित्य निर्माण झाले. नजुबाई गावित यांचे आदोर,आनंदीबाई शिर्के यांचे सांजवात, या आत्मकथनातून समाज जीवनातील स्त्रीचे स्थान अधोरेखित झालेले आहे. पुढील काळात जोशना देवधर गौरी देशपांडे सुमिती देशपांडे विभावरी शिरूरकर कुसुमावती देशपांडे कमल देसाई विजया राज्याध्यक्षता सरिता पत्की निर्मला देशपांडे वसुधा पाटील आशा बॅग रेघा पेजोन उर्मिला शिरूर सानिया माधवी देसाई या सर्व लेखिकांनी मराठी साहित्यामध्ये श्रिवादी साहित्य लिहून अनमोल असा ठसा उमटविला आहे. एकूणच स्त्रीवादी साहित्याची स्वातंत्र्यत्त वाटचाल ही अधिक प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे स्त्री पुरुष समता अधिक प्रमाणात निर्माण करणारी आहे.

* संदर्भ*. १) इंगोले ( डॉ) प्रतिमा,- लोकसंस्कृती आणि स्त्री जीवन & 39 दिलीप राज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती,२००३प्र. क्र.८१.

२) सरकटे ( डॉ) सदाशिव,- 1980 नंतरची स्त्रीवादी कविता &39 चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2011, प्र. क्र.१६.

३) जोशी च. वी ( संपा ), &39 अभिनव वागविलासा त्रेमासिक जून जुलै ऑगस्ट 2014, ऋतू प्रकाशन, अहमदनगर, प्र. क्र.१.

४) वरखेडे मंगला, &39 स्त्रियांचे कथालेखन, एक नवी दृष्टी नवी शैली सकीत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती 2005, प्र.क्र. १

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# आर्थिक साक्षरताद्वारे महिला सक्षमीकरण

**प्रा.डॉ.सतिश हरलाल पारधी**
कै.न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय,मारवड ता.अमळनेर
जि.जळगांव (महाराष्ट्र) मो.नं. ९९६०९४१२०३ ,E mail- satishprd82@gmail.com

**प्रस्तावना–**

निसर्गतःच स्त्रि-पुरूष समान आहेत. आईच्या पोटातून जन्माला येणारे बाळ हे जन्मतः निरागस असते. जन्माला आलेले बाळ स्त्रीलिंगी अथवा पुरूषलिंगी आहे हे ओळखण्याचे कार्य मानवाने केले आहे. धर्म,जाती,रूढी,परंपरा,चालीरीती याचा बाळाच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. समाजातील अनिष्ट अशा वागणूकीमूळे स्त्रि-पुरूष लिंगभेद वाढत गेला. भारतात पुरूषप्रधान संस्कृती स्विकारली गेली. सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार आणि निर्णय सामर्थ्य फक्त पुरूषांमध्येच आहे असा गैरसमज जनमाणसांत निर्माण झाला. हा विचारप्रवाह पुढे चालत आला. गुलामगिरीतून जरी भारताला मुक्त करण्यात आले परंतू स्त्रियांविषयी असलेली दुय्यम दर्ज्याची वागणूक मात्र तशीच राहिली.

आज परीस्थिती बदलली आहे. असे म्हटले जाते की, **"एक शिकलेली आई,घरा-दाराला पुढे नेई"** समाजाने महिलांवर लादलेल्या अनिष्ट रूढी,परंपरा,चालीरीतीतून मुक्त करण्याचे सामर्थ्य शिक्षणाने दिले. स्त्री भ्रूणहत्या,हुंडाबळी,महिलांवरील अत्याचार,महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी सरकारने कठोर कायदे आणि त्याची अंमलबजावणी करण्यास सुरूवात केल्यावर खऱ्या अर्थाने महिलांना त्यांचा अधिकार मिळाला. समाजव्यवस्था जर लिंगभेदावर आधारीत असेल तर देशाच्या प्रगतीत मोठा अडसर निर्माण होतो. लिंगभेदभाव दूर करून नवीन समाजव्यवस्था निर्माण केल्यास महिलांना खऱ्या अर्थाने जिवन जगण्याचा अधिकार प्राप्त होईल. देशातील महिला साक्षरतेचे प्रमाण २००१ च्या जनगणनेनुसार ५३.६७ टक्के इतके होते ते २०११ च्या जनगणनेत ६५.४६ टक्क्यापर्यंत वाढले. शिक्षणातून कौशल्य निर्मिती,स्वयंमरोजगारात वाढ होवून महिलांना आपल्या करीअरची संधी उपलब्ध झाली आहे. महिला उद्योजकांच्या बाबतीत विचार करता,महिला उद्योजकांचा वाटा भारतातील सर्व उद्योगांमध्ये फक्त १४ टक्के इतकाच असल्याचे राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार समोर आले आहे. परंतू यात ज्या महिलांनी आपला सहभाग नोंदविला आहे त्या महिला दुसऱ्या महिलांसाठी एक उदाहरण व प्रेरणा ठरल्या आहेत. भारत सरकारकडून महिलांच्या उद्योजकतेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम देखिल राबविण्यात येत आहेत. अर्थपूर्ण करीअरमधून देशात लैंगिक समानता आणि सामाजिक परीवर्तनाची लाट वाहू लागली आहे.

**संशोधन पध्दती–**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध संदर्भग्रंथ,मासिके,वर्तमानपत्रे,इंटरनेट सारख्या द्वितीयक सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे–**

1. महिलांमध्ये साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत आहे याचा अभ्यास करणे.
2. सामाजिक बदलातून स्त्रियांना आर्थिक उन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे याची चिकित्सा करणे.
3. महिलांनी व्यवसायभिमुखतेतून सक्षमीकरणाकडे एक पाऊल पुढे टाकले आहे याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहिते–**

1. आर्थिक साक्षर महिलांचे देशाच्या विकासात मोलाचे योगदान आहे.
2. महिला सक्षमीकरणातून महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाजाचा बदलला आहे.

**कोरोना काळातील महिलांचे कौशल्य–**

पुरूषांपेक्षा महिलांमध्ये सहनशिलतेचा गुण अधिक आहे. आलेल्या कुठल्याही संकटातून मार्ग काढण्याचे कौशल्य त्यांच्यात आहे. शिक्षणाबरोबरच रोजगारभिमुखता,कौशल्य विकसिततेचा गुण त्यांच्यात आहे.

चीनच्या हुबई प्रातांची राजधानी असलेल्या वुहान शहरांमध्ये डिसेंबर २०१९ मध्ये कोरोनाचा पहिला रूग्ण आढळला. संपूर्ण जगात कोरोना व्हायरस हवेच्या वेगाने पसरू लागला. भारतासह संपूर्ण जग या अचानकपणे आलेल्या संकटाचा सामना करीत होते. जागतिक आरोग्य संघटनेने देखिल जागतिक महामारी घोषित करीत याला आणीबाणी घोषित केली. संपूर्ण जग कधी विचार केले नव्हते अशा लॉकडाऊनमध्ये अडकले. आणीबाणीच्या परीस्थितीत देखिल महिलांनी कोरोनाचा पसार रोखण्यासाठी बचत गटाच्या मदतीने मास्क आणि सॅनिटायझर बनविण्याचे कार्य केले. कमीत-कमी वेळेत

अधिकाधिक लोकांचा जीव वाचविण्यासाठी मास्क आणि सॅनिटायझर निर्मितीतून महिलांनी आर्थिक साक्षरतेबरोबरच देशाची सेवा केली.

**आर्थिक साक्षरता ठरली महिलांच्या उन्नतीचा मार्ग-**

जगातील अनेक देशांमध्ये स्त्रि-पुरूष समानता पहावयास मिळते. भारतासारख्या पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन दुय्यम दर्ज्याचा आहे. महिलांनी घरातील कामे करावी,मुलांचे संगोपन करावे यातून आपले आयुष्य व्यतीत करावे एवढाच संकुचित विचार पुरूषांकडून दिसून येतो.

परंपरागत दृष्टीकोनातून बाहेर पडत आज स्त्रियांनी देशात नवा आदर्श निर्माण केला आहे. सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक,क्रिडा,सांस्कृतिक अशा प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपले मोलाचे योगदान दिले. पुरूषांच्या बरोबरीने देशात स्त्रि-पुरूष समानता निर्माण व्हावी यासाठी महिलांनी टाकलेले पाऊल कौतुकास्पद आहे. कौटुंबिक स्तरावर आर्थिक व्यवहारात कुठल्याही प्रकारचे स्थान न दिलेल्या महिला देशाच्या आर्थिक विकासात आपले योगदान देत आहे. विविध व्यवसायांचे कौशल्य आज महिलांनी अंगीकारले आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांमध्ये एक आत्मविश्वास निर्माण झाला. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी व्यवसाय सुरू करण्यासाठी स्वयंसहायता बचत गट स्थापन केले. यामूळे महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसीत होवून ही चळवळ खेडयापाडयापर्यंत जावून पोहोचली. महिलांनी एकमेकांना पूरक अशा व्यवसायांची निवड केल्यामूळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. यामूळे कौटुंबिक स्तरावर त्यांना जीवन जगण्याचा खरा अधिकार मिळाला. सर्व बॅंकेचे व्यवहार कोणत्याही पुरूषांच्या हस्तक्षेपाशिवाय करू लागल्या.

कोणत्या वस्तुचे उत्पादन करावे? कोणासाठी करावे? किती करावे? बाजारातील विक्रिव्युवहरचनेचा अचूक वेध त्यांनी घेतला आहे. आर्थिक साक्षरतेचे प्रमुख अंग म्हणजे बजेट,गुंतवणूक,कर्ज आणि बचत या सर्व घटकातून उत्तम अशी व्यवसायभिमुखता त्यांच्यात आली आहे. योग्य नियोजनासाठी आर्थिक ज्ञान असणे गरजेचे असते. पैसा उत्पादक आणि अनुत्पादक अशा दोन्ही कार्यांवर खर्च केला जातो. आपल्याकडील भांडवलाची योग्य व्यवसायात गुंतवणूक करून अनावश्यक अशा खर्चांवर नियंत्रण ठेवणे आर्थिक साक्षरतेचे प्रतिक मानले गेले. गृहउद्योग,हस्तद्योग,लघुउद्योग,मध्यम उद्योग,मोठे उद्योग, विविध रोजगार निर्मितीक्षम व्यवसाय करीत असतांना आर्थिक नियोजनाला अधिक महत्व आहे. हा आर्थिक नियोजनाचा गुण महिलांनी आत्मसात केला आहे. महिलांमध्ये उद्यमशिलता निर्माण व्हावी यासाठी ८ मार्च २०१८ रोजी महिला उद्यमशिलता प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आला. याद्वारे महिलांना स्वंयउद्योगाच्या माध्यमातून भरारी घेता येणार आहे.

रोजगारासाठी घराबाहेर पडलेल्या महिलांना बॅकांकडून रोजगारनिर्मीती,व्यवसायासाठी,उद्योगासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध केले जाते. घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड करीत महिलांनी चांगला आदर्श निर्माण केला आहे. मानवी श्रम आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने व्यवसाय,उद्योगात प्रगती साध्य केली आहे. मिळालेल्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड करून त्यांनी बचतीचा मार्ग अंगीकारला. उत्पन्नापेक्षा खर्च वाढणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली. व्यवसायातील प्रगतीमूळे उत्पन्नात वाढ होते आणि यातून बचत वाढू शकते याचे आर्थिक ज्ञान त्यांना अवगत झाले आहे.

छोटया-मोठया व्यवसायातून प्रगती करून बचतरूपी भांडवल पुन्हा एखाद्या व्यवसायात किंवा उद्योगात गुंतवणूक करता येईल व त्याचा विस्तार करता येवू शकतो याचे ज्ञान त्यांच्याकडे आहे. आर्थिक नियोजन,कर्ज,बचत,गुंतवणूक,विक्रीव्यवस्था,बाजारपेठेचे ज्ञान,प्रतिस्पर्धेची भूमिका,कौशल्य विकसीतता, व्यवसायभिमुखता या तत्वांचा अवलंब करून आर्थिक साक्षरतेची गुरूकिल्ली त्यांना मिळाली आहे. देशाच्या आर्थिक विकासात महिला व्यावसायिक,उद्योजकता यांची भुमिका महत्वाची ठरली आहे.

१ जानेवारी २०१३ पासून थेट रोख रक्कम हस्तांतरण योजनेच्या माध्यमातून भारत सरकारने सुमारे ३०० पेक्षा अधिक आर्थिक सहाय्यतेच्या योजनेतून ग्रामीण व शहरी भागातील उपेक्षित गरीब घटकांना त्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम हस्तांतरीत करण्यासाठी ही योजना कार्यान्वीत केली आहे. यात विविध योजनांच्या अनुदानातून महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल होतांना दिसत आहे. खात्यात रक्कम शासनाकडून हस्तांतरीत होत असल्यामूळे खऱ्या लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे.

**लखपती दिदी योजनेतून महिलांना मिळाला स्वावलंबीचा मार्ग-**

महिलांना देखिल आत्मसन्मानाने जीवन जगता आले पाहिजे यासाठी केंद्र व राज्य सरकारद्वारा अनेक प्रकारच्या आर्थिक उन्नतीच्या योजना राबविल्या जातात. लखपती दिदी त्या योजनेपैकी एक आहे.

आर्थिकदृष्टया महिलांना सक्षम बनविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२३ रोजी लाल किल्ल्यावरून या योजनेची घोषणा केली. केंद्रपुरस्कृत या योजनेचा प्रमुख उद्येश महिलांना आर्थिक साक्षर करण्याबरोबरच बचत गटातील महिलांना कौशल्यप्रधान प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात आला. बचत गटातील महिलांबरोबरच बॅंक दिदि,अंगणवाडी दिदि यांना देखिल प्रशिक्षण देण्यात येते. या योजनेद्वारे महिलांमध्ये कौशल्यप्रधानता,व्यवसायभिमुखता,डिजीटल साक्षरता,आर्थिक साक्षरतेबरोबरच महिला सक्षमीकरणाचा प्रमुख उद्येश आहे.

ISSN : 2278-9308
February 2024

भांडवलाअभावी महिलांना व्यवसाय,उद्योग सुरू करता येत नाही. परीणामी त्यांना आर्थिक उन्नतीचा मार्ग मिळत नाही. परंतू लखपती दिदि योजनेअंतर्गत अशा गरजू महिलांना व्यवसाय,उद्योग,शिक्षणासाठी सरकारकडून छोटी कर्जे कमी व्याजदराने उपलब्ध करून दिली जातात. या कर्जाचा उपयोग उत्पादक कार्यासाठी होत असल्यामूळे महिलांना रोजगार मिळाला असून त्यांच्या उत्पन्न व राहणीमानात सुधारणा होण्यास मदत होत आहे. डिजीटल व्यवहार करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण देखिल दिले जात असून यातून महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेची बीजे रोवण्याचे कार्य या योजनेच्या माध्यमातून करण्यात आले.

**बॅकिंग क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाच्या साहाय्याने महिला करू लागल्या व्यवहार-**

काळाची गरज लक्षात घेता देशातील बॅकिंग क्षेत्रातील नवतंत्रज्ञानामूळे बॅकेत न जाता देखिल आर्थिक व्यवहार सुरळीत पार पाडणे शक्य झाले आहे. यात वेळ,श्रम वाया जात नाही. खात्यात आपल्याजवळील रक्कम जमा करणे,खात्यातून पैसे काढणे,खात्यातून पैसे ट्रान्सफर करणे यासारख्या इंटरनेट बॅकिंग,मोबाईल बॅकिंग,ई-बॅकिंग सुविधेमूळे महिलांना तात्काळ व्यवहार करता येणे शक्य झाले आहे. व्यवसाय,उद्योगात मालाची देवाण-घेवाण करीत असतांना आर्थिक व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी बॅकेतील नवतंत्रज्ञानाचा फायदा महिलांना झाला आहे. महिलांना प्रवासात रोख रक्कम सोबत ठेवणे जोखीमीचे असल्यामूळे आधुनिक अशा डेबीट कार्ड,क्रेडीट कार्ड,एटीएम कार्ड,मोबाईल बॅकिंग,इंटरनेट बॅकिंगद्वारे व्यवहार होवू लागले. फोन पे,गुगल पे,पेटीएम,भीम ॲपद्वारे आर्थिक व्यवहार करणे सुलभ झाले असून यात महिला खऱ्या अर्थाने आर्थिक साक्षर झाल्याचे दिसून येते.

**सारांश-**

विकसीत भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पुरूषांबरोबरच महिलांचे देखिल योगदान महत्वाचे आहे. आर्थिक साक्षर होण्यासाठी महिलांनी बचत,गुंतवणूक,भांडवल,कर्ज,योग्य व्यवसायाची निवड,कौशल्यभिमुखता,डिजीटल साक्षरताद्वारे महिला सक्षम बनल्या आहे. योग्य आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे. सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,राजकीय क्षेत्रात महिलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक केले आहे. भारतातील पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई देविसींह पाटील तर दुसऱ्या महिला राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू आहेत. नुकतेच संपूर्ण भारताचा अंतरीम अर्थसंकल्प १ फेब्रुवारी २०२४ रोजी केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारमन यांनी संसदेत सादर केला. याचाच अर्थ संपूर्ण देशाची आर्थिक धुरा ज्यांच्या हाती आहे कर्तृत्ववान महिलांनी देशाच्या सर्वांगिण विकासावर लक्ष्य केंद्रीत केल्याचे पहावयास मिळते.

**संदर्भग्रंथ-**

1. उजगरे उमेश (सप्टेंबर २०२१),योजना, भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रकाशित,बेलापूर,नवी मुंबई पृ.क्र. १४,१५,३२.
2. www.wikipedia.org 2 feb २०२४
3. उजगरे उमेश (डिसेंबर २०२१),योजना, भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रकाशित,बेलापूर,नवी मुंबई पृ.क्र. ३७,३८.
4. प्रसाद नीता (नोव्हेंबर २०१०),योजना, भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रकाशित,बेलापूर,नवी मुंबई पृ.क्र. ४६,५०.
5. झा.राजेशकुमार, (फेब्रुवारी २०१३),योजना, भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रकाशित,बेलापूर,नवी मुंबई पृ.क्र. २१,२२.
6. धर्माधिकारी वंदना ( नोव्हेंबर २०११), मैत्री बॅकिंगशी,सकाळा प्रकाशन,पुणे पृ.क्र. ११२,११३.
7. www.wikipedia.org (Census of India 2001,2011) 6 feb 2024.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# पंचवार्षिक योजना व महिला सक्षमीकरण

**श्रीमती मनीषा शांताराम नगराळे**
संशोधक
वेलीमाता माध्य. व उच्च माध्य.
आश्रमशाळा, वेली. ता. अक्कलकुवा
जि. नंदुरबार.

**डॉ. प्रशांत रामदास बोबडे**
मार्गदर्शक
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, तळोदा.
ता. तळोदा, जि. नंदुरबार

**सारांश-**

वेगवेगळ्या समस्या आणि विषय एकमेकांशी अंतर्गतरित्या जोडलेले असतात. यातील महत्त्वाच्या आंतरसंबंधापैकी एक म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक विकास, बेरोजगारी,दारिद्र्य,गरिबी,मागासलेपण व स्त्रियांची स्थिती तसेच आर्थिक नियोजनात पंचवार्षिक योजना विविध धोरणे,तत्सम योजनांचे महत्त्व आणि महिला सक्षमीकरण.

भारताच्या विकासाचे धोरण काळानुसार बदलत गेले आहे.जागतिक अर्थव्यवस्थांच्या बदलांचा तसेच वाढत्या आर्थिक सत्तेचा प्रभाव भारताच्या विकास धोरणांवर पडला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील नव्याने स्वतंत्र झालेल्या भारतासहित जगातील इतर देशांपुढे दारिद्र्य,उपासमार,आर्थिक विषमता यासारख्या समस्यांना सामोरे जाऊन देशाला आर्थिक स्थिरता प्रदान करून विकास घडवून आणण्याचे आव्हान होते. भारताने आर्थिक विकासासाठी नियोजनाचा दृष्टिकोन स्वीकारला. त्यासाठी 1950 मध्ये नियोजन आयोगाची निर्मिती करण्यात आली याशिवाय समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये महिलांच्या प्रगतीसाठी विविध धोरणे व कार्यक्रम आखण्यात येऊन महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देण्याचे प्रयत्न झाले आहेत.

**प्रस्तावना-**

प्राचीन काळापासूनच भारतीय अर्थव्यवस्थेची जगातील इतर देशांच्या अर्थव्यवस्थांच्या तुलनेत सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक व राजकीय दृष्ट्या वेगळी ओळख आहे.भारतीय लोक राजकीय दृष्ट्या जागरूक होते,म्हणूनच स्वातंत्र्य मिळवून लोकशाही जीवन लाभावे म्हणून त्यांनी स्वातंत्र्यपूर्वीपासूनच प्रयत्न केल्याचे जाणवते.स्वातंत्र्य चळवळीत अनेकांचे बलिदान,त्याग,समर्पण व भारतीयांच्या एकात्मतेतून भारतातील लोकशाही व्यवस्था निर्माण झाली आहे.या काळात भारतीय जनतेला सुजान व दूरदर्शी नेतृत्व लाभले. नागरिकांचे जीवन स्वतंत्र निर्भय व स्वावलंबी बनावे म्हणून त्यांनी सतत चिंतन केले. स्वातंत्र्यानंतर नियोजन आयोगाने देशाच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी केली.खाजगी क्षेत्राऐवजी सार्वजनिक क्षेत्राला महत्त्व देण्यात आले.भारताची समाजवादाची संकल्पना कल्याणकारी राज्याला प्रोत्साहन देणे तसेच रोजगार निर्मिती करण्यावर आधारित आहे.पंचवार्षिक योजनेअंतर्गत दारिद्र्य,बेरोजगारी निर्मूलनासाठी विविध कार्यक्रम व धोरणे निर्मिती व योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

1960 च्या दशकापासून महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी कल्याणकारी योजना म्हणून शिक्षणावर भर देण्यात आला.आरोग्यविषयक कार्यक्रमांचा भरमातृत्व आणि बालकांसाठी आरोग्य सुविधा,,शिक्षण,पोषण व कुटुंब नियोजन हा होता.

प्रस्तुत संशोधनात आर्थिक नियोजन,पंचवार्षिक योजना,प्रधानमंत्री आवास योजना व महिला सक्षमीकरणाविषयी प्रकाश टाकण्यात आला आहे.

**गृहीते :-**

1) देशाच्या आर्थिक विकास व स्थैर्यासाठी आर्थिक नियोजनाची भूमिका महत्त्वाची असते.

2) दारिद्र्य निर्मुलन योजनेमुळे गरीब कुटुंबात आर्थिक, सामाजिक,सांस्कृतिक बदल घडून येत आहे.

3) प्रधानमंत्री आवास योजनेमुळे आर्थिक विषमता कमी होत आहे.

4) देशाच्या अर्थव्यवस्थेत स्त्रियांचे योगदान व महिला सक्षमीकरणाचे धोरण यात परस्पर संबंध असल्याचे दिसून येते.

**उद्दिष्टे :-**

1) भारताच्या आर्थिक विकासात आर्थिक नियोजनांची भूमिका तपासून पाहणे.

2) दारिद्र्य निर्मुलन योजनेमुळे गरिब कूटूंबांतील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदल अभ्यासणे.

3) प्रधानमंत्री आवास योजनेमुळे आर्थिक विषमता कमी होत आहे याविषयी अध्ययन करणे.

4) अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे योगदान व महिला सक्षमीकरण याविषयीसंबंधांचे आर्थिक अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला असून त्यात प्रकाशित ग्रंथ,पुस्तके,मासिके,इंटरनेट,ई-जर्नल्स इत्यादी पद्धतींचा वापर करून संकलित माहितीच्या आधारे शोध निबंधाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**आर्थिक नियोजन, संकल्पना :-**

भारताच्या नियोजन मंडळांने आर्थिक नियोजनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

" पूर्वनिर्धारित सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी देशातील संसाधनांना संघटित करून त्यांचा महत्तम लाभकारक उपयोग करण्याच्या दृष्टीने अवलंबिण्यात येणारी पद्धती म्हणजे नियोजन होय."

थोडक्यात देशाच्या जलद गतीने व संतुलित आर्थिक विकास घडवून साधनसामग्रीचा महत्तम उपयोग घडून यावा आणि पूर्वनियोजित उद्दिष्टे ठराविक मुदतीत साध्या करता यावी याकरिता विभिन्न पातळयांवर करण्यात आलेल्या पद्धतशीर प्रयत्नांना आर्थिक नियोजन म्हणता येईल.आर्थिक नियोजन हे साध्य नसून साधन आहे.

**आर्थिक नियोजनाची आवश्यकता :-**

स्वातंत्र्योत्तर भारताला आर्थिक वृद्धीची तत्काळ गरज होती.मात्र त्याबरोबरच उत्पन्न वितरणातील असमानता दूर करून लोकांचा जीवनस्तर लवकर उंचावण्याची गरज होती.त्यामुळे देशाच्या नेतृत्वाकडे मुक्त बाजार व्यवस्थेचा अवलंब करावा की आर्थिक नियोजनाचा स्वीकार करावा हा प्रश्न होता.मुक्त अर्थव्यवस्था ही केवळ नफ्याने प्रेरित असते, त्यामुळे सर्व मुक्त बाजार व्यवस्थेवर सोडून दिल्यास एकूण उत्पादन वाढून आर्थिक वाढ होऊ शकते.मात्र उत्पन्न व संपत्तीचे पुनर्वितरण समान होऊन आर्थिक विकास होईलच याची शाश्वती नसते.त्यामुळे सरकारने आर्थिक विकासाचे साधन म्हणून आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला.ज्याद्वारे आर्थिक वृद्धी बरोबरच लोकांचे जीवनमान सुधारता येईल,तसेच गरिबी व आर्थिक विषमता दूर करता येईल.

**दारिद्र्याची संकल्पना :-**

"दारिद्र्याच्या पारंपारिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्ना-अभावी अन्न,वस्त्र,निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही अशी स्थिती होय."

भारतात लोकसंखेचा मोठा भाग गरीबीमध्ये उदरनिर्वाह करीत आहे.भारतात असणारी गरीबी ही चिरस्थायी असून ती पूर्वापार चालत आलेली आहे.आज गरीबी कमी होत असली तरीही त्याचे प्रमाण अतिशय कमी आहे.दारिद्र्य हे भारतातील अर्थव्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान असून आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडित आहे.गरिबी

म्हणजेच कुटुंबांच्या अन्न,वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पुरवण्याइतक्या संपत्तीचा अभाव,योग्य संधी व पर्यायांचा अभाव तसेच मानवी प्रतिष्ठेचे उल्लंघन,याचाच अर्थ समाजामध्ये प्रभावीपणे भाग घेण्याच्या क्षमतेचा अभाव होय.

भारताने आर्थिक विकासाच्या जोडीने सामाजिक न्याय साधावयाच्या ध्येयाला महत्त्व दिले आहे.गरीबी निर्मूलन आणि विकासासाठी सामाजिक न्याय व समतेवर आधारित विकास हे भारताचे धोरण राहिले आहे.सरकारने गरिबांच्या मदतीसाठी तसेच समग्र विकास घडवून आणण्यासाठी वेळोवेळी विविध कार्यक्रम योजलेले आहेत.तसेच दारिद्र्य निर्मूलनासाठी विविध योजना,आर्थिक सुधारणा,20 कलमी कार्यकृरम यासारखे कार्यक्रम राबविले आहे.

**पंचवार्षिक योजना :-**

भारतात एक एप्रिल 1951 पासून आर्थिक नियोजनास सुरुवात करण्यात आली व तेव्हापासूनच पंचवार्षिक योजनांची शृंखला सुरू करण्यात आली.एकूण 12 योजना व त्या व्यतिरिक्त 7 वार्षिक योजना ही राबविण्यात आल्या.पंचवार्षिक योजना प्रक्रियेत तीन वेळा खंड पडला आहे.हा खंड 1966 ते 69 दरम्यान पहिल्यांदा,1978-80 दरम्यान दुसऱ्यांदा, 1990-92दरम्यान तिसऱ्यांदा निर्माण झाला. मात्र त्यापैकी केवळ 1966-69 च्या कालावधीसच योजना सुट्टीचा काळ असे म्हणतात.

**तक्ता दृष्टीक्षेपात पंचवार्षीक योजना**

| **योजना** | **कालावधी** | **मुख्य भर** | **प्रतिमान** | **आर्थीक वृध्दी दर** | | **सार्व. श्रेत्रापैकी सर्वाधिक खर्च** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **संकल्पित %** | **साध्य %** | |
| 1 | 1951-56 | कृषी | हेरॉल्ड डोमर | 2.1 | 3.6 | कृषी व जलसिंचन |
| 2 | 1956-61 | जड व मुलभुत उदयोग | महालनोबीस | 4.5 | 4.21 | वाहतुक व दळण वळण |
| 3 | 1961-66 | कृषी व जड उदयोग | महालनोबीस/ एस.चक्रवर्ती | 5.6 | 2.72 | वाहतुक व दळण वळण |
| वार्षीक योजना | 1966-69 | स्वावलंबन | - | 5.0 | 3.9 | - |
| 4 | 1969-74 | स्वावलंबन / स्थौर्यासह वाढ | ॲलनमान व रुद्र /धनंजयराव गाडगीळ | 5.7 | 2.05 | कृषी व जलसिंचन |
| 5 | 1974-78 | दारिद्र निर्मुलन व स्वावलंबन | ॲलन व रुद्र / डी.डी.धर | 4.4 | 4.83 | उदयोग |
| सरकती योजना | 1978-80 | लघु व कुटीर उदयोग व रोजगार निर्मीती | प्रो.लकडावाला | - | -5.2 | - |
| 6 | 1980-85 | दारिद्र निर्मुलनव रोजगार निर्मीती | ॲलन व अशोक रुद्र | 5.2 | 5.54 | उर्जा |
| 7 | 1985-90 | उत्पादक रोजगार निर्मीती | ब्रम्हानंद व वकील | 5.0 | 6.02 | उर्जा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वार्षीक योजना | 1990-92 | - | - | - | 3.4 | - |
| 8 | 1992-97 | मानव विकास / सुचक नियोजन | राव – मनमोहन / L.P.G. | 5.6 | 6.8 | उर्जा |
| 9 | 1997-02 | कृषी व ग्रामीण विकास | - | 6.5 | 5.55 | उर्जा |
| 10 | 2002-07 | शिक्षण | - | 8.0 | 7.8 | सामाजिक सेवा |
| 11 | 2007-12 | सामाजिक सेवा | - | 9.0 | 8.2 | सामाजिक सेवा |
| 12 | 2012-17 | सामाजिक सेवा | - | 8.0 | - | सामाजिक सेवा |

**नोट :-** पहिल्या तीन योजनांमध्ये वाढीचा दराचे लक्ष्य NNP च्या स्वरुपात ठरविण्यात आले होते.चौथ्या योजनेत ते NDP च्या स्वरुपात तर त्यानंतर मात्र ते GDP च्या स्वरुपात ठरविण्यात येत आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना - शहरी**

सरकारने 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे ही घोषणा करून 25 जून 2015 रोजी प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यात आली.

**वैशिष्ट्ये:-**

1. 2022 पर्यंत 2 कोटी शहरी घरे बांधणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.त्यामध्ये 2011 च्या जनगणनेच्या सर्व शहरांचा समावेश आहे.
2. योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये अल्प उत्पन्न गटातील महिला.अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक यांचा समावेश आहे.
3. लाभार्थ्यांना 6 लाख रु.चे कर्ज 6.5% या अनुदानित दराने 15 वर्षाच्या कालावधीसाठी प्राप्त होईल.त्यापेक्षा अधिक कर्जावर मात्र अनुदान प्राप्त होणार नाही.
4. योजनेअंतर्गत बांधलेले घर कुटुंबातील जेष्ठ महिलेच्या नावाने किंवा पुरुष व महिलेच्या संयुक्त नावाने दिले जाईल.
5. योजनेअंतर्गत घर हे सर्व मूलभूत सुविधांनी युक्त असलेले 30 चौरस मीटर क्षेत्रफळाचे असेल.

6) योजना 2015 ते 2022 या 7 वर्षांमध्ये तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येईल

* पहिला टप्पा - एप्रिल 2015 ते मार्च 2017 दरम्यान 100 शहरांमध्ये
* दुसरा टप्पा - एप्रिल 2017 ते मार्च 2019 दरम्यान आणखी 200 शहरांमध्ये
* तिसरा टप्पा - एप्रिल 2019 ते मार्च 2022 दरम्यान उर्वरित शहरांमध्ये

**प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण**

2022 पर्यंत सर्वांसाठी घरे या अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या योजनेच्या अंमलबजावणीची सुरुवात 1 एप्रिल 2016 पासून करण्यात आली.

**वैशिष्ट्ये :-**

1 ) योजनेच्या पहिल्या टप्प्यात 2016-17 ते 2018-19 या तीन वर्षाच्या काळात ग्रामीण भागात एक कोटी घरे बांधण्यासाठी सहाय्य देण्याचे उद्दिष्ट होते.

2) घर बांधण्यासाठी सपाट प्रदेशात 1.2 लाख रुपये तर डोंगराळ/दुर्गम प्रदेशात 1.3 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

3) ही रक्कम केंद्र व राज्य सरकार मार्फत सपाट प्रदेशात 60:40 प्रमाणात तर डोंगराळ/दुर्गम प्रदेश/ पूर्वोत्तर राज्यांमध्ये 90:10 च्या प्रमाणात प्रदान केली जाईल.

4) या योजनेअंतर्गत घर हे स्वयंपाकाची जागा,वीज,शौचालय,अंआघोळीची जागा,पेयजल इत्यादी सुविधा सहित एक संपूर्ण घर असेल तरच पैसे लाभार्थ्याचा खात्यावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने भरले जातील.

5) योजनेचे लाभार्थी इंदिरा आवास योजनेप्रमाणेच असून त्यांची निवड सामाजिक,आर्थिक व जातीनिहाय जनगणनेनुसार गावाच्या ग्रामसभेमार्फत केली जाईल.

**महिला सक्षमीकरण :-**

19 व्या शतकाच्या पहिल्या दशकांमध्ये जगात अनेक ठिकाणी स्त्रीवादी चळवळींचा उदय.झाला तेव्हापासून स्त्रियांच्या सामाजिक,राजकीय व आर्थिक हक्कांवर सातत्याने भर देण्यात आला.1976 मध्ये संयुक्त राष्ट्रांचे स्त्रियांसाठीचे दशक सुरू झाले.जगात सर्वत्र स्त्रियांना समान हक्क,संधी आणि प्रोत्साहन मिळावे हा या कार्यक्रमाचा हेतू होता.शिक्षण, आरोग्य,कामांच्या जागा,जमिनीची मालकी आणि मानवी हक्क याबाबत स्त्रियांना जाणवणारी असमानता यावर लक्ष केंद्रित केले गेले.

9. गेल्या काही वर्षांत, लैंगिक असमानता आणि महिलांवरील वाईट प्रथा दूर करण्यासाठी सरकारने अनेक संवैधानिक आणि कायदेशीर अधिकार तयार केले आणि लागू केले आहेत. मात्र, एवढा मोठा प्रश्न सोडवण्यासाठी महिलांसह सर्वांच्या सततच्या सहकार्याची गरज आहे.

10. आधुनिक समाज महिलांच्या हक्कांबाबत अधिक जागरूक आहे, परिणामी अनेक बचत गट आणि स्वयंसेवी संस्था या दिशेने काम करत आहेत.

**भारतीय अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान**

1. भारतातील श्रमशक्तीच्या २९ टक्के महिलांचे प्रतिनिधित्व आहे.

2. जागतिक बँकेच्या मते, अरब जगाचा काही भाग वगळता औपचारिक अर्थव्यवस्थेत भारतीय महिलांचा सहभाग जगातील सर्वात कमी आहे.

3. शेती: जरी ते सुमारे ४० टक्के शेतमजूर आहेत, तरीही ते भारतातील केवळ ९ टक्के जमिनीवर नियंत्रण ठेवतात.

4. जीडीपीमध्ये योगदान: भारतातील महिलांचे जीडीपीमध्ये केवळ १८ टक्के योगदान आहे, जे जागतिक सरासरी ३७ टक्क्यांपेक्षा खूपच कमी आहे.

5. भारतातील महिलांनी केलेले निम्म्याहून अधिक काम हे बिनपगारी आहे आणि जवळपास सर्वच अनौपचारिक आणि असुरक्षित आहेत.

6. व्यावसायिक नेत्यांसह बहुतेक क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व चांगले नाही.

7. औपचारिक आर्थिक व्यवस्थेतूनही महिलांना वगळण्यात आले आहे. भारतातील जवळपास निम्म्या महिलांकडे स्वतःच्या वापरासाठी बँक किंवा बचत खाती नाहीत आणि ६० टक्के महिलांकडे त्यांच्या नावावर कोणतीही मौल्यवान मालमत्ता नाही.

8. भारतातील महिलांची शारीरिक क्षमताही उत्तम आहे.

**भारतातील महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील अडथळे -** भारतीय समाजात अनेक रूढी, श्रद्धा आणि परंपरांचा समावेश आहे. काही जुन्या समजुती आणि परंपरा अशाही आहेत ज्या भारतातील महिला सक्षमीकरणात अडथळा ठरतात. त्यातील काही रूढी,परंपरा,बंधने पुढीलप्रमाणे आहेत

* जुन्या आणि सनातनी विचारसरणीमुळे भारतातील अनेक भागात महिलांना घराबाहेर पडण्यास बंदी आहे. अशा भागात महिलांना शिक्षण किंवा नोकरीसाठी घराबाहेर पडण्याचे स्वातंत्र्य नाही.

* जुन्या आणि सनातनी विचारसरणीच्या वातावरणात राहिल्यामुळे, स्त्रिया स्वतःला पुरुषांपेक्षा कमी समजू लागतात आणि त्यांची सध्याची सामाजिक आणि आर्थिक स्थिती बदलण्यात अपयशी ठरतात.

* कामाच्या ठिकाणी होणारे शोषण हा देखील महिला सक्षमीकरणातील एक मोठा अडथळा आहे. खासगी क्षेत्र जसे की सेवा उद्योग, सॉफ्टवेअर उद्योग, शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये या समस्येने सर्वाधिक प्रभावित आहेत.

* समाजातील पुरुषी वर्चस्वामुळे स्त्रियांसाठी समस्या निर्माण होतात. कामाच्या ठिकाणी महिलांवरील हिंसाचार अलीकडच्या काळात खूप वेगाने वाढला आहे आणि गेल्या काही दशकांमध्ये त्यात सुमारे १७० टक्के वाढ झाली आहे.

* भारतात, अजूनही कामाच्या ठिकाणी महिलांशी लिंग पातळीवर भेदभाव केला जातो. अनेक भागात महिलांना शिक्षण आणि नोकरीसाठी घराबाहेर पडण्याची परवानगीही नाही. यासोबतच त्यांना स्वतंत्रपणे काम करण्याचे किंवा कुटुंबाशी संबंधित निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते आणि प्रत्येक कामात त्यांना नेहमीच पुरुषांपेक्षा कमी समजले जाते.

* भारतातील महिलांना त्यांच्या पुरुष समकक्षांपेक्षा कमी पगार दिला जातो आणि असंघटित क्षेत्रात, विशेषत: रोजंदारी असलेल्या ठिकाणी ही समस्या अधिक गंभीर आहे.

* समान वेळ समान काम करत असूनही, स्त्रियांना पुरुषांपेक्षा खूपच कमी मोबदला दिला जातो आणि असे काम स्त्री आणि पुरुष यांच्यातील शक्ती असमानता दर्शवते. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना त्यांच्या पुरुष समकक्षांइतकाच अनुभव आणि पात्रता असूनही त्यांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते.

* महिलांमध्ये निरक्षरता आणि अभ्यास सोडणे यासारख्या समस्या देखील महिला सक्षमीकरणातील प्रमुख अडथळे आहेत. शहरी भागातील मुली शिक्षणाच्या बाबतीत मुलांच्या बरोबरीने असल्या तरी ग्रामीण भागात त्या खूपच मागे आहेत.

* भारतातील स्त्री शिक्षण दर ६४.६ टक्के आहे, तर पुरुष शिक्षण दर ८०.९ टक्के आहे. शाळेत जाणाऱ्या अनेक ग्रामीण मुलींचा अभ्यासही अर्धवट सोडला जातो आणि त्यांना दहावीही पास करता येत नाही.

* गेल्या काही दशकांमध्ये सरकारने घेतलेल्या प्रभावी निर्णयांमुळे भारतातील बालविवाहासारख्या दुष्कृत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली असली, तरी २०१८ मधील युनिसेफच्या अहवालात असे दिसून आले आहे की भारतात अजूनही दरवर्षी सुमारे १५ लाख. मुलींचे वय १८ वर्षापूर्वीच लग्न केले जाते, लवकर लग्न झाल्यामुळे महिलांचा विकास थांबतो आणि त्या शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या वाढू शकत नाहीत.

* हुंडाबळी, ऑनर किलिंग आणि तस्करी यासारखे गंभीर गुन्हे भारतीय महिलांवरील अनेक घरगुती हिंसाचारासह दिसतात. मात्र, ग्रामीण भागातील महिलांपेक्षा शहरी भागातील महिला गुन्हेगारी हल्ल्यांना अधिक बळी पडतात.

* नोकरदार महिला देखील त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रात्री उशिरा सार्वजनिक वाहतूक वापरत नाहीत. खर्या अर्थाने महिला सक्षमीकरण तेव्हाच होऊ शकते जेव्हा महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करता येईल आणि पुरुषांप्रमाणे त्याही बिनधास्तपणे कुठेही येऊ शकतील.

* स्त्री भ्रूणहत्या किंवा लिंग-आधारित गर्भपात हा भारतातील महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. स्त्रीभ्रूणहत्या म्हणजे लिंगाच्या आधारे भ्रूणहत्या, ज्या अंतर्गत स्त्री भ्रूण आढळून आल्यावर आईच्या संमतीशिवाय गर्भपात केला जातो. स्त्री भ्रूणहत्येमुळे हरियाणा आणि जम्मू-काश्मीरसारख्या राज्यांमध्ये स्त्री-पुरुषांच्या लिंग गुणोत्तरात मोठी तफावत निर्माण झाली आहे. स्त्री भ्रूण हत्येचा समूळ उच्चाटन केल्याशिवाय आपले महिला सक्षमीकरणाचे हे दावे पूर्ण होणार नाहीत.

**संदर्भः**

1. अनघा तांबे,भारतातील स्त्रिया,क्रांतिज्योती प्रकाशन,सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ,२००९
2. कुमुद करकरे, स्त्री मुक्ती चळवळ, समाजवादी महिला सभा, डिसें. १९७८
3. कुंता जगदाळे, नारी समस्या, बार्शी, जानेवारी १९९५
4. योजना, संपा. रीना कोहली, केंद्र सरकारचा माहिती व प्रसारण मंत्रालय विभाग, मुंबई, अंक ११, जून २०१२
5. संपा. शैलेश राजपूत, स्मार्ट उद्योजक, मुंबई.
6. N.S.S.O. Literacy and level of Education 55th round, 2000.
7. Ministry of Human Resource Development selected Educational Statistics, 2001.
8. Website: www.researchjourney.net

# भारतीय स्वातंत्र्य लढयात स्त्रियांचे योगदान

प्रा.डॉ.सुनिल भालेराव पाटील
इतिहास विभाग वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा.

**प्रस्तावना:-**

भारताच्या आधुनिकीकरणास प्रेरणा देणारी सर्वांगीण सुधारणेच्या चळवळीतून देशात प्रबोधनाला सुरूवात झाली. 19 व्या शतकापर्यंत देशातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीयदृष्टया स्त्रियांचा दर्जा प्रचंड खालावला होता. स्त्रिचे कुटुंबातील स्थान, जातीव्यवस्था, बंदिस्त् स्त्री, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, बालहत्या, सतीप्रथा, केशवपन, स्त्री शिक्षणाची पहाट, मनोरंजन, व्रत वैकल्य्, नवस, अलंकार, पोशाख, केशभूषा, आहार, कृषीव्यवस्थेतील स्त्रियांचा सहभाग, उद्योगधंदयातील स्त्रियांचा सहभाग वैद्यकिय क्षेत्रात आनंदीबाई जोशी, रखमाबाई, कांदबिनी बसू, हिल्डा लाझारस यांनी या व्यवसायात प्रवेश केला. याशिवाय स्वातंत्र्य लढयातील तळागाळातील कार्यकर्त्या स्त्रिया सत्याग्रहात ही सहभागी झाल्यात.

भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ व आदर्श् मानली जाते. यात ती परंपरा व सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन घडवते. अशा इतिहासाचा अभ्यास करतांना त्या त्या कालखंडात संपूर्ण समाजात चैतन्य्, जागृती करणारी शक्ती असामान्य् अनेक व्यक्तीत राहते. त्या व्यक्तीच्या विचारांचा आधार घ्यावाच लागतो. सजीव सृष्टीत इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आकार, वेगळी जीवन शैली, उदरनिर्वाहाची वेगळी संसाधने असणा-या मानवाच्या निर्मिती बाबतचा प्रश्न हा गुढ स्वरूपात आहे. संस्कृतीत स्त्री म्हणून संबोधलेल्या मानवास काय स्थान दिले याचा जेव्हा अनेक समाजसुधारक, विचारवंत अभ्यास करतात तेव्हा त्यांचा सुधारणेच्या चळवळीत सहभाग महत्वाचा मानला जातो. यात स्त्रियांचा राजकीय चळवळीत भारतात सर्व प्रथम सहभाग नोंदवीला जातो. तो महात्मा गांधींनी सुरू केलेल्या चळवळीतील आहे. चूल आणि मुल या कार्यापलिकडे स्त्रियांच्या शक्तीला एक वेगळे रूप दिले. ते देशाच्या स्वातंत्रयासाठी केलेल्या चळवळीत सहभाग होय. त्यांनी निद्रीस्त् महिला समूहाला विचाराने व कृतीने गतीमान केले. इतिहासाच्या विविध कालखंडातील राज्याचे, शासनाचे स्वरूप, समाजात विकसित झालेले राजकीय दृष्टीकोणामुळे राजकीय संस्कृतीला मिळालेला आकार यातून विकसित झालेल्या राजकीय मूल्यांच्या अभ्यासातून एक समग्र दृष्टीकोन विचारात येत असतो.

ब्रिटीश सत्तेविरूध्द संघर्षाचा अभिनव मार्गाचे प्रात्य्क्षिक स्वातंत्र्य चळवळीने निर्दशनास आले. हातात शस्त्र न घेता प्रबळ सत्तेविरूध्द यशस्वीरित्या लढता येते हे दृश्य् देशाच्या स्वातंत्र्य् आंदोलनाने सा-या विश्वास दाखवून दिले. यातून जगाच्या निरनिराळया भागातील दबल्या गेलेल्या मानवी समाजाला जुलूम व अत्याचारा विरूध्द संघर्षाचे एक नवे तंत्र यातुन विकसित झाले. देशाच्या स्वातंत्र्य् चळवळीचे एक विशेष वैशिष्टये म्हणजे भारतीय महिलांचा स्वातंत्र चळवळीत स्वप्रेरणेने व उत्साहपूर्ण सहभाग होय. सभा, संमेलने, चर्चा, निर्दशने, प्रचारात महिला आघाडीवर होत्या. परिणामी महिलांचा आत्म्विश्वास, आत्मभान, नेतृत्व् गुण विकसित होऊ लागले. यातून सामाजिक, राजकीय जाणिव जागृतीने व्यापक राजकीय दृष्टीकोन त्यांना प्राप्त् झाला. देशाच्या स्वातंत्रयाच्या चळवळीत महिलांच्या सहभागामुळेच भविष्यातील राजकारणात महिला सहभागी होवू लागल्या याशिवाय त्यांना मतदानाचा हक्क्, इतर संवैधानिक हक्क प्राप्तीसाठी अनुकूल वातावरण निर्मितीस स्वातंत्रयाची चळवळ पोषक ठरली. स्वातंत्रयाच्या चळवळीतील महिलांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान महत्वपूर्ण ठरते. या आंदोलनात विविध जाती धर्मातील पुरूष,

बालक, आबाल वृध्दांचे एक संघटनात्मक योगदान राहिले आहे. यात महिला क्रांतिकारक व समाज सुधारकांची भूमिका महत्वाची राहिली आहे.

**1)विषयाचे उदिष्टये :-**

1) भारतीय स्वातंत्रय आंदोलनात महिलांची भूमिका मांडणे.

2) स्वातंत्रय आंदोलनात महिलांच्या योगदानाच्या फलनिष्पतीचा शोध घेणे.

3) राजकिय व सामाजिक कार्य करणा-या महिलांचा शोध घेणे.

4) महिलांच्या राजकीय भान जागृती मागील वृत्तपत्रांची भूमिका तपासून पाहणे.

5) महिलांचे कार्य नव्या पिढीला प्रेरणादायी दिशा दर्शक ठरणे.

**2) संशोधन पध्दती :-** शोधनिबंधाच्या मांडणीसाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा अवलंब केला आहे. राजकीय विचारांनी भारवलेली त्या काळातील वृत्तपत्रे, समाज सुधारकांचे कार्य, विविध संशोधन पत्रिका, ऐतिहासिक ग्रंथातील माहितीचा वापर केला आहे.

**3) भारतीय स्वातंत्रय लढयात महिलांचा सहभाग :-**

देशाच्या स्वातंत्रयाच्या चळवळीत प्रारंभीच्या काळात महिलांचा सहभाग अल्प् स्वरूपात होता. 1885 च्या स्थापन झालेल्या कॉग्रेस मध्येही स्त्रियांचा फारच अल्प् सहभाग होता. ब्रिटीश सरकारच्या काळात लॉर्ड कर्झनने प्रशासनाच्या नावाखाली 1905 मध्ये बंगाल प्रांताची फाळणी केली. या फाळणीच्या विरोधात वंगभंग आंदोलन उभारले गेले. बंगालच्या फाळणीला विरोध म्हणून स्वदेशीची चळवळ लोकमान्य् टिळकांनी सुरू केली. या स्वदेशीच्या चळवळीत काही प्रमाणात महिलांचा सहभाग वाढला. त्यांनी फाळणीच्या धार्मिक व परिचित भावना जागृत केल्या. यासाठी त्यांनी राखी बांधून व उपवास करून या चळवळीसाठी पुढाकार घेतला. तत्कालीन सर्व प्रथा, परंपरांना अव्हेरणे एवढे सोपे काम तर नक्कीच नव्हते.

महात्मा गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतून भारतात आगमन झाले आणि स्वातंत्रयांच्या चळवळीला गती प्राप्त् झाली. अली बंधूच्या आय.बी.अम्मा यांनी बुरखा सरेंडर केला. व सहा हजार महिलांना पिकेटिंगमध्ये पुरूषात सामील होण्यासाठी सांगितले. आंध्रप्रदेशातील एका शूर दुर्गाबाईने यासाठी हजारो देवदासी एकत्रित केल्या. तत्कालीन काळात महिला समाजात फारश्या वावरत नसत. तसेच समाजात वारतांना पडदा प्रथा ही सामाजिक वाईट प्रथा असूनही माहिलांनी आंदोलनात सहभाग घेतला. आपल्या देशांतर्गत मूल्यांशी तडजोड न करता ते रस्त्यांवर उतरले. याशिवाय आपल्या घरातील इतर सदस्य् सहभागी होण्यास गेले तेव्हा महिलांनी कुटुंबाची काळजी घेतली. आपल्या दैनदिन कैटुंबिक जबाबदारीतून मुक्त् झाल्यावर त्यांनी चरख्याच्या माध्यमाने सुतकताई सारखे विधायक कार्य ही केले. पुरूषांच्या आंदोलनाला साथ देवून कार्यकर्त्यांची ताकद वाढवली. वरील स्वातंत्रयाच्या आंदोलनातील महिलांची भूमिका व योगदान पाहता महात्मा गांधींनी त्यांना मोठया प्रमाणात सक्रिय भूमिकेसाठी आव्हान केले. अहिंसा ही अंगभूत क्षमता आहे त्याच्या विश्वासामुळे हे एक निरोगी निशाणी म्हणून पाहिले जात असले तरी ते धरपकड व आंदोलनात अधिक व्यापक भूमिका पार पाडू शकेल. सविनय कायदेभंग, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलनात सक्रियता दिसून येते. सरोजिनी नायडू, कमला गांधी, कमलदेवी यांनी मिठाच्या मोर्चाचे नेतृत्व् केले. उषा मेहतांनी माहितीचा प्रचार व नागरिकांना एकत्र करण्यासाठी भूमिगत रेडिओ सुरू केला. पुढे क्रांतिकारी गटाकडून महिलांची भूमिका वाढत गेली.

**महिला स्वातंत्रय सैनिकांचे उदाहरणे :-**

**कामिनी रॉय-** पारतंत्रयाच्या काळात सन्मानाने पदवीधर झालेल्या पहिल्या महिला होय. इल्बर्ट बिल आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आबाला बोस सामाजिक कार्यकर्त्या होय. त्यांनी बंगाल मधील महिला मताधिकार चळवळीत

सहभागी होण्यासाठी प्रेरणा दिली. त्यांनीच कुमुदिनी मित्रा आणि मृणालिनी सेन यांच्या बरोबर महिला मुक्तीच्या लढयासाठी 'बांगिया नारी समाज' ची स्थापना केली. 1922-23 पर्यंत या महिला कामगार तपास आयोगाच्या सदस्याही होत्या. तसेच त्यांनी महिलांच्या परिस्थितीवर देखदेख करण्यासाठी सरकार बरोबर काम केले.

सुभद्रा कुमारी चौहान, सरोजिनी नायडू व महादेवी वर्मा यांच्या सारख्या कवयित्रींनी सामान्य् माणसांच्या मनात राष्ट्रवादाची भावना तेवत ठेवून राष्ट्रवादी विचारांच्या कविता लिहिल्या. सन 1917 मध्ये सरोजिनी नायडू यांनी महिला मताधिकारासाठी श्री. मोटांगुच्या भेटीसाठी नेमलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व् केले. त्याच बरोबर 1919 च्या रौलेट कायद्याच्या विरोधात व 1921 च्या प्रिन्स् चार्ल्सच्या भेटीच्या विरोधात भाग घेतला होता. 1925 मध्ये कानपूर येथे आयएनसी च्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविणा-या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या.

भारतीय राष्ट्रवादी चळवळीतील सर्वात प्रतिष्ठीत भिकाजी रूस्तम कामा यांनी 1907 मध्ये जर्मनीतील स्टुटगार्ट येथे परदेशी भूमीवर राष्ट्रध्व्ज फडकावणा-या त्या पहिल्या महिला होय. कमलादेवी चटटोपाध्याय या भारतीय समाज सुधारक व स्वातंत्रय कार्यकर्त्या होत्या. मद्रास मतदार संघातून निवडणूकीत उभ्या राहिलेल्या त्या भारतातील पहिल्या महिला होत्या. जरी त्या निवडणूकीत पराभूत झाल्या असल्या तरी त्यांनी भारतातील महिलांसाठी निवडणूकीचा मार्ग खुला करून दिला. अरूणा असफअली यांनी भारत छोडो आंदोलन सुरू केले. मुंबईतील गोवलिया टँक मैदानावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा झेंडा फडकावून त्यांनी तरूणांना प्रेरित केले म्हणून त्यांना तुरूंगवासही भोगावा लागला. अरूणा असफअली यांना भारतीय स्वातंत्रय संग्रामातील 'ग्रँड ओल्ड लेडी' म्हणून ओळखले जाते.

भारतीय स्वातंत्रयासाठी लढणा-या महिलांमध्ये कनकलता बरूवा, मातंगिनी हाजरा, बेगम हजरत अली. भोगेश्वरी फुकनानी, कस्तुरबा गांधी, राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, शुभालक्ष्मी, बेगम शेखावत हुसेन, बगलासुदेरी देवी, कैलासवासिनी देवी, जगतवासिनीदेवी, नवी बालादेवी, कल्याणीदास, कल्पना दत्त्, सुनिता चौधरी, शांती घोष, प्रितीलता वाडेदर, दुर्गाबाई देशमुख, अॅनी बेझंट, मार्गारेट कझिन्स्, सुबाम्मा, प्रभावती देवी, मनोरमा देवी, विंध्यावासिनी देवी, मुथुलक्ष्मी अशी अनेक महिलांची नावे घेता येतील. भारतीय स्वातंत्रय लढयात क्रांतीकारी पुरूषांसोबत महिला देखील तितक्याच ताकदीने लढल्यात. सुरूवातीला आंदोलनातील प्रमुख भूमिका ऐवजी पुरूषांच्या मदतगार म्हणून महिलांचा राष्ट्रीय आंदोलनातील प्रवास सुरू झाला.

ब्रिटीशांपूर्वी काही शतकामध्ये महिलांची स्थिती बिकट व दयनीय होती. धर्म, जाती, रूढी, परंपरा पुरूष केंद्रीत समाज व्यवस्थेसाठी जबाबदार राहिल्या. 1757 च्या प्लासीच्या लढाईने ब्रिटीशांनी भारतात आपले स्थैर्य निर्माण केले. तत्पूर्वी सती प्रथा, बालविवाह, शिक्षणाचा अभाव यामुळे स्त्रियांची स्थिती दयनीय होती. परंतु ब्रिटीश शासनाने या सामाजिक प्रथांना आळा बसविला. पुढे ब्रिटीश प्रशासनाने महिलांच्या शिक्षणासाठीनिधीची तरतूद केल्यामुळे महाराष्ट्रात ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुल्यांचे योगदान, लौकिक महत्वपूर्ण आहे. सरलादेवींनी 1904 मध्ये 'भारत स्त्री महामंडळाची' स्थापना केली. बंगाली लेखिका बेगम शेखावत हुसेन यांनी लैगिंक समानता व स्त्री शिक्षण या क्षेत्रात कार्य केले.

देशाच्या स्वातंत्रय् आंदोलनात महिला भूमिगत राहिल्या, कारागृहात गेल्या, प्रत्यक्ष लढाईत सहभागी झाल्या अशा बिकट परिस्थितीत ही वाट काढण्यात ननी बालादेवी या प्रमुख होत्या. क्रांतिकारकांना आश्रय देणे, त्यांची शस्त्रे लपवून ठेवणे, गुप्तचर पोलिसांना चकमा देणे ही कामे या क्रांतिकारक महिला करीत होत्या.

1920 च्या काळात सामाजिक परिस्थितीत बदल होत गेला. कारण महिलांना शिक्षणाचा प्रसार होत गेला. यातून 1923 मध्ये लिलावती नाग यांनी ढाका येथे दिपाली संघाची स्थापना केली. 1928 मध्ये कल्याणी दासांनी कलकत्ता विद्यापीठात विद्यार्थी संघटनेची स्थापना केली. युगांतर व अनुशिलन समिती या क्रांतिकारी संघटनेत महिलांची प्रमुख भूमिका होती. यात कल्पना दत्त् यांचे नाव घेतले जाते. सुनीता चौधरी व शांती घोष यांनी

कोमितलाच्या न्यायाधिशांची हत्या केली. 1932 मध्ये बिना दास यांनी बंगालच्या गव्हर्नरच्या हत्येचा प्रयत्नात त्यांनाच प्राण गमवावा लागला.

महिलांनी राष्ट्रीय आंदोलनामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेवून सामाजिक, राजकीय, वैचारिक, क्रांतीकारी, शिक्षण, संघटन अशा विविध आघाडयांवर त्यांनी नेतृत्व् केली आहेत. रामेश्वरी नेहरूंनी 1909 मध्ये ' स्त्री दर्पण पत्रिका ' सुरू केली. धरासना येथील मिठागरांवर छापा टाकण्यात सरोजिनी नायडूंची भूमिका महत्वाची होती. 1904 मध्ये सरलादेवी यांनी स्त्री महामंडळाची स्थापना केली. 1919 च्या कायदयानुसार महिलांना मर्यादित ठिकाणी मतदानाचा अधिकार मिळाला. यातून महिला राष्ट्रीय आंदोलनासह स्व्त:चे अधिकार, स्त्री सक्षमीकरण अशा क्षेत्रात त्या कार्य करू लागल्या. मार्गारिट कजीन्सच्या वुमेन्स् असोसिएशनने पहिल्या गोलमेंज परिषदेत महिलांचे प्रतिनिधी मंडळ पाठविले. याच्या फायदयातून 1937 च्या निवडणूकीत महिला देखील सहभागी झाल्यात. मद्रासच्या विधानसभा सदस्या म्हणून मुथुलक्ष्मी निवडूण आल्यात. पुढे गांधीवादी आंदोलना पुरताच महिलांचा सहभाग नव्हता तर कम्युनिस्ट पार्टी, स्टुडंट फेडरेशन, 1946- 47 मधील उत्त्र बंगाल मधील तेभागा आंदोलन, तेलगांना आंदोलन, आझाद हिंद फौज, झाशीची राणी रेजिमेंट अशा अनेक क्षेत्रात महिलांनी आपला लढा लढवून प्रसंगी प्राणाचेही बलिदान दिले आहे.

प्रत्येक आंदोलनाचा काळानुरूप संदर्भ बदलत जावून आंदोलनाच्या प्राथमिकता, मागण्या बदलत राहतात. प्रारंभी स्वातंत्र्य लढयातील विविध आंदोलनात सहभाग, महिलांना मतदानाचा अधिकार तर आता मात्र वडिलांच्या संपत्तीतील अधिकार परिणामी स्त्री-पुरूष समानतेच्या दोरीवरी राहतील अशी महिलांच्या आंदोलनाच्या प्राथमिकता राहिल्या आहेत.

कर्नाटकातील कित्तूर या संस्थानाची राणी चेन्नम्मा हिने ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशिक्षित सैन्याशी प्रतिकारात पराभव होऊन तुरुंगातच मरण पावलेली ही पहिली स्वातंत्रयसैनिक होय. दुस-या नानासाहेब पेशव्यांची कन्या मैनावती हिने जिवंत जळून जात असतांनाही नानासाहेबांचा ठावठिकाणा सांगितला नाही.तर कंपनीच्या पलटणीला कडवा विरोध करत आलिया बेगम व अझीझन यांनी धारातीर्थी आपला प्राण ठेवला.

**सारांश :-**

भारतात राष्ट्रीय चळवळ, क्रांतिकारी चळवळ, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, गोवा मुक्ती संग्राम व आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग राहिला आहे. भारतीय संस्कृतीचे जे काही चांगले, पवित्र, उदात्त् आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागाने साध्य् झालेले आहे. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनीच मोठया प्रमाणात केली आहे. कुटुंब व्यवस्था टिकविण्यसाठी, सांस्कृतिक मूल्य्-संर्वधनासाठी स्त्रियांनीच मोठया प्रमाणावर त्याग केला आहे. भारतीय स्त्रीने केलेला त्याग तिने प्रसंगी दाखविलेले धैर्य व चाणाक्षपणा अवर्णनीय आहे. नव्या युगाची ही स्त्री आता तिमिरातून तेजाकडे वाटचाल करीत आहे. स्वातंत्र्य व समतेचे हळद-कुंकू काळच स्त्रियांच्या ललाटावर रेखाटेल. कुटुंब कबीला सांभाळता सांभाळता देशाच्या स्वातंत्र्यासाठी अहोरात्र पुरूषांच्या साथीला साथ देत त्या लढल्यात. तर कधी त्या पुरूषांची ढाल बनलेल्या दिसून येतात. थोडक्यात भारतीय इतिहासातील शेकडो स्त्रियांच्या जीवन कार्याची व कर्तबगारीची ओळख यातून होते.

**संदर्भसूची :-**

1) धर्माधिकारी तारा- स्वातंत्र्य लढयातील स्त्री, ऑगस्टक्रांती महोत्स्व समिती, मुंबई.
2) ढेकणे के.डी.- महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी
3) लेले केशव गोविंद – स्वातंत्र्य लढयातील आतचा सहभाग
4) कलादर्श (वृत्त्पत्र) 15 जुलै 1933.
5) वासंती फडके (अनुवाद)- भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्त्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. जाने- 2003.

6) डॉ.एम, एस. गठाळ- भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स्, औरंगाबाद, जूलै 2013.

7) शांता कोठेकर (अनुवाद) –भारतीय प्रबोधनाच्या महिला प्रणेत्या, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली. 2013.

8) दैनिक लोकसत्ता, 10 ऑगस्ट 2013.

9) Usexamprep.com

10) mpcnews.in/pim

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B

ISSN : 2278-9308 February 2024

# महिला सक्षमीकरणात बचत गटाची भुमिका

**शुभांगी संजय सोनवणे**

संशोधक विद्यार्थी, जळगाव

**प्रस्तावना :-**

आर्थिक व सामाजिक विकासासाठी " अल्पबचत नियोजन या तत्वाचा स्वीकार करणे गरजेचे आहे आणि तसे प्रयत्न करणे हे महत्वाचे आहे. भारतीय ग्रामीण भाग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा व पाया असून स्वयं- सहाय्यता बचत गटाचे महत्त्व बधत चाललेले दिसुन येते. त्यादृष्टीने शासन देखील पाऊले उचलत आहेत. बचतगटाच्या माध्यमातून महिलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व अंमलबजावणीसाठी शास्त्रीय दृष्टिकोनाद्वारे अभ्यास होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याचे निर्मुलन करून आणि महिलांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक याबाबत सबलीकरण करणे हि मुलभुत स्वरुपाची उद्दिष्टे स्वयंसहाय्यता बचत गटाची आहेत. उद्दिष्टांपैकी दारिद्र्याचे निर्मुलन करणे हे फार मोठे आव्हान बचतगटासमोर आहे. परंतु तरीही त्यावर बचतगट मात करीत असतांना दिसत आहेत. दारिद्र्याचे निर्मुलन केल्यावरच खऱ्या अर्थानेच समाजाची आर्थिक प्रगती होईल.

भारताची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येपैकी १४% असुन या लोकसंख्येपैकी ३७.६% लोकसंख्या दारिद्र्यात हालअपेष्टा सहन करून आपले जीवन जगत आहे. यासाठी समाजातील गरीब लोकांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती सुधारणे आवश्यक आहे. समाजात दारिद्र्य मोठ्या प्रमाणात असेलत तर अंधश्रद्धा, निरक्षर, अज्ञानी, दैववादी, व्यसनाधीन लोकांची संख्या जास्त असते. त्यामुळे समाजात शांतता नांदू शकत नाही म्हणून अर्थतज्ञ डॉ. महमंद युनुस म्हणतात की, दारिद्र्याच्या दृष्टीचक्रावर उत्तम उपाय म्हणजे स्वयं सहय्यता बचत गट आहे.

ग्रामीण भागात महिलांच्या सक्रीय सहभागामुळे गावोगावी स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ जोमाने वाढत आहे. बचतगटामुळे बचत संकलनाच्या कामाला चालना मिळुन पतनिर्मितीद्वारे रोजगार निर्माण होऊन बचत गटामुळे महिलांचा आत्मविश्वास, आत्मनिर्भरता वाढत आहे. समाजातील मध्यमवर्गीय दुर्बल घटकांना आशेचा किरण म्हणुन स्वयंसहाय्यता गटाकडे पाहिले जाते. शिक्षणाचा स्तर प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून महिला स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या सहाय्याने सुरु करू शकतात व त्यातून खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

महिलांमधील अंगभुत असणाऱ्या क्षमतांना आकार देण्यासाठी व स्वयं सहाय्येतून बचत गट आर्थिक मजबुत व्हावा यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल या हेतुने सदर विषयाची निवड केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. महिला स्वयंसहाय्यता बचत गट हे महिलांच्या सबलीकरणासाठी कसे उपयुक्त आहेत याचा अभ्यास करणे.
2. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांच्या श्रमाला आर्थिक प्रतिष्ठा मिळवुन देणे.
3. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या विकासात येणाऱ्या समस्या व अडथळे सोडविण्यासाठी उपयुक्त उपाययोजना सुचविणे.

**गृहीतके :-**

1. आर्थिक सक्षमतेमुळे महिलांचे सबलीकरण घडुन येते.
2. स्वयंसहाय्यता बचत गटातील सहभागामुळे महिलांच्या आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावला आहे.
3. स्वयंसहाय्यता समूह गटाच्या कार्याच्या विकासात सहभागी स्त्रियांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते.

**संशोधनाचे क्षेत्र :-**

संशोधनाकरिता संशोधकाने धरणगाव तालुक्यातील व प्रमुक्याने पाळधी गावाच्या परिसरात असलेल्या १० बचत गटांची निवड केली आहे व प्रत्येक बचत गटातून ६ बचतगट सहभागी महिलांची अभ्यासाकरिता (उत्तरदाते) निवड करण्यात आली.

**तथ्य संकलन :-**

उत्तरदात्याकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे मुलाखत अनुसुचीच्या सहाय्याने तथ्य संकलीत करण्यात आले या मुलाखत अनुसुचित प्रामुख्याने उत्तरदात्याचे वैयक्तिक व कौटुंबिक गटाबाबतचे प्रश्न व गटाच्या सहभागामुळे होणाऱ्या परिवर्तनाच्या अनुषंगाने प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता.

दुय्यम स्त्रोतांमध्ये वर्तमानपत्र, मासिके, साप्ताहिके, प्रकाशित ग्रंथ, पुस्तके, इंटरनेट यांचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषण :-**

तथ्य संकलनाचे काम पूर्ण झाल्यानंतर तथ्याचे वर्गीकरण करण्यात आले व आवश्यक त्या सारण्या तयार करून त्या सारण्याचे विश्लेषण करण्यात आले.

**तक्ता क्र. १**

सर्वेक्षण केलेल्या स्त्रियांच्या शिक्षणाचा स्तर

| अशिक्षित | प्राथमिक शिक्षण | माध्यमिक शिक्षण | उच्च माध्यमिक शिक्षण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १०<br>१६.६६% | २०<br>३३.३३% | २०<br>३३.३३% | १०<br>१६.६६% | ६०<br>१००% |

तक्ता क्र. १ मध्ये शिक्षणाचा सत्र दर्शविला आहे. सर्वेक्षण केलेल्या स्त्रियांपैकी अशिक्षित, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक या गटात शिक्षण घेतलेल्या महिला अनुक्रमे १६.६६%, ३३.३३%, ३३.३३%, १६.६६% आढळतात.

**तक्ता क्र.२**

**बचत गटाच्या कार्याचे स्वरूप**

| खिचडी बनवणे | पापड बनवणे | भाजी विक्रेते | लोणची बनवणे | इतर कामे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| २५<br>(४१ %) | २१<br>(३५ %) | ०५<br>(०८ %) | ०३<br>(०५ %) | ०६<br>(१०%) | ६०<br>(१००%) |

तक्ता क्र. २ मध्ये बचत गटाचे कार्य दर्शविले आहे. सर्वेक्षण केलेल्या स्त्रियांपैकी खिचडी बनवणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी ५% आढळतात.

**तक्ता क्र.३**

**सर्वेक्षण केलेल्या महिलांचे मासिक वेतनाचे प्रमाण (हजारानुसार)**

| १०००-१५०० | २०००-२५०० | २५००-३००० | ३०००-३५०० | ३५०० पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १५<br>(२५ %) | ११<br>(१८.३३%) | १०<br>(१६.६६ %) | १२<br>(२०%) | १२<br>(२०%) | ६०<br>(१००%) |

तक्ता क्र. ३ मध्ये महिलांचे मासिक वेतनाचे प्रमाण १०००-१५००, २०००-२५००, २५००-३०००, ३०००-३५००, ३५०० पेक्षा जास्त या गटात अनुक्रमे २५%, १८.३३%, १६.६६%,२०%, २०% आढळतात.

**तक्ता क्र.४**

**सर्वेक्षण केलेल्या महिला बचत किती करतात त्याचे प्रमाण**

| १००-२०० | २००-३०० | ३००-४०० | ४००-५०० | एकूण |
|---|---|---|---|---|
| १२ (१७%) | ०३ (१२%) | १२ (५०%) | ०३ (२१%) | २४ (१००%) |

तक्ता क्र.४ मध्ये बचत करणाऱ्या महिलांचे प्रमाण १००-२००, २००-३००, ३००-४००, ४००-५०० मध्ये अनुक्रमे १७%, १२%, ५०%, २१% आढळतात.

**निष्कर्ष :-**

1. सर्वेक्षणानुसार स्त्रियांच्या शिक्षणाच्या स्तरामध्ये माध्यमिक व प्राथमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचे प्रमाण सर्वात जास्त ३३.३३% आढळते म्हणजेच स्त्रियांची साक्षरता आढळते.
2. बचत गटांमधील महिलांच्या कार्यामध्ये खिचडी बनवणे या कामात सर्वात जास्त ३५% महिला आढळतात म्हणजेच महिलांना रोजगार प्राप्त होतो.
3. बचत गटाच्या माध्यमातून ३००० पेक्षा जास्त वेतन मिळणाऱ्या महिलांचे प्रमाण २०% आढळते.
4. ४०% महिलांना बचतीची सवय लागली.
5. बचत गटाच्या माध्यमातून ७०% महिलांना कर्जे व अनुदाने मिळतात त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण कमी होते.
6. आधुनिक व्यवसायाचे ज्ञान मिळत नाही अशी समस्या असणाऱ्या ८३.३३% महिला आढळतात.
7. निश्चित स्वरुपाची विक्री व्यवस्था मिळत नाही अशी ७५% महिलांची समस्या आहेत.
8. कुटुंबाला आर्थिक, सक्षम करण्यासाठी ७४% महिला हातभार लावतात.
9. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण होण्याचे प्रमाण ८५% दिसून येते.

**सारांश :-**

प्रामुख्याने ग्रामीण भागातील स्त्रियांना महिला बचत गटाच्या सहभागामुळे बचत संकलनाच्या कामाला प्रेरणा प्राप्त झाली असून पतनिर्मिती द्वारे नवनवीन रोजगाराची निर्मिती होत आहे. तसेच ग्रामीण परिसरातील दारिद्र्याचे निर्मुलन करण्यात बचत गटाचे सहाय्य प्राप्त होत आहे. मात्र महिलांमध्ये आत्मविश्वास, आत्मनिर्भरता वाढविण्याच्या या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी सोडविण्यात शासनाने बचत गटांना सढळ हाताने मदत करणे गरजेचे आहे. तसेच बचत गटांद्वारे निर्मित उत्पादनांच्या विक्री व्यवस्थेबाबत देखील शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. प्रामुख्याने जे उत्पादन कार्यालयीन कामासाठी आवश्यक असतात. ती बचत गटाकडून घ्यावीत असा निर्णय घेणे योग्य होय असे वाटते.

**संदर्भ सूची :-**

1. मुलाणी एम. यु. (२००६), महिला स्वयंसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लिकेशन, पुणे -३०.
2. पाटील भारती (१९९८), स्त्रियांचा सत्तेतील सहभाग सबलीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, १५- कोल्हापूर.
3. प्रधान ग. प्र. (२००३), आव्हानांशी संघर्ष आणि परिवर्तनाची दिशा प्रकाशक – मा. भाई वैद्य, अमृत महोत्सव गौरव समिती, पुणे.
4. मुख्य संपादक प्रसाद निता- योजना, ग्रामीण आर्थिक विकासात महिला बचत गटांची भुमिका व महत्त्व डॉ. सुनील शिंदे.
5. डॉ. देसाई संभाजी (२०१४), महिला सबलीकरण,प्रशांत पब्लिकेशन जळगाव.

# वित्तीय समावेशकता- सर्वसमावेशक विकासाची गरज

**देवानंद काशिनाथ मंडवधरे**

सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय हरसूल, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक मोबाईल नं.: ९८२३६८०९३७ , इ-मेल: dkmeco1982@gmail.com

**प्रस्तावना:**

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जगातील उध्वस्त झालेल्या अर्थव्यवस्थांची पुनरुभारणी व मागासलेल्या अर्थव्यवस्थांच्या जलद प्रगतीसाठी जागतिक पातळीवर मोठया प्रमाणात विचारमंथन सुरु झाले होते. विशेषतः अल्पविकसित व विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात आर्थिक विकास हे साध्य व मानव एक साधन ही विचारधारा जोपासणाऱ्या परंपरागत विकासाचे सिद्धांत व धोरणे यांच्यावर याच काळात टीका होऊ लागली होती. मानव हाच आर्थिक विकासाचे साध्य आणि साधन असावा, आणि सर्वसामान्य माणूसच विकासाच्या केंद्रस्थानी असावा असा मतप्रवाह जोर धरू लागला होता. याच विचारधारेच्या आधारावर सर्वसमावेशक विकासाची संकल्पना २१व्या शतकात उदयास आली आहे. सर्वसमावेशक विकासाची संकल्पना ही बहुआयामी संकल्पना आहे.

आज जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेचा स्वीकार केलेला आहे. भारताने सुद्धा स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात या दिशेने काही प्रमाणात प्रयत्न केले आहेत. ११ व्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य उद्देशच सर्वसमावेशक विकास हाच होता. १२ व्या पंचवार्षिक योजनेतही या संदर्भात बरेच प्रयत्न केले गेले. त्या नंतरच्या काळात जन-धन योजना, डिजिटल इंडिया, बेटी बचाव-बेटी पाढाओ, मुद्रा योजना, उज्वला योजना, अटल पेन्शन योजना इत्यादींच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- सर्वसमावेशक विकास या संकल्पनेचा अर्थ जाणून घेणे.
- वित्तीय समावेशकता म्हणजे काय हे समजून घेणे.
- सर्वसमावेशक विकास व वित्तीय समावेशकता यांचा काय सहसंबंध आहे याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती व साधनसामग्रीचे संकलन:**

प्रस्तुतच्या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक सामाजिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. हा शोधनिबंध पूर्णतः मुलभूत व दुय्यम स्वरूपाच्या साधनसामग्रीवर आधारित आहे. या शोधनिबंधासाठी सर्वसमावेशक विकास व वित्तीय समावेशकता यांचा काय सहसंबंध आहे या विषयीची माहित उपलब्ध करून देणाऱ्या संदर्भ साहित्याचा म्हणजेच वेगवेगळ्या ग्रंथांचा, विविध मासिकांमधील व संशोधन पत्रिकेतील शोधनिबंधांचा, वेगवेगळ्या वर्तमानपत्रातील लेखांचा तसेच इंटरनेट वरील विविध वेबसाईटचा संदर्भ म्हणून उपयोग करण्यात आला आहे.

भारतात वित्तीय समावेशकतेला चालना दिल्यामुळे सर्वसमावेशक विकासाचे ध्येय कसे साध्य करता येईल याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**सर्वसमावेशक विकास:**

आर्थिक विकास मोजण्याच्या संदर्भात दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हे जरी महत्वाचे निकष मानण्यात येत असले तरी आर्थिक सुधारणांच्या नंतरच्या काळात मानव विकास निर्देशांक हा सुद्धा महत्वाचा निकष मानला जात आहे. सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाजातील विषमता व सामाजिक वंचितता यांना विशेष महत्व दिले जाते.

या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे मत मांडले होते की, “आपल्या देशाचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा झाल्यास सर्वच समुदायांना सर्वच क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळवून देवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे अत्यावश्यक आहे.”

नोबेल पुरस्कार विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांचे या संदर्भात असे मत आहे की, दारिद्र्याचा प्रत्यक्ष संबंध हा माणसाच्या मुलभूत क्षमतांना पारखे झालेल्या गरिबांशी अधिक जवळचा आहे, गरिबांच्या क्षमता, शक्ती आणि कौशल्यात जसजशी वाढ होत जाईल तसतशी त्यांना दारिद्र्यातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळत राहील. यासाठी विकासाचा पाया हा सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेवर आधारित असणे आवश्यक आहे. डॉ. सेन यांच्या मते, कृषी व बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे हे सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट्य असले पाहिजे.

UNDP च्या २००८ च्या अहवालात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न गटातील लोकांची उत्पादन, विकास व वितरणातील सहभागाची समानता महत्वाची आहे. ही दीर्घकालीन प्रक्रिया असून त्यासाठी रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे. कारण त्यामाध्यमातूनच विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते.

थोडक्यात या संकल्पनेचा सर्वसामान्य अर्थ असा आहे की, विकासाच्या प्रवाहात सर्वांना सामील करून घेणे व विकासाचे लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे म्हणजे सर्वसमावेशक विकास होय.

**वित्तीय समावेशकता:**

भारतात अलीकडच्या काही वर्षात वित्तीय व बँकिंग सेवा यांच्याबाबतीत बरीच प्रगती झाली आहे. परंतु लोकसंख्येचा एक मोठा घटक आजही या सेवांपासून वंचित आहे. विशेषकरून समाजातील वंचित वर्ग व निम्न उत्पन्न असलेला वर्ग आजही वित्तीय सेवांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या प्राथमिक सुविधांच्या परीघाबाहेरच आहे. भारतात वित्तीय समावेशकतेच्या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी भारत सरकारने डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली ‘वित्तीय समावेशन समितीचे’ गठन केले होते. या समितीने जानेवारी २००८ मध्ये आपला अहवाल शासनाला सादर केला.

“समाजातील दुर्बल घटक आणि निम्न उत्पन्न असलेल्या लोकांना त्यांच्या आवश्यकते नुसार , त्यांना झेपेल अशा खर्चामध्ये आणि योग्य वेळी वित्तीय सेवासुविधा तसेच पुरेशे कर्ज उपलब्ध करून देण्याची एक प्रक्रिया म्हणजे वित्तीय समावेशकता होय.” अशी वित्तीय समावेशन समितीने वित्तीय समावेशकतेची व्याख्या केली आहे. तसेच वित्तीय समावेशकतेसाठी वित्तीय समावेशन निधी आणि वित्तीय समावेशन तंत्रज्ञान निधी या दोन प्रकारच्या निधींची शिफारस सुद्धा केली आहे.

थोडक्यात समाजातील शेवटच्या घटकापर्यंत बँकांच्या वित्तीय सेवा किमान खर्चात व योग्य त्या वेळी पोहोचविणे म्हणजेच वित्तीय समावेशकता होय.

**वित्तीय समावेशकता- सर्व समावेशक विकासाची गरज:**

सर्वसमावेशक विकासासाठी अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्र, समाजातील सर्व वर्ग, महिला, बालके या सर्व घटकांचा सारख्याच प्रमाणात विकास होणे आवश्यक आहे, त्यासाठी खालील बाबींवर विशेष भर देणे आवश्यक आहे.

- आधारभूत सुविधा समाजातील सर्व वर्गांपर्यंत पोहोचविणे.
- ग्रामीण भागातील रोजगारात वाढ करणे.
- कृषी आणि ग्रामीण विकासासाठी या क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ करून उत्पन्नात वाढ करणे.
- अनुसूचित जाती- जमाती, अल्पसंख्यांक या वर्गातील वंचित तसेच आर्थिक दुर्बल व महिला व बालकांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे.

• शिक्षण, आरोग्य, निवारा आणि अन्न सुरक्षितता यावर भर देणे.

वरील सर्व बाबींच्या ध्येय्य पूर्तीसाठी समाजात वित्तीय समावेशकता असणे अत्यावश्यक आहे.

**वित्तीय समावेशकतेच्या संदर्भातील अडचणी:**

भारतात आजही एकूण लोकसंख्येचा एक मोठा घटक वित्तीय सेवांपासून वंचित आहे त्यांच्याकडे प्राथमिक बँक खातेही नाहीत. देशातील बँक खातेधारकांची एकूण संख्या जरी विचारात घेतली तरी, साधन संपन्न लोकांकडे दोन किंवा त्यापेक्षा अधिक बँक खाते असल्याची बाब विसरून चालणार नाही. वित्तीय समावेशकतेच्या संदर्भातील अडचणी खालील प्रमाणे आहे.

• काही ग्रामीण भागामध्ये अजूनही माहिती तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध झालेली नाही, तेथे आजही पारंपारिक बँकेच्या सुविधाच पुरविल्या जातात.

• देशाच्या काही ग्रामीण भागांमध्ये अजूनही बँकांच्या शाखा पोहचलेल्या नाहीत, त्यामुळे तेथील लोक बँक व्यवसायाच्या परीघा बाहेरच आहेत.

• समाजातील गरीब, उपेक्षित व वंचित घटक उदा. भूमिहीन मजूर, असंघटित क्षेत्रात काम करणारे मजूर, अनुसूचित जाती व जमातीतील लोक इत्यादी. अशा लोकांना बँकेमध्ये खाते सुरू करण्याचे काय लाभ आहेत हे माहीतच नसल्यामुळे समाजाचा हा घटक बँकांच्या सुविधा पासून वंचित आहे. त्यासोबतच बँकेमध्ये खातं सुरू करण्याची औपचारिक प्रक्रिया या लोकांना किचकट व क्लिष्ट वाटते त्यामुळे हे लोक बँकेत खातं उघडण्याच्या भानगडीतच पडत नाहीत.

• समाजामध्ये अजूनही असा घटक आहे की, ज्याला बँकेपेक्षा खाजगी सावकरकडून कर्ज घेणे सोयीचे वाटते. असा घटक सहजच सावकरच्या कर्ज सापळयात अडकतो.

• वित्तीय समावेशकतेसाठी बँकानी अनेक आकर्षक योजनांची घोषणा केलेली आहे परंतु या योजना समाजातील खालच्या स्तरापर्यंत पोहचतच नाही. तसेच ज्या लोकांकडे बँकेचे खाते आहे असे लोकही निरक्षरता किंवा अज्ञानामुळे बँकांच्या योजनांचे लाभार्थी नाहीत.

**वित्तीय समावेशकतेच्या संदर्भात उपाययोजना :**

अल्प उत्पन्न असलेल्या व आर्थिकदृष्टा कमकुवत लोकांपर्यंत बँकांच्या सुविधा कमीतकमी खर्चात पोहचाव्यात यासाठी भारत सरकार व भारतीय रिझर्व बँक यांनी केलेले प्रयत्न खालील प्रमाणे आहेत.

• ई.स. १९६९ मध्ये १४ व ई.स. १९८० मध्ये ६ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण.
• प्राथमिक क्षेत्रासाठी कर्ज सुविधेची निश्चितता.
• विभेदात्मक व्याजदर योजना.
• क्षेत्रीय ग्रामीण बँकांची स्थापना.
• ग्रामीण भागात बँकांना आपल्या शाखा सुरू करण्यासाठी प्रोत्साहन.
• अल्प उत्पन्न गट व समाजातील कमजोर वर्गांसाठी विशेष कर्ज योजना.
• किसान क्रेडिट कार्ड.
• जनधन योजना, अटल पेन्शन योजना, मुद्रा योजना व डी. बी. टी. योजना
• प्रधान मंत्री जीवन ज्योति व सुरक्षा विमा योजना.
• भारतीय रिझर्व बँक सामान्य क्रेडिट कार्ड योजना.
• क्षेत्रीय ग्रामीण बँकांना आपली वित्तीय साधने वाढविण्यासाठी भारतीय रिझर्व बँकेकडून विशेष पॅकेज.
• शून्य शिल्लक व किमान शिल्लक नो फ्रील खाते सुविधा देण्यासाठी बँकांना भारतीय रिझर्व बँकेच्या सूचना.

- भारतीय रिझर्व बँकेची लिड बँकिंग योजना.
- आधार पेमेंट ब्रिज सिस्टिम व आधार इनेबल पेमेंट सिस्टिम.

**समारोप:**

वित्तीय समावेशकता हे सर्वसमावेशक विकासाचे एक साधन आहे. विविध प्रकारच्या वित्तीय सेवांचे लाभ ग्रामीण, मागासलेले, आर्थिकदृष्ट्या कमकुवत एकूणच शेवटच्या घटकांना मिळवून देवून आपण सर्वसमावेशक विकास साध्य करू शकतो. वित्तीय समावेशकतेसाठी शासनाकडून अनेक प्रकारच्या योजना व उपक्रम राबविण्यात येतात परंतु अजूनही आपल्या देशातील लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा पायाभूत वित्तीय सेवांपासून वंचित आहे. याचाच अर्थ सदर योजनांची योग्य प्रकारे अमलबजावणी होत नाही. मोघम लोकप्रियतेसाठी अनेक योजना जाहीर करण्यापेक्षा मोजक्या परंतु परिणामकारक योजनांची काटेकोर अमलबजावणी करून वित्तीय समावेशकतेच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकासाचे उद्दीष्ट साध्य करणे शक्य आहे.

**संदर्भ:**


- रुद्र दत्त आणि के. सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस. चंद पब्लिकेशन, नवी दिल्ली, २००५.
- इंडियन इंस्टिट्यूट ऑफ बँकिंग अँड फाइनान्स, समवेशी बँकिंग, टेक्समेन पब्लिकेशन प्रा. ली. नई दिल्ली, २०१५.
- श्रीकांत जाधव, लेख दैनिक लोकसत्ता, आथिक विकास: सर्वसमावेशक वाढ आणि संबंधित मुद्दे, ७ नोव्हेंबर २०१७.
- प्रतिमा जोशी , लेख दैनिक महाराष्ट्र टाइम्स, सर्वसमावेशक वाढीचे दिशादिग्दर्शन, १९ आक्टोबर २०१३.
- चरण सिंग आणि शिवकुमार रेड्डी के., वित्तीय समावेशन सुविधा देण्यात बँकांची भूमिका, योजना मासिक, अंक ६, जानेवारी २०१८.
- मंजुला वाधवा, ग्रामीण बँक व्यवस्थेपुढील समस्या आणि आव्हान, योजना मासिक, अंक ६, जानेवारी २०१८.
- सुशील अंबादास रगडे, ग्राहक सेवा-बँकिंग क्षेत्रातील नवीन अध्याय, योजना मासिक, अंक ६, जानेवारी २०१८.
- Dr. S. V. Shinde, Financial Inclusion in India, Laxmi Book Publication Solapur, 2014.
- K.G. Karmarkar, G.D. Banerjee, N.P. Mohapatra, Towards Financial Inclusion in India, SAGE Publications India Pvt. Ltd., 2011.
- National Strategy for Financial Inclusion 2019 to 2024, http://rbidocs.rbi.org.in/rdocs/content/pdfs/NSFIREPORT100119.pdf
- Financial Inclusion in India- An Assessment, http://rbidocs.rbi.org.in/rdocs/Speeches/PDFs/MFI101213FS.pdf
- Financial Inclusion - A Road India needs to travel http://rbidocs.rbi.org.in/rdocs/Speeches/PDFs/FICHI121011S.pdf
- Financial Inclusion and Development http://m.rbi.org.in/scripts/FS_Speeches.aspx?id=1110&fn=2754

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# विषय आदिवासी महिला आणि त्यांचा सामाजिक आर्थिक क्षेत्रातील विकास

**प्रा. डॉ. सी. एस. पाटिल**
सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव जि. जळगाव

**प्रस्तावना:-**

भारतीय स्त्रियांच्या समस्यांची चर्चा करताना आदिवासी स्त्रियांचे प्रश्न नेहमी दुर्लक्षित राहिले आहेत आज ही गरिबीत जीवन जगणाऱ्या आदिवासी स्त्रिया मुक्तपणे व स्वतंत्रपणे जगतात म्हणून त्यांचे काही प्रश्न नाहीत त्यांच्या समस्या नाहीत असे प्रस्थापित समाजाला वाटते मात्र मातृसत्ताक पद्धती स्वीकारलेल्या आदिवासी स्त्रिया आज ही वाईट परिस्थितीमध्ये जीवन जगताना दिसतात आदिवासी जमाती जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये विभागल्या गेल्या आहेत त्यामुळे या जमातींमध्ये एकजूट होत नाही

फक्त महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा विचार केला तर प्रत्येक भागातील भौगोलिक राजकीय आणि सामाजिक परिस्थितीनुसार आदिवासींचे प्रश्न बदलतात आदिवासी स्त्री जगण्याच्या जीवघेण्या संघर्षात अडकली आहे असंख्य समस्यांनी त्रस्त झाले आहे

**उद्दिष्टे :-**

1. आदिवासी जमातींच्या इतिहासाची माहिती घेणे
2. आदिवासी स्त्रियांची समस्या जाणून घेणे
3. आधुनिक काळातील आदिवासी स्त्रियांची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती समजून घेणे
4. आदिवासी स्त्रियांच्या समस्या सोडवण्यासाठी आदिवासींचे प्रश्न समजून घेणे
5. भारतीय समाजाचा एक वंचित घटक म्हणून स्त्रियांवर चर्चा घडवून आणणे
6. आदिवासी स्त्रियांना मूलभूत हक्क व न्याय मिळावा यासाठी आदिवासी समाजाची समाज रचना समजून घेणे
7. आदिवासी कष्टकरी मजूर स्त्रियांची माहिती घेणे हे उद्दिष्ट ठेवून हा विषय मी घेतलेला आहे

**संशोधन आराखडा किंवा विषय :-**

आताच्या काळात ही आदिवासी जमातींमध्ये मातृसत्ताक पद्धतीचा प्रभाव आहे. ब्रिटिश काळापासून आदिवासी जमाती प्रस्थापित समाजाच्या संपर्कात आल्या त्यामुळे पितृ प्रधान पद्धतीकडे वळू लागल्या आणि धर्म जात या व्यवस्थेतून निर्माण झालेल्या प्रश्नांपासून या या स्त्रिया काही प्रमाणात दूर झाल्यात मात्र ब्रिटिश वसाहत काळापासून आदिवासींचे धर्मांतर करून घेण्याची पद्धती पद्धती प्रचलित झाली त्यामुळे आदिवासींचे हिंदूकरण करण्याची प्रक्रिया किंवा चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू झाली तरी आदिवासींचे प्रश्न मोठ्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात असलेले दिसतात आदिवासी समाजात गोटुल प्रथा अस्तित्वात आहे या पृथ्वीशी समाजाचे अनेक समाज आणि गैरसमज आहेत गोठुल म्हणजे स्त्रियांना साथीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे प्राचीन काळामध्ये जमिनीवरच्या अधिकारापर्यंत आदिवासी श्री स्वतंत्र होती आणि निर्णय घेण्याची क्षमता होती मात्र जल जमीन आणि जंगलावरच्या प्रस्थापित समाजाच्या आक्रमणामुळे आदिवासी स्त्रियांना थोड्याफार प्रमाणात अपयश आले आदिवासी श्री पुरुषांच्या ज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय लुटमार करून त्यांना त्यांना कंगाल बनवण्याचा प्रयत्न होत आहे त्याचा पहिला बळी आदिवासी स्त्री झालेली आहे साथीच्या रोगांमध्ये आदिवासींचे पाळीच्या पाढे मृत्युमुखी पडतात साथीच्या आजारामध्ये भक्तांच्या हुकुमानुसार डोळ्याला पट्टी बांधून टाकीन ठरवलेल्या आदिवासी स्त्रियांना

आणि पुरुषांना मरेपर्यंत मारले जाते आदिवासींचे शोषण केले जाते त्यामुळे आदिवासींच्या डाखिंप्रत्येवर अजून प्रतिबंध घातला गेला नाही आदिवासी संस्कृतीमध्ये निरक्षर चे प्रमाण जास्त आहे आदिवासी संस्कृतीत अमानुष रूढी परंपरा श्रद्धा अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात आहेत त्यामुळे जात आणि धर्म या वर्गात सगळया खालच्या स्थानावर आदिवासीच आहेत आदिवासी लोक हुंड्यासाठी स्त्रियांचा बळी घेत नाहीत मात्र पुरुषांच्या अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रिया आत्महत्या करीत नाहीत त्यामुळे आदिवासी स्त्रियांमध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण कमी आहे आदिवासी संस्कृतींमध्ये आजही दहेज प्रथा अस्तित्वात आहे मात्र वर मुलाच्या कुटुंबाला वधू मूल्य द्यावे लागते लग्न झाल्यानंतर वर पुरुष स्त्रियांकडे येऊन राहतात अशा काही रूढी परंपरा आदिवासी समाजांमध्ये असल्या तरी आदिवासींच्या या लोकसंस्कृतीला बाहेरील जगाशी आलेल्या संपर्कामुळे आणि काही कारणांमुळे धोका निर्माण झाला आहे

**निष्कर्ष :-**

आदिम किंवा आद्य संस्कृतीला खूप महत्त्व दिले जाते भारत सरकार व समाजाच्या वेगवेगळया स्तरातून आदिवासी संस्कृतीचे खूप कौतुक केले जाते मात्र आदिवासी स्त्री ही फक्त आर्ट गॅलरीत भारतीय सौंदर्याचा नमुना म्हणून पाहायला मिळते मात्र प्रत्यक्ष वास्तव परिस्थितीमध्ये आदिवासी स्त्री कुपोषणाचा बळी ठरलेली आहे मुळात नागरी संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेले डोंगराळ प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होत सर्वसाधारणपणे जंगलात दुर्गम दऱ्याखोऱ्यात व सुसंस्कृत समाजापासून वेगळे असलेल्या प्रदेशात आदिवासी अतिशय कमी प्रमाणात वस्ती करून राहतात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे शिक्षणाचे प्रमाण देखील कमी आहे असे असले तरी आदिवासी जमात म्हणजे लोकांचा एक समूह जो एकत्र राहतो समान भाषा संस्कृती आणि इतिहास यांचा सामायिक आहे अरे किंवा शहरांच्या बाहेर राहतो वन उत्पादने आणि जमीन हे त्यांच्या उपजीविकेचे साधन आहे अशिक्षित असणारा आजी वंचित व दुर्लक्षित घटक किंवा समूह म्हणून ओळखला जातो आदिवासी समाजाने प्रगती केली आहे शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे सध्या भारताच्या राष्ट्रपती महामहीन द्रोपदी मुरमु ह्या आदिवासी महिला म्हणून भारताच्या प्रशासनात कार्य करीत आहेत ब्रिटिश काळात क्रांतिकारी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्यासोबत आदिवासी महिला झलकारी बाईने ब्रिटिश विरोधी लढाईत पराक्रम गाजवला होता असे असले तरी सध्याच्या काळात आदिवासी जमातींमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती होत आहे इसवी सन 2023 मध्ये पहिले आदिवासी महिला साहित्य संमेलन गडचिरोली महाराष्ट्र येथे घेतले गेले या संमेलनाचे अध्यक्ष माननीय कुसुमताई अलाम ह्या होत्या म्हणजे बोटावर मोजल्या जाणाऱ्या इतक्याच आदिवासी महिला सध्या मात्र अजूनही आदिवासी समाजांमध्ये स्त्रियांमध्ये जागृती होणे महत्त्वाचे आहे

तरीही जंगल जमीन अधिकार व्यसनाधीनता दारिद्र्य बेरोजगारी अज्ञान अंधश्रद्धा जोडीपरंपरा स्त्रियांवर अत्याचार मोठ्या प्रमाणात होतात तरीही आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणात एकजूट असलेली दिसते श्रेयासन समारंभात एकजुटीने भाग घेतात महिला प्रसावाच्या कामात सामुदायिक भाग घेतात अन आरोग्य आरोग्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात आहेत गडचिरोली चंद्रपूर चंबळ खोरे व इतर पहाडी भागात दरोडेखोरांकडून स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले जातात आदिवासी स्त्रियांची विटंबना केली जाते त्यामुळे आदिवासी स्त्रियांचे जगणे असह्य झाले आहे त्यांच्या मानसिकतेचा विचार केला जात नाही त्यामुळे आदिवासी स्त्रीला तिचे कर्तुत्व सिद्ध करता येत नाही

**संदर्भसूची :-**

1. नजुबाई गावित तृष्णा आणि भिवा फरारी कादंबऱ्या
2. कवयित्री निर्मला पुतुन आदिवासी संस्कृती कवितासंग्रह
3. आदिवासी टाकीन प्रथा संध्या नरे पवार
4. वाहरू सोनवणे आदिवासी माय कवितासंग्रह

5. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास डॉक्टर भीमराव पाटील प्रशांत पब्लिकेशन जळगाव
6. नजुबाई गावित नवसा भिलनीचा एल्गार कथासंग्रह
7. भारताचा इतिहास जी एन पाटील अथर्व पब्लिकेशन जळगाव
8. आधुनिक भारताचा इतिहास डॉक्टर भीमराव पाटील व मु ब शहा प्रशांत पब्लिकेशन जळगाव

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# होळकर घराण्यातील काही कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा सबअल्टर्न अन्वयार्थ

**डॉ. पंकजकुमार शंकर प्रेमसागर**
इतिहास विभागप्रमुख,श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगांव
Email: pspremsagar@rediffmail.com

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे इ.स.च्या अठराव्या शतकात साम्राज्यात रूपांतर करणाऱ्या पराक्रमी, शूर सरदार घराण्यातील एक महत्त्वपूर्ण घराणे म्हणजे होळकर घराणे होय. या घराण्यातील पुरूषांनी आपले कर्तृत्व सिध्द केलेलेच होते, परंतु, त्यांना मुत्सद्दीपणाने, खंबीरपणे साथ देणाऱ्या कर्तृत्ववान स्त्रियांची इतिहास पटलावर पाहिजे तशी नोंद घेतलेली मात्र आढळत नाही. राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण, युध्दमोहिमा अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा नोंदविलेल्या, परंतु दुर्लक्षित अशा स्त्रियांना न्याय देण्याचा हा अल्प प्रयत्न होय.

- **होळकर घराणे-**

होळकर घराणे मुळचे पूण्याजवळील वाफगावचे. तेथून ते फलटण परगण्यातील होळ या गावी आलेत, तद्नंतर त्यांना होळकर आडनाव प्राप्त झाले. (सरदेसाई गो.स., खंड ३, (२०१०), पृ. १२८-१२९) होळकर घराण्यातील पहिला कर्तृत्ववान पुरूष म्हणून चौगुला खंडूजी होळकरांचे पुत्र मल्हारराव होळकर यांना महत्त्व प्राप्त आहे. इ.स. १७२५ मध्ये बाजीराव पहिल्याने मल्हाररावास ५०० स्वारांची मनसब दिली, (सरदेसाई गो.स., खंड ३, (२०१०), पृ. १२९) त्यामुळे मल्हारराव हेच होळकर घराण्याचे संस्थापक ठरतात.

- **गौतमाबाई होळकर-**

मल्हारराव होळकरांच्या पत्नी गौतमाबाई या खानदेशातील सुलतानपूर परगण्यातील तळोदे येथील सधन चौगुला भोजराज बारगळ यांची कन्या होय. त्यांचा जन्म इ.स. १६९३ मध्ये झाला. (सरदेसाई गो.स. (संपा.) (१९३७), पृ. १६६) आपला भाचा मल्हारराव याचे कर्तृत्व पाहून भोजराजने आपली कन्या गौतमाबाईचा विवाह त्याच्याशी इ.स. १७०१ मध्ये लावून दिला. (गुजर डॉ. यादव (१९९१), पृ. ६) गौतमाबाई एक शूर, आदर्श, साक्षर, कर्तृत्ववान स्त्री होत्या. इ.स. १७३४ मध्ये पेशवा बाजीराव पहिल्याने तिला खाजगी जहागीर देत त्यांचा सन्मान केल्याची नोंद मिळते. (भागवत अ.ना. (संपा.) (१९२४) पृ. १०) खाजगीच्या निमित्ताने गौतमाबाई या तंटे सोडविणे, खर्चाची तजविज करणे इ. व्यवहार यशस्वीपणे पार पाडत असल्याचे सिध्द होते.

**उत्तम प्रशासक-**

राजकारणाची जाण असणाऱ्या गौतमाबाई या उत्तम प्रशासकसुध्दा होत्या. मल्हाररावांच्या अनुपस्थितीमध्ये त्यांनी यशस्वीरित्या कारभार सांभाळल्याचे स्पष्ट होते. गौतमाबाईंना प्राप्त खाजगी जहागीरीचे प्रशासन व आर्थिक व्यवहार त्या स्वतंत्रपणे, यशस्वीपणे सांभाळत असल्याचे दिसून येते. (ठाकूर वा.वा. (संपा.) (१९४४), पृ. ४२) इ.स. १७६१ मध्ये मौजे पिंपळया माहेश्वर परगण्यातील गावासंबंधी वाद त्यांनी पंचायत पध्दतीने यशस्वीपणे सोडविला. (गुजर डॉ. यादव (१९९१), पृ. ३६) त्या आपल्या खाजगी उत्पन्नातून सावकार आणि व्यापारी यांना कर्जेही देत असत.

**युध्द मोहिमांमध्ये सहभाग-**

मल्हारराव होळकर यांच्या खांद्याला खांदा लावत त्यांना प्रत्येक संकटात, राजकीय कार्यात तोलामोलाचे सहकार्य गौतमाबाई करीत असल्याचे दिसून येते. प्रसंगी त्या मल्हाररावांसोबत युध्दमोहिमेवरही जात असत. इ.स. १७५९ मध्ये जयपूरच्या मोहिमेत त्यांचा सहभाग दिसून येतो. बरारीघाटाच्या युध्दात दत्ताजी शिंदेचा मृत्यू झाला

तसेच जनकोजी शिंदे हे जखमी झालेत. तेव्हा जनकोजीला भेटायला गेलेल्या मल्हाररावांसोबत गौतमाबाईही होत्या. मल्हारराव हे फार शोक व्यक्त करीत असतांना त्यांची परखड शब्दात कर्तव्यभावना जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य गौतमाबाईंनी केले. (गर्गे रामसेवक, शर्मा हिरालाल (संपा.), (१९७३-७४), पृ. ५९) त्यातून त्यांच्यातील वीरपत्नीत्वाचे गुण प्रकट होतात. तसेच 'जनकोजी शिंदे खरा जवानमर्द, हे मूळ मराठा गडी, जनकोजी शिंदे याने एवढा पराक्रम केला,' (गुर्जर गो.ज. (१९३०), पृ. ५६) अशा शब्दात जनकोजीच्या वीरत्वाची कदर करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य गौतमाबाईंनी केले.

**सार्वजनिक बांधकामे-**

गौतमाबाईंनी केशव मंदिराचे बांधकाम केल्याचे तसेच देपालपूर परगण्यात फळबागा बनविल्याची माहिती मिळते. गौतमाबाईंनी सुरू केलेले गौरीसोमनाथ मंदिराचे बांधकाम अहिल्याबाईंनी पुर्णत्वास नेले.

इ.स. १७६१ मध्ये वयाच्या ६६व्या वर्षी गौतमाबाईचे दम्याच्या आजाराने निधन झाले. त्यावेळी त्यांची खाजगी मिळकत सुमारे १५ लक्ष रू.ची होती, जी नंतर अहिल्याबाईला प्राप्त झाली. एकूण २७ वर्षे गौतमाबाईंनी आपल्या खाजगी मिळकतीची व्यवस्था यशस्वीरित्या सांभाळल्याचे दिसून येते.

रियासतकार सरदेसाई यांनी गौतमाबाईंच्या कर्तृत्वाचे यथायोग्य मूल्यमापन करतांना नोंद केली आहे की, 'ही बाई प्रजाहीतदक्ष व प्रशासन कार्यात कर्तृत्ववान असून तिचीच दिक्षा वीस-पंचवीस वर्षे अहिल्याबाईस मिळाली.' (सरदेसाई, (संपा.), खंड १, (१९३७), पृ. ३२१) म्हणजेच प्रजाहितदक्षता, प्रशासकीय कर्तृत्व याबाबत गौतमाबाईंनी आपली सून अहिल्याबाईंना बाळकडूच पाजल्याचे सिध्द होते. त्यांचा समृध्द वारसा अहिल्याबाईंनी पुढे चालू ठेवला. राजकारणपटूत्व, कणखर स्वभाव, कर्तव्यबुध्दीने घेतलेले निर्णय गौतमाबाईचे कर्तृत्व सिध्द करतात. असे असले तरी इतिहास पटलावर मात्र तिच्या कार्याची यथायोग्य नोंद घेतल्याचे आढळत नाही.

- **हरकूबाई होळकर-**

हरकूबाई या मल्हारराव होळकरांची खांडाराणी (तलवारीशी लग्न लावलेली) होत्या. त्या शिरपूर गावाच्या पाटील घराण्यातील कन्या असल्याचे काही इतिहासकार मानतात, तर काहींच्या मते त्या राजपूत समाजातील ठाकूर जातीतील होत्या.

हरकूबाईंनी आपल्या खाजगी पत्रव्यवहारासाठी स्वतःची स्वतंत्र मुद्रा तयार केली होती. होळकर घराण्याचे कुलदैवत मार्तंड असले तरी हरकूबाईच्या मुद्रेवर मात्र 'श्री दत्त' अशी अक्षरे असल्याने त्यावरून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व, प्रशासकीय कौशल्य सिध्द होते. राजकारण व प्रशासन यावर त्यांचा प्रभावही त्यातून जाणवतो. एकूणच स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व प्रकट करण्याचा हा धाडसी प्रयत्न ठरतो. अहिल्याबाईसुध्दा आपल्या पत्रव्यवहारामध्ये 'गंगाजल निर्मल हरकाई' असा उल्लेख करीत असत. (गर्गे रामसेवक, शर्मा हिरालाल (संपा.), (१९७३-७४), पृ. ६२)

खानदेशातील सिरपूर बुजुर्ग येथील गावाच्या पाटीलकीसंबंधी वाद उद्भवला, त्याप्रसंगी हरकूबाईंनी आपल्या बहिणीच्या मुलाचा पक्ष धरला. तेव्हा अहिल्याबाईंनी हरकूबाईंना साथ दिली. (गर्गे रामसेवक, शर्मा हिरालाल (संपा.), (१९७३-७४), पृ. ६२) म्हणजेच अहिल्याबाई व हरकूबाई या सासू-सुनांचे संबंध स्नेहपूर्ण असल्याचे त्यावरून सिध्द होते. मल्हाररावांच्या मृत्यूनंतर हरकूबाई अहिल्याबाईंसोबतच राहत होत्या.

मल्हारराव होळकरांच्या जीवनात गौतमाबाईंना मिळालेला दर्जा हरकूबाईंना प्राप्त झाला नसला तरी स्वतःच्या चातुर्य व कर्तबगारीने हरकूबाईंनी मिळविलेले स्थान महत्त्वपूर्ण ठरते. महानुभाव पंथीय हरकूबाईंनी इंदोर येथे प्रसिध्द बंकिबिहारी महानुभाव मंदिर बांधले. माळवा प्रांतात महानुभाव पंथाला महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देण्यात हरकूबाईचे मोठे योगदान आहे.

- **रखमाबाई होळकर-**

मल्हारराव होळकर यांचे मानसपुत्र तुकोजी होळकर होय. (सरदेसाई गो.स., खंड २, (२०१०), पृ. ४) रखमाबाई या तुकोजी होळकर यांच्या पत्नी होत्या. (पारसनीस द.बा भाग १, (१९१०), पृ. ११४) मालेराव होळकरच्या मृत्यूनंतर होळकर घराण्याची मालकी अहिल्याबाईकडे आली असली तरी ती स्त्री असल्याने तुकोजीला सरदारकीची वस्त्रे मिळालीत. तुकोजीमध्ये निर्णयक्षमता नसल्याने तो रखमाबाईच्या तंत्राने वागत असे. ती एक उचापती स्त्री होती. (सरदेसाई गो.स. खंड ७, (२०१०), पृ. १९) अहिल्याबाईनंतर रखमाबाईला खाजगी जहागीर मिळाली होती.

मल्हारराव यास अहिल्याबाई या होळकर घराण्याचा वारस नेमणार होत्या. परंतु त्यावरील मातृप्रेम बाजूला सारत 'हा मुलगा एखादे दिवशी तुमचा घात करेल' असे आपल्याच पुत्राविषयी सत्य वदन करण्याचे धाडस रखमाबाईंनी केले. याच मल्हाररावांनी आपल्या मातेविरूध्द कारस्थाने रचली, तेव्हा त्याचा पाडावही तिनेच घडवून आणला. इ.स. १७९४ मध्ये रखमाबाईचा मृत्यू झाला. (सरदेसाई गो.स., खंड ७, (२०१०), पृ. ३२)

- **तुळसाबाई होळकर-**

महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्थापन केलेले व संचालित केलेले उद्योग होय.

महिला उद्योजकांनी देशाच्या आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रावर लक्षणीय प्रभाव टाकला आहे. सध्या १५.७% दशलक्षाहून अधिक महिलांच्या मालकीचे उद्योग आहेत. त्याचप्रमाणे जागतिक उद्योजकता मॉनिटर या संस्थेने नमूद केले आहे की सुमारे ३४ देशांमध्ये ७३ दशलक्ष उद्योजक लोकांमध्ये ४० प्रतिशत महिला उद्योजक आहेत. अशा प्रकारे महिला उद्योजक देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**उद्दिष्ट्ये :-**

१. महिला उद्योजकतेच्या संख्येत होणाऱ्या वाढीचा अभ्यास करणे.
२. महिला उद्योजकांच्या कार्याचा अभ्यास करणे.
३. महिला उद्योजकांच्या प्रोत्साहनासाठी शासनाच्या योजनांचा अभ्यास करणे

**गृहितकृत्ये :-**

१. महिला उद्योजकांच्या संख्येत वाढ होत आहे.
२. महिला उद्योजकांच्या प्रोत्साहनासाठी शासन वेगवेगळया योजना राबवत आहेत.

या अभ्यास पद्धतीत दुय्यम स्रोताचा वापर करण्यात आला आहे.

**उद्योजकता म्हणजे काय?**

वेगवेगळया तज्ञांनी वेगवेगळया व्याख्या केल्या आहेत.

**जोसेफ शुम्पीटर:**

यांच्या मते उद्योजकता ही सृजनात्मक क्रिया आहे. कोणतेही व्यवसायाचे संकलन करताना सामान्यपणे ज्या गोष्टी केल्या जात नाही अशा गोष्टी वेगवेगळया पद्धतीने करण्याच्या क्रिया उद्योजकतेमध्ये समाविष्ट होतात.

**विलियम डायमंड:**

यांच्या मते उद्योजकता म्हणजे नविन आर्थिक क्रिया सुरू करण्यामध्ये अनुस्यूत असलेले जोखीम स्वीकारण्याची तयारी यामुळे अपरिहार्यपणे नसले तरी उद्योजकतेमध्ये नेहमी जोखिम स्वीकारणे व निर्णय घेणे या क्रियांचा समावेश होतो.

अशा प्रकारे वेगवेगळया तज्ञांनी उद्योग उद्योजकाची व्याख्या केलेली आहे.

ISSN : 2278-9308
February 2024

**महिला उद्योजकता:**

भारत सरकारच्या नॅशनल लेव्हल SNDING COMMITEE OF WOMEN ऑंत्रप्रनरशीप या समितीने निर्देशित केलेली व्याख्यानुसार , ज्या उद्योगात ५१% भाग भांडवल स्त्रियांकडून गुंतविण्यात आले आहे. तसेच ज्या उद्योगात निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधी पैकी किमान ५० टक्के रोजगार स्त्रियांनाच देण्यात आलेले आहेत अशा उद्योगांना महिला उद्योग म्हणतात .

थोडक्यात, महिला उद्योगाचा कारभार प्रत्यक्षात एका किंवा जास्त स्त्रियांकडूनच सांभाळण्यात येतो व उद्योग व्यवसायाच्या भांडवलामध्ये स्त्रीयांचे व्यक्तीगत किंवा संयुक्त भांडवल किमान ५१% गरजेचे असते. अशा प्रकारे महिला उद्योजकांची व्याख्या केली जाते.

**महिला उद्योजकांची भूमिका:-**

महिला उद्योजक आणि भारतातील त्यांच्या वाढत्या उपस्थितीने देशाच्या आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रावर प्रभाव टाकला आहे. महिलांच्या नेतृत्वाखाली व्यवसाय अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे. भारताच्या ४३२ दशलक्ष कार्यरत वयाच्या महिला आणि १३.५ ते १५.७ दशलक्ष महिन्याच्या मालकीचे व्यवसाय आहेत, जे २२ ते २७ दशलक्ष लोकांना थेट रोजगार देत आहेत. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे.

महिला सर्व क्षेत्रात यशस्वी आणि सर्वोत्तम कामगिरी करत आहेत. अर्थातच उद्योग क्षेत्र त्याला अपवाद नाही. उद्योग क्षेत्रात जवळजवळ १४% असे उद्योग आहेत ज्यांची मालकी आणि व्यवस्थापन महिला करत आहेत. आज जागतिक पातळीवर १२६ मिलियनहून अधिक महिलांनी उद्योग सुरू केले आहेत. भारताच्या विचार केला तर आठ मिलियनहून अधिक महिला सक्रिय आहेत. भारतात महिला उद्योजकांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. महिला उद्योजकांच्या वाढत्या संख्येमुळे जगभरात भारताचा तिसरा क्रमांक लागतो. भारतामध्ये अशा खूप महिला उद्योजक आहेत ज्या त्यांच्या उद्योग क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करत आहेत. अशा सर्वोत्तम दहा महिला उद्योजकांची माहिती पुढील प्रमाणे.

**१. फाल्गुनी नायर:-**

यांनी “नायका” या ई-कॉमर्स स्टार्टअप कंपनीची स्थापना केली. यामध्ये सौंदर्यप्रसाधने पर्सनल केअर तसेच आरोग्यविषयक प्रॉडक्ट चा समावेश होतो. सर्व उत्पादने ऑनलाइन आणि वाजवी दरामध्ये उपलब्ध करून देण्यात आली, त्यामुळे अल्पावधीतच नायका ग्राहकांच्या पसंतीस उतरली.

**२. नीरु शर्मा:-**

यांनी “इन्फीबीम”याइ कॉमर्स कंपनीची स्थापना २००७ मध्ये केली. ही कंपनी मुख्यत्वे पुस्तके इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमोबाईल या प्रकारचे प्रॉडक्ट्स योग्य दरात आणि घरपोच उपलब्ध करून देते, त्याचबरोबर आयपीओ फाईल करणारी इन्फीबीम ही भारतातील पहिली ई-कॉमर्स कंपनी बनली आहे.

**३. राधिका घाई अग्रवाल:-**

यांनी “शॉप क्लूझ” ही कंपनी स्थापन केली. शॉप क्लूज ही ॲमेझॉनफ्लिपकार्टप्रमाणेचएकई-कॉमर्सकंपनीआहे.

**४.रिचाकर :-**

यांनीस्त्रियांच्याअंतरवस्त्राशीनिगडित“झिवामी” नावाचा ब्रँड २०११ मध्ये बाजारात आणला आणि आता हा ब्रँड स्त्रियांमध्ये प्रसिद्ध असणारब्रँडपैकी एक ब्रँड बनला.

**५.सबीना चोप्रा:**

या “यात्रा” च्या संस्थापिका आहेत. ही भारतातील सर्वात मोठी युरोपियन ट्रॅव्हल्स कंपनी आहे.

**६. सायरी चहल:-**

या शेरॉझ या कंपनीच्या संस्थापिका आहेत आणि सीईओ सुद्धा आहेत. ही एक ऑनलाईन कंपनी आहे. ही महिलांना योग्य प्रकारे करिअर निवडण्यास मदत करते आणि त्यांचं आयुष्य सुखकर बनवणे या उद्देशाने स्थापन झालेली आहे .

**७. श्रद्धा शर्मा:**

श्रद्धा शर्मा युवर स्टोरी च्या संस्थापिका आहेत. युवर स्टोरी हे एक उद्योजकांसाठी एक मीडिया टेक्नॉलॉजी व्यासपीठ आहे. उद्योजकांना त्यांची कथा समोर मांडता यावी या उद्देशाने यु स्टोरीची सुरुवात २००८ मध्ये झाली .

**८. सूची मुखर्जी :**

या लाईम रोडच्या संस्थापिका आहेत. लाईमरोड ही एक ऑनलाईन फॅशन जीवनशैली मध्ये काम करणारी कंपनी आहे.

**९. उपासना टाकू:**

या "ईयाक पे " या कंपनीच्या संस्थापिका आणि मोबी क्विक या कंपनीच्या सहसंस्थापिका आहेत. ही कंपनी भारतातील सर्वात मोठी स्वतंत्र मोबाईल पेमेंट नेटवर्क कंपनी आहे आणि त्याचबरोबर ईयाक पे ही ऑनलाईन पेमेंट गेटवे आहे.

**१०: वंदना लूथरा :**

या व्ही एल सी सी हेल्थकेअर लिमिटेड च्या संस्थापिका आहेत. त्या सौंदर्य फिटनेस अन्न न्यूट्रिशन आणि त्वचेची काळजी या गोष्टींमध्ये पारंगत आहेत.अशा प्रकारे प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत ; म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत महिला उद्योजकांना महत्वाचे स्थान मानले जाते.

**महिला उद्योजकाच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य सरकारच्या योजना :-**

महिला उद्योजकतेला चालना व प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य मंत्रिमंडळाने १४डिसेंबर २०१७ ला महिला उद्योजकांसाठी औद्योगिक धोरण मंजूर केले. महिला उद्योजकासाठी धोरण असणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे. धोरणात असे म्हटले आहे की महिला उद्योजकांना प्रकल्पाच्या भांडवलाच्या गुंतवणुकीच्या १५ %ते ३५% च्या प्रमाणात पाच टक्के पर्यंतच्या व्याजदराच्या दराने 15 लाख ते एक कोटी विशेष आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सरकारने महिला उद्योजकांच्या विकासासाठी विशेष प्रोत्साहन योजना, कामगार कल्याण सहाय्य, बाजारपेठ विकास व विपणन सहाय्य ,समर्पित जागा निर्माण करणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भूखंडाचे आरक्षण त्याचप्रमाणे उबवन केंद्र, समूह विकास केंद्र, महाराष्ट्र सूक्ष्म लघु व मध्यम उपक्रम व महिला विकास केंद्र ,समूहासाठी पायाभूत सुविधा विकास योजना यासारख्या अनेक योजना शाशन राबवित आहे.

**महिला उद्योजकांसाठी केंद्र सरकारच्या योजना:-**

१. अन्नपूर्णा योजना
२. मुद्रा योजना
३. प्रधानमंत्री रोजगार योजना
४. उद्योगिनी योजना

यासारख्या योजना केंद्र सरकार महिला उद्योजकाच्या विकासासाठी राबवत आहे.

महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार महिला उद्योजकांसाठी यासारख्या योजना राबवत असल्यामुळे भारतात महिला उद्योजकांच्या संख्येत वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.

**निष्कर्ष:-**

आज महिला उद्योजकांची संख्या झपाटाने वाढत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे महिला उद्योजकांच्या वाढीसाठी सरकार अनेक योजना राबवत आहे जशी स्टार्टअप योजना व महिला बचत गट योजना यासारख्या योजना मार्फत महिला उद्योजकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.त्याचप्रमाणे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे त्यामुळे आज महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. कृषी क्षेत्र असो या उद्योग क्षेत्र असो या सेवा क्षेत्र प्रत्येक क्षेत्राच्या विकासासाठी महिला उद्योजकांची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

**संदर्भ सूची:-**

१.डॉ.जोशी जयंत:उद्योजकता विकास , पिंपळापुरे &पब्लिशर्स,नागपूर.

२.वाणिज्य कोश , खंड २ प्रा.डॉ.संजय कप्तान , प्रा.जॉन्सन बोजेस, डायमंड पब्लिकेशन

३.www.womentrepreneurs.com

४.डॉ.देश्मुख, प्रभाकर , उद्योजकता विकास –संकल्पना आणि व्यवहार , पिंपळापूर and पब्लिशर्स नागपूर

ISSN : 2278-9308
February 2024

# प्रज्ञा लोखंडे यांचे साहित्यातील दलित स्त्री आणि स्त्रीवादी जाणीवा

**प्रा.ज्योती सुकदेव नन्नवरे**

सौ.र.ना.देशमुख कला, वाणिज्य,व विज्ञान महाविद्यालय भडगाव ई-मेल:- nannawarejyoti@gmail.com

**प्रस्तावना:-**

आधुनिक मराठी कवयित्रीच्या तिसऱ्या पिढीतील प्रज्ञा लोखंडे या एक महत्त्वपूर्ण कवयित्री आहेत. कविता लिहिणे हे त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य असले तरी, स्तंभलेख, नाटक, समीक्षा आणि संपादन या साहित्याच्या विविध क्षेत्रांमध्ये प्रज्ञा लोखंडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे याबरोबरच स्त्रीवादी चळवळ, साहित्य चळवळ अशा सामाजिक क्षेत्रातही त्या सातत्याने सहभागी होतात.

कवयित्री, समीक्षक, लेखिका आणि संपादक या विविध भूमिका एकाच वेळी सहजपणे पैलू शकणाऱ्या प्रज्ञा लोखंडे साहित्यिका आहेत. त्यांचे लेखन अतिशय प्रभावी, परिणामकारक आणि विचार प्रवर्तक आहेत. त्यांनी कविता या वांग्मय प्रकारातून वैशिष्ट्यपूर्ण लेखन केले आहे बहुजन समाजातून आलेल्या प्रज्ञा लोखंडे यांना वेळोवेळी संघर्ष करावा लागला आहे. कधी व्यक्ती म्हणून तर कधी फक्त स्त्री म्हणून आणि म्हणूनच त्यांच्या कवितेची ना स्त्रीशी, तिच्या अस्तित्वाशी, वेदनीशी अगदी सुरुवातीपासूनच जुळलेली आहे. महानगरीय संवेदन व्यक्त करणे हा त्यांच्या साहित्याचा एक विशिष्ट पैलू आहे. सांस्कृतिक परिवर्तनाच्या अपरिहार्य तेथून दलित साहित्य जन्माला आले. त्यांचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे रूप प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केले आहे. त्यांची कविता स्त्रिवादी, महानगरीय आणि दलित या तीनही भूमिका समर्थपणे पेलते. प्रज्ञा लोखंडे यांची एकूण साहित्य एका स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकेल असे सामर्थ्य त्यात आहे.

दलित स्त्रिया आजही अनेक प्रकारच्या अन्याय, अत्याचाराचा सामना करीत आहेत. त्या भयानक प्रकारच्या हिंसेच्या, मानहानीच्या बळी आहेत. दैनंदिन जीवनामध्ये, संस्थात्मक पातळयांवर व सामाजिक संरचनेच्या व्यवस्थात्मक पातळयांवर व सामाजिक संरचनेच्या व्यवस्थात्मक पातळयांवर त्यांच्या जीवनातील असमानतेची, शोषणाची, त्यांच्यावरील हिंसेची मुस्कुटदाबीची कारणे स्पष्टपणे दिसतात. तसेच या शोषणाला ऐतिहासिकता व सामाजिकता सामाजिक व्यवस्था यांची सांगड व पार्श्वभूमी आहे. अर्थात, हे सर्व असूनही, दलित स्त्रियांचा त्यांच्या जीवनातील अन्याय अत्याचाराच्या विरोधातला ठाम व प्रखर लढा हे दलित स्त्री जीवनात वैशिष्ट्य आहे, यालाही प्रदीर्घ अशी ऐतिहासिकता व सामाजिक परंपरा आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेखात एकूण स्त्रीवादी जाणिवांचा स्वरूप त्यांची जीवनदृष्टी त्यांची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे इथे दलित स्त्रियांची ऐतिहासिकता व सद्यस्थिती तसेच न संपणारी अनावस्था मानहानी आणि त्यांचे न संपणारी निरंतर स्वरूप व त्याविरुद्धचा त्यांचा न संपणारा प्रखर आवाज व व्यवस्थेचे भान असलेला लढा हेच परिणाम दलित स्त्रीवादी विचारांचा मुळाशी आहे. हा विचार या लेखाच्या मुख्य स्थानी आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

१) साहित्याच्या विविध अंगांची जाण असलेल्या, सामाजिक भान जपणाऱ्या आणि श्री अस्तित्वाचा, स्वातंत्र्याचा, समतेचा पुरस्कार करत लेखन करणाऱ्या प्रज्ञा लोखंडे या महत्त्वपूर्ण लेखिका आहेत.
२) प्रज्ञा लोखंडे यांचा भारतातील प्रगतिशील, जनवादी साहित्य चळवळीशी सातत्याचा अनुबंध जोडला गेलेला आहे.
३) स्त्रिया लाभलेल्या गुलामीतून मुक्त न होता पुरत्या बंदिस्त केलेल्या आहेत ही इथली स्त्री मुक्ती .
४) स्त्री -संघटनांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.
५) प्रज्ञा लोखंडे यांच्या साहित्यातून दुःख, दारिद्र्य व दलित स्त्रियांचे वर्णन समजून घेणे.

**विषय विवेचन:-**

प्रज्ञा लोखंडे यांची पहिली ओळख म्हणजे ज्येष्ठ साहित्यिक दया पवार यांची मुलगी ही होय. आणि आता आधुनिक कवयित्रीच्या तिसऱ्या पिढीतील एका प्रतीत यश कवयित्री. वडिलांच्या अनुषंगाने चळवळीशी संबंध आला. महात्मा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यास करत असतानाच समाजातील असमानता, शोषण, अभाव यांची प्रज्ञा लोखंडे यांना अस्वस्थ जाणीव झाली वडिलांच्या अलौकिक कार्यामुळे घरी येणारे लेखक, अभिनेते, कार्यकर्ते, अनेक क्षेत्रातील व्यक्ती त्यांच्या वडिलांशी होणाऱ्या चर्चा त्यामुळे लहानपणापासूनच विशिष्ट परिवर्तनवादी चळवळीचे वातावरण लाभल्यामुळे त्यांना समाजाचे भान आले शोषणाची जाणीव झाली.

वयाच्या अवघ्या 15 -16 व्या वर्षी पहिली कविता स्फुरली कोकिळा, श्री भावनांच्या घुसमतीचे प्रतीक होते. येथून लेखन प्रवासाला सुरुवात झाली शोषित, वंचित समाजाचे दुःख विशेष करून स्त्रियांचे प्रश्न सहज होणे त्यांच्या

काव्यातून प्रकट होत गेले प्रज्ञा लोखंडे यांनी वैयक्तिक आयुष्य त्यातले चढउतार याला श्रीशोषणाचे संदर्भ मानले. त्यांच्या साहित्यातून ते प्रकर्षाने मांडले आहे. पारंपारिक अर्थानं घर नावाची सुबत्ता असलेली चौकट त्यांनी मोडून टाकली त्यांच्या कवितेवर, साहित्यावर ''हे लिहून नको"अशी बंधने त्या स्वीकारू शकल्या नाहीत. तसेच त्यांच्या मोठ्या सार्वजनिक जीवनावर लगाम घातला जाणे त्यांना सहन करणे शक्य नव्हते. तेव्हा प्रज्ञा लोखंडे या आपल्या नववीत शिकणाऱ्या मुलाला बरोबर घेऊन संसाराची चौकट मोडत घराबाहेर पडल्या त्यांची ही कृती समानतेची मूल्य जपणाऱ्या आणि त्यासाठी आपली लेखणी वापरणाऱ्या एका कार्यकर्तेच होती. आंबेडकरी विचार प्रणालीचा अविष्कार आहे असे त्या म्हणतात. त्यांच्या काव्य लेखनाला तर अनेक असे सूत्र आहेत. संस्कृती कारण, समाजकारण सत्ता कारण, विवाह संस्था, स्त्री -पुरुष संबंध अशी अनेक परिणाम लाभलेली त्यांची कविता स्त्री शोषणाच्या , स्त्री प्रश्नाच्या मुळाशी घाव घालते.

प्रज्ञा लोखंडे आपल्या व्यक्तिगत जीवन संघर्ष हा व्यापक श्री जीवन संघर्ष चळवळीचा एक भाग मानतात त्यात श्री श्री दलित समानता स्त्रियांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवणे या मूल्यांना जपण्यासाठीच वैयक्तिक आयुष्यात त्यांनी संघर्ष करून सामाजिक भान जपले परिवर्तनाचा वाटसरू'या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पाक्षिकाचे संस्थापक संपादक अभय कांता या सामाजिक कार्यकर्त्यांशी प्रज्ञा यांनी दुसरे लग्न केले आहे आणि प्रज्ञा लोखंडे हे पूर्वाश्रमीचे नाव बदलून पुन्हा'प्रज्ञा दया पवार'हेच नाव धारण केले आहे.

गेली 65 वर्ष दलित स्त्रियांनी तथाकथित मधल्या धारेतल्या स्त्रीवादाची वाट पाहिली की, तो स्त्रीवाद दलित स्त्रियांचा देखील आहे. भारतातील सगळया स्त्री प्रश्नांच्या सोडावनुकीत त्या गेली सात दशक खंबीरपणे उभे आहेत ही वस्तुस्थिती त्यांना न्याय देऊन गेली नाही. तरीही त्या स्वतंत्र मात्र सवतासुभा मांडणार नाहीत.

परंतु भारतीय तथाकथित मधल्या धारेतला स्त्रीवाद व त्या स्त्रीवादी विचारातून त्या विचारांसाठी निर्माण झालेल्या संस्था म्हणजेच women studies यांचा आढावा घेता, तिथे सगळे प्रश्न ज्या कोणी संबळ आहेत त्यांच्याच आणखीन समजते च्या दृष्टीने संबोधले गेले आणि जेव्हा जेव्हा कुठे कुठे दलित स्त्रियांवर संशोधन झाले'किंवा जे काही झाले त्यांचे कंगोरे शासनाचे आदेश झाले म्हणून झाले आणि तेही by the way म्हणून झाले जे झाले त्यातही अनेक रिकाम्या जागा (lapes) आहेत.

दलित साहित्यांचा लोककलांच दस्तऐवजीकरण व्हावं तसंच भारतातील दलित साहित्यांच सुंसंबध्द एकत्रीकरण करावं अशी प्रज्ञा लोखंडे यांची कल्पना साकार करण्यासाठीच त्यांनी दया पवार प्रतिष्ठान यांची स्थापना केली. त्या अंतर्गत विविध उपक्रम, क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींना दया पवार यांचे नाव पुरस्कार देणे असे उपक्रम राबवले जातात. प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यातून श्री मनाचा संवेदनाचा अत्यंत सखोल पणे, चिंतनशील विचार केला आहे. त्यांच्या काव्याला समग्र वैश्विक माणुसकीच्या जाणिवेचाही स्पर्श आहे. त्यांच्या लेखना मागचे प्रमुख भूमिका ही स्त्रीवादीच आहे. परंतु पूर्वपरंपरेचा चालत आलेला दलित तत्त्वाचा वादही त्या आपल्या काव्यातून मांडतात. संपूर्ण श्री त्वचा गृहीत पारू पाला छेद देऊन दलित श्रीवादी जाणिवांना प्रज्ञा लोखंडे यांची कविता नवरचित करते.

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेनेही स्त्रीच्या जगण्याची अस्तित्वाची घुसमट धिरगंभीरतेने व्यक्त केली आहे. तसेच शोषणावर विषमतेवर व लिंगभेदावर त्यांची कविता हल्ला चढवते. वि. वा. शिरवाडकर, प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्याविषयी म्हणतात."अत्यंतिक हळवेपणा"आणि तीव्र संवेदना हे तुझ्या व्यक्तिमतत्त्वातील गुणविशेष तुझ्या काव्यात उतरले आहेत.

"आपल्यातच किती अंतस्थ कप्पे वावरत असतात.
एकमेकांना अनोळखी असल्यागत"

अशा रूपात स्वतःलाच अनोळखी कप्प्यांना परस्परांशी ओळख करून देत राहतात स्वतःचाच शोध घेत राहणारी या कवयित्री स्त्रीत्वाचा संघर्षाची पेढा आपल्या काव्यातून अत्यंत प्रखरपणे मांडतात.

दलित स्त्रिया व व्हलनरेबिलिटी (vulnerability) मॉडेल प्राथमिक देणे लक्षात घेतले तर दलित श्री ही सगळयात जास्त vulnerable आहे.vulnerable चा अर्थ आहे व असुरक्षित आणि म्हणून हजबळी पडेल अशी इथे मूलभूत तत्वे हे लक्षात घेतले पाहिजे. ते हे की दलित स्त्रियांची अगतिकता व अवहेलना इथल्या समाज व्यवस्थेतून निर्माण होणारी व ती या समाज व्यवस्थेचे स्वरूप आहे हे स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे याबाबत मी एक मॉडेल बनवले Vulnerability model त्यांचे मुद्दे पुढीलप्रमाणे. उदा. मग दलित स्त्रिया सगळयात जास्त कष्ट करणाऱ्या आणि सगळयात जास्त पिळवणूक होत असलेल्या आहे शारीरिक कष्ट त्यांच्या एवढे भारतीय समाजात कोणीच करत नाही.

आणि हा कष्ट करणाऱ्या दलित स्त्रियांच्या संस्थेच्या व्यक्ती रिक्त सुद्धा काही कष्ट करणाऱ्या दलित स्त्रिया आहेत ज्या नुसतेच कष्ट करत नाही तर लाभलेल्या समाज व्यवस्थेचा व मानवी अवहेलना लादलेल्या दलित श्री समूहातून येतात. त्यापैकी प्रथम लाभलेल्या अमानवी, अवहेलना असलेला व्यवसाय आहे. सफाई कामगार दलित स्त्रियांचे प्रमाण यात दलित पुरुषांपेक्षा जास्त आहे. या लाभलेपणावर सांगायचे तर या स्त्रियांच्या करण्यामध्ये कितीतरी एनजीओनी स्वतःचे नाव कमावले आणि प्रश्न गोंधळ टाकून प्रश्न नाही दिशा करून त्या स्त्रियांचे जीवन वेगळया पद्धतीने दुर्दशेने

ग्रासून टाकले. उदा. सांगायचे तर पुण्याच्या यू. एन. फंड घेणाऱ्या एनजीओनी स्वघोषित नेत्यापूर्वी पूर्णिमा चीकरमाने यांनी या स्त्रियांचा प्रश्न येथे लक्षात येते. स्त्रियांच्या मोर्चामध्ये कचरा आमच्या मालकीचा एकूणच त्या कचऱ्यातून मुक्त होऊन स्वतःला सन्मान मिळवून मानाने जगण्याच्या अनेक शक्यता नाकारून त्यांना त्यांच्यावर लाभलेल्या जीवनाबद्दल आवड निर्माण करण्याची प्रवृत्ती त्या समूहाचे नेतृत्व करणाऱ्यांनी चालवले म्हणजे वेगळ्या अर्थाने पाहिले तर त्याचा अर्थ नवीन लाभलेल्या म्हणायला लावणार यंत्र युगात हाताऐवजी इलेक्ट्रिक झाडूचा वापर करून त्यांना ते जे काम करतात त्यापासून मुक्त करून सन्मानाचा मार्ग अवलंबून यासाठी शिक्षण घेऊन वेगवेगळे संध्या प्राप्त करण्यात यावा याकडे त्यांचे मन न वळवतात त्या समूहातील स्त्रियांचे शक्यतोवर लक्ष कचऱ्याकडे वळणे आणि त्यापासून पैसे मिळवून आर्थिक प्रश्न तात्पुरते भागले जातात या एकाच सत्याला लक्षात ठेवून आणि त्या सत्याबद्दलचा ब्रेनवाश करून त्यांनी हे करायला लादलेली भाषा बोलायला लावणे ही त्यांना आवडते.

स्वातंत्र्यानंतरच्या 65 वर्षाच्या प्रदीर्घ अनुभवानंतर एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात दलित स्त्रियांनी स्वतःचा श्रीवास्तपणाने मांडण्याची गरज व ज्ञान प्रक्रिया सुरू झाली आहे या प्रक्रियेचे वैशिष्ट्य असे की फुले आंबेडकर विचारांमधून साकारलेला मनुष्य एक मुक्ती व्यक्ती,an autonomous being याची निर्मिती करणे हे या दलित श्रीवादी जाणिवेच्या मुळाशी असलेले मुख्यतत्त्व आहे. मानवी जीवनाची ही व्यापक जाणीव त्यात सगळ्याच वंचितांचा समावेश असणार आहे हे तत्व दलित स्त्रीच्या जाणिवेत व नेहमी च घडत आहे म्हणजेच दलित श्री वादी जाणीव फुले आंबेडकरी विचारांच्या जाणिवावर निर्माण होतात. म्हणजेच समाज व्यवस्थेने मूलभूत बदल हे त्यांचे उद्दिष्ट असेल. दलित श्रीवाद न ्याय समानता अशा मानवी तत्त्वावर उभा असेल. या जाणिवांची व्याप्ती सर्व शोषितांना व सगळ्या दुःखांना जोडणारी असते दलित स्त्रिया स्वातंत्र्यपूर्वी, स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र असलेल्या होत्याच त्या वेगळ्या प्रकाराने आपली स्वाभिमानी तर्कशुद्ध मत मांडत असत त्या गरीब गाय कधीच नव्हत्या ती गुलामीची संकल्पना त्यांना कधी भावलीच नाही चौदाव्या शतकातील संत कवयित्री सोयराबाई, निर्मला, भागुमारीन यांना लक्षात घेतले तर त्यांची कवनं ही श्री वादी असण्यापेक्षा ती जास्त मानव मुक्तीवादी होती त्याच्या ज्या संपूर्ण समाजाची गुंतागुंत मांडतात त्याप्रमाणे स्वातंत्र्याच्या काळात दलित समाज व दलित स्त्रिया दोन प्रकारचे लढे लढत होत्या. एक संपूर्ण समाजाच्या स्वातंत्र्याचा जो परकीय सत्तेविरुद्ध होता आणि त्याच वेळेला बाबासाहेबांच्या मानव मुक्तीच्या चळवळीतही सहभागी झाल्या दलित म्हणून फक्त स्वतःचे प्रश्न त्या मांडत नाही गेल्या दोन दशकांमध्ये दलित श्री प्रश्नाच्या सिद्धांतिक मांडणीमध्ये तो अस्मितेचा राजकारणाचा भाग असेल त्याला निकालात काढलं जातंय परंतु दलित चळवळ भारतामध्ये अस्मितेच्या राजकारणाच्या होकारात्मक मुद्द्यावर भर देते ती अस्मितेच्या राजकारणातील विशिष्ट तेला वाजवी माप देत नाही व अस्तित्वाच्या लढाई त सामील होऊन इतरांचे दुःख संपवण्यासाठी इतरांच्या लढ्यातील सामील झाली हा भारताचा इतिहास आहे अशा दोन लेव्हलला ती होती अशीच आहे आणि पुढे जाऊन तशीच ती असणार आहे अगदी वर उल्लेखलेल्या ऐतिहासिक तेदेखील ती तिच्यासाठी वेगळी भाषा बोलतच नाही तर ती मानव मुक्तीची भाषा बोलते तेच आहे फुले आंबेडकरी विचाराचे दलित पॅंथर चळवळीचे स्वातंत्र्यानंतरच्या काळात चा मागवा घेतल्यावर असे दिसते की बोटावर मोजल्या जातील अशा काही दलित स्त्रिया शिकल्या सवरल्या त्यांचे देखील दलित शिकवलेल्या मध्यमवर्गीय पुरुषांप्रमाणे झाले आहे त्या ब्राह्मणी दुसऱ्याला कमी लेखणाऱ्या प्रवृत्ती खाली लिहू लागल्या परंतु त्या मोजक्या दलित स्त्रियांचे प्रश्न देखील ब्राह्मणीच आहे म्हणजे स्वतःचा नवरा जो त्रास देतो तो एकमेव त्रास पण तो त्रास त्या त्रासाव्यतिरिक्त व समाज व्यवस्थेचा भाग म्हणून निर्माण झालेल्या जात व्यवस्था व जात पुरुषता यांच्यामुळे येणारे शोषण यांचं भान अलीकडच्या काही मध्यमवर्गीय श्री जाणिवांमध्ये दिसत नाही.

म्हणजेच दलित स्त्रियांचा स्त्रीवाद हा शक्यतो जाती आधारित सार्वजनिक पुरुष सत्तेविरोधात आहे. बऱ्याचदा दलित पुरुषही समान शोषित म्हणून जेव्हा जेव्हा तिच्यावर हिंसा होते तेव्हा तेव्हा तिच्या दुःखात साथ देणारी पहिली व्यक्ती असते शिवराम जानबा कांबळे यांनी पहिल्यांदा स्त्रियांना देवदासी पण सोडावे यासाठी आपला ज्ञानप्रकाश या पत्रकात विनंती केली होती ज्योतिराव फुलेंपासून बाबासाहेबांनी या स्त्रियांना हे काम सोडून स्वाभिमानाने जगण्यासाठी सांगितले हे पुरुष जरा त्यांच्याबरोबर नसते तर या स्त्रिया एकट्या पडल्या असत्या अर्थात सगळयात स्त्रियांसाठी हे पुरुष लढले बाबासाहेबांनी राज्यघटनेत दिलेले हक्क व त्याची अंमलबजावणी केली आहे.

**समारोपः-**

आधुनिक मराठी कवयित्री मध्ये वैशिष्ट्यपूर्ण काव्य लेखन करून आपला स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या प्रज्ञा लोखंडे या कवयित्री आहेत स्त्रीवादी जाणीव ही प्रमुख भूमिका असली तरी त्यांच्या काव्यातून दलित श्री ची जाणीव ही प्रमुख भूमिका असली तरी त्यांच्या काव्यात दलित जाणीव ही एकेरी न मानता आपल्या काव्यातून त्यांनी दलित श्री वादी ही संकल्पना नव्याने रुजवली आहे सन्मान जाणूक वैश्विक समग्रतेशी एकरूप होणारी कविता लिहून त्यांनी खरोखरच सामाजिक प्रारूपणाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भः-**

१) प्रज्ञा लोखंडे-अंतस्थ प्रस्तावना', डिंपल पब्लिकेशन, ठाणे. दुसरी आवृत्ती २००४प्र.१८
२)तत्रैव-प्र.१५
३)तत्रैव-प्र.१०
४)प्रा.रा.ग.जाधव-आधुनिक मराठी कवयित्रीची कविता, प्रतिमा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती १९९६ प्र.९९-१००
५) परिवर्तनाचा वाटसरू, हे पाक्षिक, मालक प्रकाशक अभय कांता नर्मदा ऑफसेट, नारायण पेठ पुणे ३० प्र.३७

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# निर्मला पुतूल के काव्य में नारीवाद ('अपने घर की तलाश' काव्य के संदर्भ में)

**डॉ.क्रान्ति वासुदेव सोनवणे**
एस.एस.एम.एम.कॉलेज, पाचोरा ७७७५०२३२३१

भारतीय इतिहास में नारी का जीवन परतंत्र में ही रहा है, हमेशा से ही वह दूसरों अधीन के रही है | बाल्यवस्था | में वह पिता के अधीन रहती है तो युवावस्था में अपने पति के अधीन और वृद्धावस्था में अपने बेटे के सहारे जीती रही | ऋग्वेद में कहा गया है की-

"पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने
रक्षन्ति स्थाविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्य महर्ति |"[१]

एक स्त्री को अपना जीवन पिता, पति और पुत्र के सहारे ही जीना पड़ता है| बचपन से लाड-दुलार से उसे बड़ा करके पिता के पसंद के लड़केसे विवाह कर पति के अनजान घर भेज दिया जाता है |

इस दुनिया में मानव ने बहुत प्रगति कर ली है | आधुनिक कहे जानेवाले मानव ने सभी क्षेत्रों में विकास कर लिया किन्तु वैचारिक दृष्टी से आज भी पुरानी रीती-रिवाजो में जकड़ा है | आज स्त्री को पुरुष के बराबर समझा जाता है | किन्तु क्या यह सच है ? स्त्री को अपने अस्तित्व के लिए आज भी संघर्ष करना पड़ रहा है | स्त्री के प्रति हमारा दृष्टिकोण आज भी नहीं बदला | आदिकाल के साहित्य से लेकर आधुनिक काल के साहित्य के माध्यम से स्त्री समस्या को सामने लाने का प्रयास साहित्यकार कर रहा है | हिंदी साहित्य की सभी विधाओं में नारी एवं नारी समस्याओं पर साहित्य सृजन किया गया है | आज महिला साहित्यकार अपनी लेखनी के माध्यम से अपनी मौजूदगी दर्ज करा रही है | अपनी लेखनी के द्वारा स्त्री के सामाजिक, पारिवारिक, मानसिक और आर्थिक स्थिती को उजागर कर रही है | वह अपनी एक अलग पहचान बनाना चाहती है | वह घर से परे अपनी जमीन तलाशती है | अपनी पहचान तलाशती है जो सिर्फ उसकी हो | ऐसी हि कवयित्रीयों में चर्चित नाम है निर्मला पुतुल |

निर्मला पुतूल का जन्म झारखंड राज्य के दुमका जिले के 'दुधनी कुरुवा' गाव के आदिवासी परिवार में हुआ | उनके पिता का नाम सिरील मुरमू और माता का नाम कांदिनी हांसदा था | निर्मला जीकी कविताओं में आदिवासी जीवन के बहु आयामों को देखा जा सकता है | साथ हीस्त्रियोंकीपीड़ा, उपेक्षा और विवशता को भी उजागर किया है | उनकी कविताएं पुरुष सत्ता का विरोध करती नजर आती है|

'अपने घर की तलाश' कविता में निर्मला जी नारी संबंधी वास्तविकता को पुरुषसत्तात्मक समाज के सम्मुख रखती हुई कहती है की,

अन्दर समेटे
पूरा का पूरा घर
मैं बिखरी हूँ पुरे घर में
पर वह घर मेरा नहीं है
बरामदे पर खेलते
बच्चे मेरे है
घर के बहार लगा नेम प्लेट
मेरे पति का है[२]

जिस घर में स्त्री अपने परिवार के सदस्यों के साथ रहती है, उनको अपना मानकर निस्वार्थ रूप से सेवा करती है फिर भी वह घर उसका नहीं | स्त्री चाहे माता-पिता के घर रहे या पति के घर रहे, परन्तु एक प्रश्न उसका पीछा करता है मेरा घर कौनसा है?

निर्मला जी की कविताओं में चित्रित स्त्री अपने घर, परिवार में अपना स्थान खोजती है | अपने अस्तित्व को तलाश करते हुए अपनी जमीन तलाशती है | पुरुष प्रधान समाज व्यवस्था से निर्मला जी कहना चाहती है कि, आधुनिक युग में स्त्री को संविधान द्वारा पुरुषों के बराबर का अधिकार मिला किन्तु, उसका स्थान आज भी परिवार और समाज में द्वितीय है |

स्त्रियों की वास्तविकता बयां करते हुए निर्मला जी आगे कहती है कि,

मैं धरती नहीं
पूरी धरती होती है मेरे अंदर

पर यह नहीं होती मेरे लिए
कहीं कोई घर नहीं होता मेरा
बल्कि मैं होती हूँ स्वयं एक घर
जहाँ रहते है लोग निर्लिप्त
गर्भ से लेकर बिस्तर तक के बीच
कई-कई रूपों में ........[३]

नारी इस धरती को अपना मानती है किन्तु यह धरती उसकी नहीं है |वह जब जन्म लेती है तब उसके लिए पिता घर अपना लगता है किन्तु पिता के लिए वह पराया धन होती है| पिता के पसंद के लड़के से वह शादी करती है और उसे ही अपना सब कुछ मानती है| उसे लगता है कि वह अब अपने घर में आ गयी है| परंतु उसके नाम का उल्लेख कहीं भी नहीं होता| पति के इशारों पर वह हर कदम चलती है| बुढ़ापे में बेटे के संकेतों के अनुसार उसे चलना पड़ना है| इस तरह बचपन से लेकर बुढ़ापे तक कई-कई रूपों में स्त्री पुरुष सत्तात्मक व्यवस्था की शिकार होती है|

कवयित्री 'अपने घर की तलाश में' कविता के माध्यम से नारी जीवन की वास्तविकता को प्रकट करते हुए, कहती है –

धरती के इस छोर से उस छोर तक?
मुट्ठी भर सवाल लिए मैं
दौड़ती- हाँफती – भागती .......
तलाश रही हूं सदियों से
निरन्तर ....
अपनी जमीन , अपना घर
अपंने होने का अर्थ !![४]

स्त्री जीवन की यह समस्या केवल आधुनिक युग से ही नहीं है, यह तो सदियों से चली आ रही है | आदिकाल से ही स्त्री को केवल चार दीवारी में ही सीमित रखा गया | उसकी इच्छा-आकांक्षाओं का दमन किया गया है |

स्त्रियों का प्रतिनिधित्व करने वाली कवयित्री निर्मला पुतुल स्त्रियों के मन उभरने वालों सवालों को कविता के माध्यम से पुरुषों के समक्ष रखती हुए कहती है-

"तन के भूगोल से परे
एक स्त्री के
मन की गाँठे खोल कर
कभी पढ़ा है तुमने
उसके भीतर का खौलता इतिहास?
पढ़ा है कभी
उसी चुप्पी की दहलीज पर बैठ
शब्दों की प्रतीक्षा में उसके चेहरे को?
उसके अन्दर वंशबीज होते
क्या तुमने कभी महसूस है
उनकी फैलाती जड़ों को अपने भीतर?
बता सकते हो तुम
एक स्त्री को स्त्री-दृष्टी से देखते
उसकी स्त्रीत्व की परिभाषा?
अगर नहीं!
तो फिर क्या जानते हो तुम
रसोई और बिस्तर के
गणित से परे
एक स्त्री के बारे में...?[५]

पुरुष ने कभी स्त्री की वेदना को जाना ही नहीं | निर्मला जी कहती है, कि पुरुष स्त्री के गर्भ में बीज तो छोड़ देता है, किन्तु गर्भवती स्त्री की वेदना को समझने का प्रयास भी कभी नहीं किया | स्त्री को सिर्फ रसोई, गृहस्थी संभालने तक ही सीमित रखा | स्त्री पुरुषों के लिए केवल भोगवस्तु रही है | स्त्री की पीड़ा को पुरुष ने कभी महसूस किया ही नहीं | यही कारण है की निर्मला जी अपनी कविताओं से आक्रोश प्रकट करते हुए प्रश्न करती है | और पुरुषों से प्रश्न के उत्तर

भी जानना चाहती है | वह प्रश्न पुछते हुए कहती है कि, तुमने कभी जाना है नारी के भीतर का खौलता इतिहास? पढ़ा है कभी घर की दहलीज पर शब्दों की प्रतीक्षा में चुप बैठी नारी के चेहरे को ? निर्मला जी पुरुषों से यह अपेक्षा करती है की आप सदियों से नारी के मन भीतर खौलते इतिहास को पहचानों | उसके अन्दर की भावनाओं को समझो |

निष्कर्षत: कहा जा सकता है की सदियों से पुरुष सत्तात्मक समाज द्वारा प्रताड़ित स्त्री पुरुष के लिए केवल भोग्या ही रही | पुरुषों ने स्त्री को कभी समझा ही नहीं | स्त्री का शोषण और उस पर अधिकार जमाने के अलावा कुछ नहीं किया | निर्मला जी कहना चाहती है कि, एक स्त्री चाहती है की पुरुष उसे समझे उसके सुख दुःख में सहभागी हो, वह भी पुरुष की तरह मानव है |

कवयित्री अपने समाजवादी चिंतन के द्वारा समाज में व्याप्त बुराईयों को दूर करना चाहती है |

**सन्दर्भ :-**

1. ऋग्वेद, ९, ३, १९४१.
2. निर्मला पुतुल – अपने घर की तलाश में, रमणिका फाउंडेशन, नई दिल्ली.
3. निर्मला पुतुल – अपने घर की तलाश में, रमणिका फाउंडेशन, नई दिल्ली.
4. निर्मला पुतुल – अपने घर की तलाश में, रमणिका फाउंडेशन, नई दिल्ली.
5. निर्मला पुतुल – अपने घर की तलाश में, रमणिका फाउंडेशन, नई दिल्ली.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सौ.सरस्वतीबाई धनाजी चौधरी यांचा सहभाग

**प्रा.डॉ. इंदिरा अशोक लोखंडे**
सहायक प्राध्यापक (इतिहास)
सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख,कला, वाणिज्य व सायन्स महाविद्यालय,भडगाव

**प्रा. वंदना मार्तंड पाटील**
सहाय्यक प्राध्यापक(इतिहास)
नुतन मराठा महाविद्यालय,जळगाव

**प्रस्तावित :-**

प्रस्तुत संशोधनात भारतीय स्वातंत्र्य चळवळीत खानदेशातील जळगाव जिल्ह्यातील महिलांनी पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून या स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग नोंदविलेला दिसून येतो. महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकार विरूद्ध पुकारलेल्या स्वातंत्र्य लढ्यात महिलांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. याचा परिपाक म्हणजे जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील धनाजी नाना चौधरी यांच्या सहचारिणी सौ.सरस्वतीबाई यांनी ही या स्वातंत्र्य लढ्यात सहभाग नोंदविला होता. याचाच मागोवा संशोधक म्हणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

इ. स. १९३० कायदेभंग चळवळीत सरोजिनी नायडू कमलादेवी चटोपाध्याय, कमला नेहरू, अवंतिका बाई गोखले, हंसाबेन, ऊर्मिलादेवी इ. स्त्रियांनी उल्लेखनीय कामगिरी केली. म. गांधींच्या दांडीयात्रेस सरोजिनी नायडू सहभागी झाल्या होत्या. धारासणा येथील मिठागारावर झालेल्या सत्याग्रहाचे नेतृत्त्व सरोजिनी नायडू सहभागी झाल्या होत्या. धारासणा येथील मिठागारावर झालेल्या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडूंनी केले होते, राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष झालेल्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या. 'वुमेन्स लीग फॉर पीस ॲण्ड फ्रीडम या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेस कमलादेवी चटोपाध्याय यांनी सहभाग घेतला होता. त्यांनी देशातील युवाशक्ती संघटित करण्यसाठी प्रयत्न केला. हंसाबेन मेहता यांनी ऑनररी मॅजिस्ट्रेट पदाचा त्याग करून सत्याग्रह आंदोलनात भाग घेतला. जवाहरलाल नेहरू यांच्या मातोश्री स्वरूपराणी नेहरू आणि पत्नी कमला नेहरू यांनी कायदेभंगच्या चळवळीत सक्रीय भाग घेतला होता. कस्तुरबा गांधी, कमला नेहरू, सुचिता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, अरूणा असफअल्ली, उषा मेहता, जानकीदेवी बजाज, नलिनीसेन गुप्ता, रत्नमाला, राधिकादेवी, डॉ. कुमारी प्रभावती इ. भारतीय स्त्रिया तर ॲनी बेंझेट भगिनी निवेदीता, नेली सेन गुप्ता इत्यादी विदेशी स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले दिसून येते.

महाराष्ट्रात ही यशोदाबाई भट, प्रेमाबाई कंटक, गोदावरी पसळेकर, शांताबाई मुखर्जी यासारखे नवे लढाऊ नेतृत्व पुढे आले. नेहरूंनी वर्णन केल्याप्रमाणे गांधीजींनी समाजातील सर्व विभागांना प्रभावित केले होते, जे बुध्दिजीवी, श्रमिक, स्त्री-पुरूष, वृध्द त्यात सामील होते. गांधींजीच्या मते, 'अहिंसात्मक संघर्ष करण्यास स्त्रीच अधिक योग्य आहे. घराघरांतून स्त्रिया बाहेर पडल्याशिवाय राष्ट्रीय चळवळीला सामर्थ्य प्राप्त होणार नाही. तिला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरूषां इतकेच अधिकार असले पाहिजेत.'

सविनय कायदेभंगातील सर्वात क्रांतीकारक फलश्रुती म्हणजे महाराष्ट्रातील महिला प्रबुध्द झाल्या व त्यांनी प्रशंसनीय कामगिरी करून दाखविली दास्तानेंची पत्नी वासनाई दास्ताने, ठकारांची पत्नी पार्वतीबाई ठकार, पुण्याच्या सलभामाबाई कुवळेकर यांनी भुसावळ, जळगाव, वरणगाव, एदलाबाद, चांगदेव, यावल वगैरे ठिकाणी खूप जनजागृती केली होती. जळगाव जिल्ह्यातून ५०० व्यक्तींनी कायदेभंगाच्या सत्याग्रहात भाग घेऊन कारावास पत्करला होता.[१] त्यात बऱ्याच महिलांना तुरूंगवास भोगावा लागला त्यात भगिनी आघाडीवर होत्या. त्यात जळगाव जिल्ह्यातील सौ. सरस्वतीबाई धनाजी चौधरी यांचा ही सहभाग दिसून येतो.

**परीचय :-**

सरस्वतीबाई धनाजी चौधरी यांचा जन्म १८९८ मध्ये झाला होता. त्यांचे शिक्षण मराठी माध्यमातून दुसऱ्या इयत्तेपर्यंत झालेले होते. त्यांचे मुळ गाव खिरोदे ता. रावेर होय. सरस्वतीबाई यांचा विवाह इ. स. १९०६ च्या सुमारास धनाजी नाना चौधरी यांच्या सोबत झाला. दादासाहेब धनाजी नाना यांना समाजसेवेची आवड उच्च शिक्षणाची अपेक्षा आणि महत्वकांक्षा, सोज्वळ, निर्लोभी आणि सुधारणावादी वृत्ती, कुतुहल वृत्ती अशा कुटूंबांच्या सान्निध्यात राहणाऱ्या सरस्वतीबाई ह्या होय. दादासाहेब चौधरी यांच्या वैचारिक बैठकीत कुटूंबाचा समावेश दिसून येतो. ते आपल्या कुटूंबियांसह खादी शिक्षणासाठी विर्ले-पार्ले येथील छावणीत सहभागी झाले. आवश्यक त्या गोष्टी स्वतः आणि कुटूंबातील मंडळींनी आत्मसात केल्यावर त्यांनी पुढील कार्यक्रमांची दिशा ठरविली.[२] दादासाहेब यांच्या पत्नी सरस्वतीबाई शिकलेल्या नव्हत्या. त्यामुळे दादा सुटीत घरी आले म्हणजे स्वतः त्यांना शिकवित असे.[३]

**सरस्वतीबाई जीवनागाथा :-**

सरस्वतीबाई अतिशय साध्या, पतीच्या जीवनाशी अगदी एकरूप झालेल्या होत्या. त्या अधिकाऱ्याची पत्नी असा तोरा त्यांना कधी शिवला नाही. नवऱ्यापेक्षा खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बायकांशी त्या मोकळेपणाने वागत. त्यांच्या घरी शेवया पापड करण्यासाठी जात. त्यांच्या मुलींना न्हाऊ घालीत. सर्वांना या उभय पती पत्नीबद्दल कौतुक वाटे. स्त्री सुलभ दागिन्यांचाही लोभ त्यांना नव्हता. पतीला जे आवडते ते आपल्याला आवडते, हे त्यांनी आपले सूत्र ठरविले होते. स्त्रियांनी आपल्याला सद्गुणांनी भूषवावे असे त्यांना वाटे. ते दागिन्यांनी सजलेल्या स्त्रियांना 'पोळयाचा सजलेला बैल' म्हणत. त्यांचे म्हणणे असे की, 'शेवटी दागिने घालून दाखविणार कोणास ? मलाच ना ?' पण मला तर मुळीच पसंत नाहीत दागिने. मग हवेत कशाला? खिरोद्यास नानाबुवांनी म्हणजे त्यांच्या सासऱ्यांनी काही सोने दिले होते, पण दादा म्हणाले, "सोने हवे असेल तर येथे राहा आणि मी हवा असेल तर सोने येथेच ठेव.' [४] मात्र दादांनी आपले विचार हुकुमशहाप्रमाणे लादले नाहीत पटवून दिले, त्याचप्रमाणे आचरण करावयास लावले. दागिन्यांबाबतचा दृष्टिकोन त्यांनी स्विकारला होता व बाईंना न सांगताच त्यांना सोन्याच्या बांगड्या केल्या होत्या. असे दादासाहेबांचे वर्तन पाहून सरस्वतीबाईंना ही आश्चर्य वाटले होते.

सरस्वतीबाईंनी सहधर्मचारिणीची भूमिका त्यांनी कधीच सोडली नाही. त्या कधी शाळेत गेल्या नाहीत, पण दादांच्या सहवासात त्यांनी जीवनात त्यांनी जी अखंड आणि मूक साथ दिली ती अमोल होती. दादा त्याबद्दल मोठ्या अभिमानाने बोलत. ते कित्येकदा बाईंना चिडवीत. मुद्दाम चेतविण्याचा प्रयत्न करीत. पण त्या आपल्या सुत्रापासून ढळल्या नाहीत. दादांच्या व्यक्तीमत्त्वात विलीन होण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सक्रिय सहकार्यापेक्षाही मूक सहकार्य पुष्कळदा अधिक प्रेरक असते.[५] म्हणूनच दादा पुष्कळदा ह्या बाबींचा अभिमानपूर्वक उल्लेख करीत असे.

कौटुंबिक बाबीत दादासाहेब नेहमी सरस्वतीबाईंचा सल्ला घेत. संसारात पत्नीला फार मोठे स्थान आहे असे ते मानीत. दादासाहेबांनी त्या बाबतीत सीताराम बाबूंना लिहिलेले दि. 7/6/30 चे पत्र फारच महत्त्वाचे आहे. ........ स्त्रियांपाशी संसाराविषयी गोष्टी बोलू नयेत असे आपे मत दिसते. पण ते मला संमत नाही. कारण जगातल्या स्त्रिया अर्ध्यापेक्षा अधिक भाग येत आहेत. तेव्हा स्त्रियांना संसारातील वाटाघाटीत वगळणे मला श्रेयस्कर दिसत नाही. उलटपक्षी त्यांच्यावर निरनिराळया जबाबदाऱ्या टाकून त्यांच्याकडून त्या योग्य रीतीने पार पडतील अशी खबरदारी घेणे हे पुरूषवर्गाचे काम आहे..[६] केलेली दिसून येते. ' अशा शब्दात त्यांनी स्त्र कतृत्त्वाची प्रशंसा केली.

**सरस्वतीबाईची संसारीक तडजोड :**

दादासाहेबांनी सरकारी नोकरी सोडली. त्यांनी नुकसान भरपाई पण नाकारली, जो वडिलांच्या इस्टेटीवरचा आपला रास्त हक्क देखील बजावू इच्छीत नव्हता तो त्या गोष्टी न नाकारता तरच नवल ! इ. स. १९३७ पासून ते आपल्या वाट्याची जमीन घरीच करीत असले तरी तिच्याकडे त्यांना स्वतः फारसे लक्ष देता आले नाही.

असेंब्लीची अधिवेशने आणि नेहमीचे संस्थेचे कार्य ह्या निमित्त त्यांना बाहेरच राहावे लागे. सरस्वतीबाई संस्थेचे कार्य ह्यानिमित्त त्यांना बाहेरच राहावे लागे. सरस्वतीबाई नानाबुवांच्या साहाय्याने तिची व्यवस्था पाहात. अर्थातच त्यांचे श्रम अपुरे पडत होते. जवळचा पैसा संपला होता. सरस्वतीबाईचे दागिने देखील एकामागून एक विकावे लागले होते. सर्वाच्या दृष्टीने ही समाजसेवा महाग पडत होती. पैशांची अडचण नेहमीच असे सरस्वतीबाईंनी कधी पैशाबद्दल गोष्ट काढली आणि चिंता व्यक्त केली की, दादासाहेब हसून त्यांना म्हणत, "तुझं म्हणणं खरं आहे, पण आपण पैशाची चिंता कशाला करावी ? आपण जर चांगले कार्य करीत आहोत तर आपली काळजी देवाला असणार नाही का ?" आपल्या सहकाऱ्याजवळ बोलतांना देखील ते असेच म्हणत. "संस्थेजवळ पैसा नाही हे खरं, पण आपण आपल्या हातापायांनी जे होईल ते करीत राहू, काम नित्य चालू ठेवू." आणि नंतर ते कार्यकर्त्यांना स्मरण देत, "तुम्हाला गीतेतील श्लोक आठवतो का ? 'तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम् !` माझा ह्या वचनावर विश्वास आहे.७

घरी किंवा संस्थेत पैशाची अडचण असली तरी पैशांची चिंता दादासाहेबांनी व सरस्वतीबाईंनी कधी केली नाही. 'न मागे तयाची रमा होय दासी' हे मर्म त्यांना माहित होते. दादासाहेबांच्या समाजवणीने कुणाचे फारसे समाधान होईना, एवढे मात्र खरे की त्यांच्या म्हणण्याप्रमाणे घटना मात्र जुळून येत आणि संस्थेला पैसाही मिळे व कामही वाढे. त्यांच्या कौटुंबिक जीवनात ही श्रध्दा शेतीच्या उत्पन्नाच्या रूपाने खरी ठरल्यासारखी वाटे.

प्रभातफेरी, ग्रामसफाई, प्रचार सभा यांच्यात दादांसोबत सरस्वतीबाईंनी बरोबरीच्या कामाने आश्रमात काम करीत होते हे पाहून इतर जोडप्यांनी ह्या कार्यात सहभाग नोंदविलेला दिसून येतो. इ. स. १९३२ मध्ये त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. प्रथम त्यांना दंड झाला, पण दादासाहेब सुटून आल्यावर त्यांना अटक झाली. त्या तुरूंगात गेल्या, आश्रय तर दादांच्या घरीच होता, सरस्वतीबाईंनी ऋषिपत्नीची भूमिका चांगल्या रीतीने बजावली एवढेच सांगीतले तरी देखील त्यांच्या कार्याची कल्पना येण्यासारखी आहे.

**ऋषिपत्नी :-**

दादासाहेब चौधरी यांच्या जीवनातील मोठा विशेष म्हणजे सरस्वतीबाईंनी प्रत्येक बाबतीत त्यांना दिलेली साथ हा होय. पतीच्या पावलावर पाऊल टाकायचे, ही त्यांची निष्ठा. त्यांनी आपली भूमिका सर्व काळात कायम ठेवली. अंधश्रध्देपेक्षा या भूमिकेत विश्वासाचा भाग अधिक होता. नोकरी सोडण्याच्या अगोदर जो मनाचा खंबीरपणा त्यांनी दाखविला. तोच नंतरच्या ह्या काळात दाखविला. शेतीची कामे त्यांनी स्वतः केली शिवाय आश्रमीय जीवनातील सोप्या गोष्टी मुलाबाळांसह आत्मसात केल्या. घरातील वातावरण आश्रमीय राखण्याशी जबाबदारी सरस्वतीबाईंवरच होती. आपल्या पतीच्या जीवनात तात्विक त्याचप्रमाणे व्यावहारिक कोणत्याही बाबतीत विसंगती येणार नाही, अशा त्या वागल्या. स्वावलंबनाची दीक्षा शेतकरी कुटुंबातील बाईला तिच्या जन्मापासूनच मिळालेली असते, पण ह्याशिवाय आश्रमातील इतर बाबीही त्यांनी सहज पचविल्या. प्रभातफेरी, ग्रामसफाई, प्रचारसभा यांच्यात देखील सरस्वतीबाई भाग घेत. ह्या पतिपत्नीच्या बेराबरीच्या कामाने आश्रमात पतिपत्नींच्या आणखी काही जोड्या आल्या, त्यामुळे लोकांवर काही आगळाच परिणाम होई. दादांनी आपल्या कोणत्याही कामाची सुरूवात अगदी घरापासून केली. घरातली माणसे अगोदर तयार करायची, मग गावाचा आणि देशाचा विचार ! त्या दृष्टीने सरस्वतीबाईंनी त्यांची बाजू फारच भक्कम केली.८ असेंब्लीची अधिवेशने आणि नेहमीचे संस्थेचे कार्य ह्यानिमित्त दादासाहेबांना बाहेरच राहावे लागत असे. सरस्वतीबाई नानाबुवांच्या साहाय्याने तिची व्यवस्था पाहत, अर्थातच त्यांचे श्रम अपुरे पडत होते. जवळचा पैसा संपला होता. सरस्वतीबाईंचे दागिने देखील एकामागून एक विकावे लागले होते. सर्वांच्या दृष्टीने ही समाजसेवा महाग पडत होती. इ. स. १९३२ मध्ये त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. प्रथम त्यांना दंड झाला, पण दादासाहेब सुटून आल्यावर त्यांना अटक झाली. त्या तुरूंगात गेल्या आश्रम तर दादांच्या घरीच होता. सरस्वतीबाईंनी ऋषीपत्नीची भूमिका चांगल्या रीतीने बजावली होती.

**सरस्वतीबाई यांची सूतशाळा :-**

दादासाहेबांनी खादी प्रचार आणि प्रसार कार्यक्रमावर भर दिला. त्यांच्या ह्या कार्यात त्यांच्या धर्मपत्नी सौ. सरस्वतीबाई व मुलींनीही सूतकताईच्या कामात सहकार्य केले आणि दादाचे घर हे 'सूतशाळा' म्हणून ओळखले जाऊ लागले. यासोबत शाळेत प्रार्थना, भजन, गीता, प्रवचनही होऊ लागले, १९३१ मध्ये आपल्या घरातील सूतशाळेचे रूपांतर 'आश्रमात ' केले. खिरोदे आश्रमाची स्थापना ही या परिसराच्या दृष्टीने महत्वपूर्ण घटना मानली जाते. खिरोदे येथे सुरू केलेला आश्रम खऱ्या अर्थाने 'लोकशिक्षणाचे केंद्र' बनवून दादासाहेबांनी खिरोदा आणि परिसरातील जनतेत जागृती घडवून आणण्याचे कार्य सुरू ठेवले. हा आश्रम जनतेच्या मार्गदर्शनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे केंद्र म्हणून चालवित असतांना आश्रमात भेटीसाठी येणारी मंडळीदेखील आश्रमाच्या परिवारात सामील होत होती. प्रभात फेरी, प्रार्थना, दळण, सफाई, सूतकताई, स्वयंपाक करणे, जेवण, खेडोपाडी जाऊन प्रचार करणे, संध्याकाळची प्रार्थना, प्रवचन असा आश्रमातला दिनक्रम खऱ्या अर्थाने सेवेचा अनुभव देणारा होता.

दादासाहेबांबरोबर, सरस्वतीबाई यांना खादी प्रचार कार्यातून लोकजागृती अपेक्षित होती, म्हणून त्यांनी खेड्यातील सामान्य लोकांच्या बैठकी, व्याख्यानांचे आयोजन करून ग्रामसेवेचे उद्दिष्ट त्यातून साध्य होऊ लागले. 'दादा आणि कुटूंबियांनी यात वाहून घेतल्यामुळे त्यांना आश्रम हेच जीवन आणि आश्रम हेच कार्य असे समीकरण झाले. त्यांची गांधी मार्गाकडे पावले वळली ती त्यांच्या अंगच्या सेवाभावाच्या जोडीस त्यांच्या असामान्य त्यागाची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या जीवनाला एक प्रकारचे तेज आले.'

इ.स.१९३०-३२ सालच्या कायदेभंगाच्या आंदोलनात सहभाग घेऊन खादी विषयक ग्रामोद्योगाचे विधायक कार्यात सहभाग घेतलेला होता. तसेच सभा व मिरवणूकीत दादासाहेबांसोबत भाग घेऊन लोकजागृतीचे महान कार्य केलेले दिसून येते. ब्रिटीश सरकारने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. इ. स.१९३३ मध्ये जळगावच्या न्यायालयात ६ महिने सक्त मजूरीची शिक्षा व १०. दंड झाला होता. दंड भरला न गेल्यामुळे त्यांना त्याबद्दल १ महिना ज्यादा शिक्षा भोगावी लागली होती. [९]

**फैजपूर अधिवेशनात सरस्वतीबाईचा सहभाग :-**

इ.स.१९३६ च्या फैजपूर अधिवेशनात शंभर जाती (गहू, ज्वारी, धान्य दळण्यासाठी अधिवेशनाच्या जागी मांडली गेली होती. गावोगावच्या बाया तेथे येत आणि दळून जात. तर कधी दळण घरोघर पोहचवले जाई व तेवढे पीठ घरून दळून आणून देत असे.) फैजपूरच्या आजूबाजूच्या खेड्यातून अनेक महिला स्वयंस्फूर्तीने येत काही रोजगारीने दळत असे, पुष्कळ वेळा एक पुरुष एक स्त्री अशी देखील जाती चालवली. जाती चालविली जात होती. फैजपूर, खिरोदा, न्हावी येथील कार्यकर्त्यांच्या पत्नींनी याबाबतीत फार मोठे कार्य केले. हे सारे कार्यकर्ते सहकुटूंबच या कामास लागले होते. आपल्या घरचे 'कार्ये' समजून त्यांनी परिश्रम केले. अशा परिश्रमामध्ये सरस्वतीबाईंनी मोलाचे सहकार्य केलेले दिसून येते इ.स.१९३६ च्या फैजपूर अधिवेशनात सरस्वतीबाईनी दादासाहेबांबरोबर गावोगावी जाऊन प्रचार व प्रसार केला तसेच जवळपासच्या खेडयातून महिलांना स्वयंस्फूर्तीने ह्या अधिवेशनास अनेक सहभाग करून घेतले होते. त्यांनी गावोगावच्या बाया तेथे येत आणि दळून जात. तर कधी दळण घरोघर पोहोचवले जाई व तेवढे पीठ घरून दळून आणून दिले जाई. फैजपूरच्या आजूबाजूच्या खेड्यातून अनेक महिला स्वयंस्फूर्तीने येत काही रोजगारीने दळत असे.[१०]

**वैयक्तिक सत्याग्रह व दादासाहेब :-**

इ.स. १९४० च्या नोव्हेंबरात म. गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. त्या चळवळीत दादासाहेबांनी भाग घेतला. १४ डिसेंबरला त्यांना अटक करायला आलेला पोलीस इन्स्पेक्टर शेख. योगायोगाने नाशिकला त्यांच्या हाताखाली कामाला असलेलाच होता. तो दादासाहेबाच्या वाड्यात आला. दादासाहेब बाहेर गेलेले

होते. सरस्वतीबाईंनी त्यांना ओळखले आणि दोन घास जेवून घ्या म्हणून म्हटले. त्याने आढेवेढे घेतले. पण आग्रह झाल्यामुळे तो बसला. जेवत असतांना त्याच्या डोळयांतून सारखे पाणी येत होते. दादासाहेब बाहेरून आले, 'अरे वा ! शेख, आता तुझी पाळी काय ? मागील अटकेची हकिकत त्यांना स्मरली. तो पोलीस झटपट उरकायला लागल्याचे पाहून दादासाहेब म्हणाले, 'तू निश्चितपणे जेवून घे. मी पळून जाणार नाही खास. '

नंतर त्यांनी आपली तयारी केली. मंदिरात गेले. वंदन केले, भजन म्हटले आणि व्याख्यानासाठी चावडीपुढे गेले. सत्याग्रहाचा, कार्यक्रम अतिशय शांततेने झाला. 'महात्मा गांधी की जय'. ह्या देखील घोषणा लोकांनी केल्या नाहीत. शांतता राखण्यासंबंधीची दादासाहेबांची सूचना त्यांनी अक्षरक्षः पाळली, त्यांना अटक झाली. त्या पोलीसालाच ती अधिक जाणवत होती. दादांनी ग्रामस्थांचा निरोप घेतला. दादासाहेबांना एकूण सहा महिन्यांची शिक्षा झाली होती.[११] भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात दादासाहेबांबरोबर त्याची सहचारिणी म्हणून खांद्याला खांदा लावून सौ.सरस्वतीबाई यांनी सहभाग नोंदविलेला दिसून येतो.

***समारोप*:-**

अशा रीतीने दादासाहेबांनी व सरस्वतीबाईंनी आपल्या खानदेशातील जळगाव जिल्ह्यात सर्वसमभावाची भावना उदयास आणली. त्यांनी केलेल्या कार्याचा अभिमान आहे. इ.स.१९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीचे वारे खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोहोचले होते. मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, करबंदी चळवळ, दारू पिकेटींग ह्या वेगवेगळया स्वरूपात परकीय सत्तेबद्दल उठावणी होत होती आणि महात्मा गांधींच्या चळवळीचा संदेश खादीच्या रूपाने हळूहळू सर्वत्र पसरायला सुरूवात झाली होती. जळगाव जिल्ह्यातून ठिकठिकाणी जाऊन बहिष्कार-निरोधनात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनी ही भाग घेतला होता.

***संदर्भ ग्रंथ* :-**

*1. पाटील भी. ना. – खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०)* प्रथमावृत्ती १ जून २००५ – *पृ. - २६७*

*2.* कुंटे भ. ग. (संपा) - स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य पश्चिम महाराष्ट्र, खंड १ जळगाव, प्रकाशक - कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन , बरजोरजी भरूच मार्ग, मुंबई, महात्मा गांधी रोड, मुंबई, पृ. २२०

3. चौधरी भानु - कर्मयोगी धनाजी नाना तथा दादासाहेब चौधरी जीवन आणि कार्य जनता शिक्षण मंडळ, खिरोदे, जळगाव, तृतीयावृत्ती २९ डिसें. १९९० पृ. १९

४) कित्ता, पृ. ३३-३४

५) कित्ता, पृ. ३५

६) पाटील भी. ना. - खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०), प्राध्यापक वसाहत, पाचोरा, प्रथमावृत्ती १जून २००५ पृ. ४४४

७) चौधरी भानु - कर्मयोगी धनाजी नाना तथा दादासाहेब चौधरी जीवन आणि कार्य, जनता शिक्षण मंडळ, खिरोदे, जळगाव, तृतीयावृत्ती २९ डिसें. १९९०, पृ.१२७-१२८

८) कित्ता, पृ.८९

९) कुंटे भ. ग. (संपा) - स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य पश्चिम महाराष्ट्र, खंड १ ( जळगाव ), प्रकाशक- कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका महाराष्ट्र शासन ,बरजोरजी भरूच मार्ग, मुंबई, महात्मा गांधी रोड, मुंबई, पृ. २३१

१०) चौधरी मधुकर (संपा) - फैजपूर काँग्रेस सुवर्ण महोत्सव गौरविक,१९८७ प्रकाशक : फैजपूर काँग्रेस सुवर्ण महोत्सव समिती, फैजपूर, पृ. ६१

११) चौधरी भानु - कर्मयोगी धनाजी नाना तथा दादासाहेब चौधरी जीवन,आणि कार्य, जनता शिक्षण मंडळ, खिरोदे, जळगाव, तृतीयावृत्ती २९ डिसें.१९९०, पृ. ४१